म. ग्रं. सं. ठाणे.
विषय जिंबाध्य
सं. क्र. २०८९

REFBK-0015120

१८७४
८५५६६
२०।३।८९
२०८९

# स्वातंत्र्योत्तर भारत

तीन व्याख्याने

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना

**आचार्य जावडेकर स्मारक व्याख्यानमाला :**

*एक* : आचार्य जावडेकरांची विचारसृष्टी : दि. के. बेडेकर : ११५८

*दोन* : सत्याग्रही जीवनदृष्टी : गं. बा. सरदार : १९६१

*तीन* : महाराष्ट्रातील समाजपरिवर्तनाची दिशा : गं. बा. सरदार : १९६

*चार* : भारतातील समाजवादी पुनर्रचनेच्या समस्या : ना. ग. गोरे : १

*पाच* : लोकशाही आणि वृत्तपत्र व्यवसाय : एस. नटराजन् : १९६४

आचार्य जावडेकर स्मारक व्याख्यान माला : सहा : १९६५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# स्वातंत्र्योत्तर भारत

मिश्र अर्थव्यवस्था
आणि संसदीय लोकशाही
यांचा एक प्रयोग

REFBK-0015120

पां. वा. गाडगीळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 75920
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

समाज प्रबोधन संस्था
पुणे

समाज प्रबोधन संस्था प्रकाशन : ३२
पहिली आवृत्ती : सप्टेंबर १९६६
© १९६६, आचार्य जावडेकर स्मारकनिधी

किंमत दोन रुपये साठ पैसे

मुखपृष्ठ
बाळ ठाकूर

प्रकाशक
शंकरराव देव,
अध्यक्ष, समाज प्रबोधन संस्था
४३०-३१, शनिवार पेठ, पुणे २

मुद्रक
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

# प्रस्तावना

ाद व गांधीवाद यांचे प्राथमिक पाठ मी आचार्य जावडेकरांच्याजवळ शिकलो. णून जावडेकर व्याख्यानमालेत १९६५ ची व्याख्याने देण्याचे काम जेव्हा बोधन संस्थेने माझ्यावर सोपविले तेव्हा जावडेकरांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त ी ही फार चांगली संधी मिळत आहे हे लक्षात येऊन मला फार आनंद विषयाची निवड समाज प्रबोधन संस्थेचे एक प्रतिनिधी आ. ग. प्र. प्रधान ी चर्चा करून केली. आर्थिक विकास व संसदीय लोकशाही हे दोन्ही विषय ाख्यानांत यावे अशी त्यांनी सूचना केली. त्यावरून पहिल्या व्याख्यानात विकासाची प्रक्रिया व दुसऱ्या व्याख्यानात स्वतंत्र भारताचा आर्थिक अशी वाटणी केली व तिसरे व्याख्यान संसदीय लोकशाहीचा फेरविचार या र योजले.

१९६५ च्या डिसेंबरमध्ये ११, १२, १३ तारखांस ही व्याख्याने मी पुण्यास व्याख्याने देण्यापूर्वी ती लिहून काढली होती. पण नंतर श्री. वसंत पळशीकर सूचनेवरून काही काटछाट केली व बराच भाग पुन्हा लिहून काढला. मूळ योजनेपेक्षा पुस्तक थोडे वाढले आहे. ही दुरुस्त प्रत लिहिल्यालाही कांही लोटले. पण नंतर मात्र मजकुरात बदल केला नाही.

या तीनही व्याख्यानांत मराठीत प्रथमच आलेले काही नवीन विचार आहेत. वृत्तपत्रात मीच पूर्वी ते लिहिले आहेत एवढ्याच अर्थाने ते पुनरुक्त आहेत णता येईल. केन्सचे नवे अर्थशास्त्र मराठीत पहिल्यानेच मांडले जात असून र्थिक विषय जनतेच्या जिव्हाळ्याचा आहे असे मला वाटते. भारतातील लोकशाहीसंबंधीचे विवेचन सद्यःस्थितीस धरूनच केले आहे.

हिल्या व्याख्यानात आर्थिक विकासाची जी प्रक्रिया सांगितली आहे तीतील परिस्थितीचे विवेचन मुख्यतः कम्युनिस्ट विचारसरणीला धरून आहे. पण शाहीमुळे मानवजातीवर येणाऱ्या संकटाच्या निवारणाचा केन्सप्रणीत मार्ग त्यात आहे, तो कम्युनिस्टांच्या वर्गकलही व हुकुमशाही मार्गाला शांतताप्रधान व ाहीप्रधान असा पर्याय आहे. केन्सने विचार केला तो मुख्यतः इंग्लंडातील लशाहीच्या संकटाबाबत केला. पण त्याने सांगितलेल्या उपायावरून मागासलेल्या ाही मार्गदर्शन मिळते. कम्युनिस्टांनी नियोजनाची गरज जी प्रतिपादन केली ही अवलंब केन्सीयन मार्गात करावा लागतो व करता येतो. इतका विषय पहिल्या ्यानात आला आहे. दुसऱ्या व्याख्यानात भारताची परिस्थिति सांगितली असून ल्याप्रमाणे केन्सियन पद्धती व नियोजन यांचा समन्वय भारताच्या आर्थिक

समाज प्रबोधन संस्था प्रकाशन : ३२
पहिली आवृत्ती : सप्टेंबर १९६६
© १९६६, आचार्य जावडेकर स्मारकनिधी

किंमत दोन रुपये साठ पैसे

मुखपृष्ठ
बाळ ठाकूर

प्रकाशक
शंकरराव देव,
अध्यक्ष, समाज प्रबोधन संस्था
४३०-३१, शनिवार पेठ, पुणे २

मुद्रक
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

# प्रस्तावना

मार्क्सवाद व गांधीवाद यांचे प्राथमिक पाठ मी आचार्य जावडेकरांच्याजवळ शिकलो. म्हणून जावडेकर व्याख्यानमालेत १९६५ ची व्याख्याने देण्याचे काम जेव्हा समाज प्रबोधन संस्थेने माझ्यावर सोपविले तेव्हा जावडेकरांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची ही फार चांगली संधी मिळत आहे हे लक्षात येऊन मला फार आनंद झाला. विषयाची निवड समाज प्रबोधन संस्थेचे एक प्रतिनिधी आ. ग. प्र. प्रधान यांच्याशी चर्चा करून केली. आर्थिक विकास व संसदीय लोकशाही हे दोन्ही विषय तीन व्याख्यानांत यावे अशी त्यांनी सूचना केली. त्यावरून पहिल्या व्याख्यानात आर्थिक विकासाची प्रक्रिया व दुसऱ्या व्याख्यानात स्वतंत्र भारताचा आर्थिक विकास अशी वाटणी केली व तिसरे व्याख्यान संसदीय लोकशाहीचा फेरविचार या विषयावर योजले.

१९६५ च्या डिसेंबरमध्ये ११, १२, १३ तारखांस ही व्याख्याने मी पुण्यास दिली. व्याख्याने देण्यापूर्वी ती लिहून काढली होती. पण नंतर श्री. वसंत पळशीकर यांच्या सूचनेवरून काही काटछाट केली व बराच भाग पुन्हा लिहून काढला. यामुळे मूळ योजनेपेक्षा पुस्तक थोडे वाढले आहे. ही दुरुस्त प्रत लिहिल्यालाही कांही महिने लोटले. पण नंतर मात्र मजकुरात बदल केला नाही.

या तीनही व्याख्यानांत मराठीत प्रथमच आलेले काही नवीन विचार आहेत. मराठी वृत्तपत्रात मीच पूर्वी ते लिहिले आहेत एवढ्याच अर्थाने ते पुनरुक्त आहेत असे म्हणता येईल. केन्सचे नवे अर्थशास्त्र मराठीत पहिल्यानेच मांडले जात असून हा आर्थिक विषय जनतेच्या जिव्हाळ्याचा आहे असे मला वाटते. भारतातील संसदीय लोकशाहीसंबंधीचे विवेचन सद्यःस्थितीस धरूनच केले आहे.

पहिल्या व्याख्यानात आर्थिक विकासाची जी प्रक्रिया सांगितली आहे तीतील आर्थिक परिस्थितीचे विवेचन मुख्यतः कम्युनिस्ट विचारसरणीला धरून आहे. पण भांडवलशाहीमुळे मानवजातीवर येणाऱ्या संकटाच्या निवारणाचा केन्सप्रणीत मार्ग त्यात मांडला आहे, तो कम्युनिस्टांच्या वर्गकलही व हुकुमशाही मार्गाला शांतताप्रधान व लोकशाहीप्रधान असा पर्याय आहे. केन्सने विचार केला तो मुख्यतः इंग्लंडातील भांडवलशाहीच्या संकटाबाबत केला. पण त्याने सांगितलेल्या उपायावरून मागासलेल्या राष्ट्रांनाही मार्गदर्शन मिळते. कम्युनिस्टांनी नियोजनाची गरज जी प्रतिपादन केली तिचाही अवलंब केन्सीयन मार्गात करावा लागतो व करता येतो. इतका विषय पहिल्या व्याख्यानात आला आहे. दुसऱ्या व्याख्यानात भारताची परिस्थिति सांगितली असून वर [illegible]ल्याप्रमाणे केन्सियन पद्धती व नियोजन यांचा समन्वय भारताच्या आर्थिक

धोरणात कसा केला आहे व त्यात उणीव काय आहे याचे विवेचन केले आहे. हा भारताचा विकास शांतताप्रधान अशा संसदीय लोकशाही मार्गाने करायचा असे येथे ठरले आहे. पण बहुपक्षीय अशा संसदीय लोकशाहीची रूढ कल्पना समाजातील फार मोठ्या वर्गास निराश व बेफाम कशी करते व तीत विध्वंसवृत्ती कशी बळावते हे सद्यःस्थितीच्या विवेचनाने दाखविले असून विचारविनिमय व सहकार यांवर ही लोकशाही आधारली जाण्यासाठी तिची नवी घडी कशी बसवावी हे तिसऱ्या व्याख्यानाच्या पहिल्या मुख्य भागात सांगितले आहे. तिसऱ्या व्याख्यानातला दुसरा विभाग पंतप्रधान व राष्ट्रपती यांच्या भारतीय राज्यघटनेतील अधिकारांच्या चर्चेचा असून संसदीय लोकशाहीत भावी कालात येणाऱ्या अडचणीत ही घटना सुसूत्रपणे चालण्याची तरतूद या घटनेत कशी आहे हे तेथे दाखविले आहे.

तिसऱ्या व्याख्यानातला तिसरा विभाग कायदेमंडळाच्या हक्कासंबंधीचा आहे. या विषयीची आजची बहुमतवाल्या पक्षाची दृष्टी संकुचित स्वार्थाची असून त्यांना दूरचा धोका दिसत नाही. हुकुमशाहीवादी पक्ष कायदेमंडळात बहुसंख्य झाल्यावर आजच्या परिस्थितीतला धोका कळेल. म्हणून हुकुमशाही प्रवृत्तीचा पक्ष कायदेमंडळात बहुसंख्य झाल्यास नागरिक स्वातंत्र्याच्या रक्षणाची तरतूद कशी करावी हे तिसऱ्या व्याख्यानातील या तिसऱ्या विभागात सांगितले आहे.

संसदीय लोकशाहीत सुकरता आणणे हाच या सर्व फेरविचाराचा हेतू आहे. आर्थिक विकासाच्या पद्धतीचे स्वरूप, तिची भारतात झालेली बजावणी व या आर्थिक विकासकार्यात संसदीय लोकशाहीच्या आलेल्या अनुभवावरून तिच्या पुनर्रचनेसंबंधाने सुचलेल्या कल्पना असा हा सर्व आर्थिक व राजकीय घटनात्मक सलग विषय या तीन व्याख्यानांत आला आहे. ही तीन व्याख्याने मिळून भारताच्या संसदीय समाजवादी लोकशाहीवर हा एक लहानसा प्रबंध आहे असे म्हणता येईल.

या तीन व्याख्यानांची मूळ हस्तलिखित प्रत वाचून श्री. पळशीकरांनी बहुमोल सूचना केल्या याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. मी या व्याख्यानमालेत व्याख्याने द्यावी अशी इच्छा ग. प्र. प्रधान व दि. के. बेडेकर यांनी काही वर्षांमागेच व्यक्त केली होती. गेल्या वर्षी हा योग त्यांनी जुळवून आणला व माझ्या हातून हे काम तडीस नेले हा त्यांचा मजवर मोठा अनुग्रह झाला आहे. 'मौज'चे श्री. वि. पु. भागवत यांनी पुस्तक लवकर व चांगले व्हावे म्हणून फार मेहनत घेतली. विशेषतः त्यांच्या कंपॉझिटरवर्गास विशिष्ट कारणाने विशेष त्रास पडला; पण त्यांनी मुळीच तक्रार न करता काम चांगले केले. त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

शेवटी आचार्य जावडेकरांना अभिवादन करून ही प्रस्तावना संपवितो.

सिताराम भुवन,
गोखले रोड (नॉर्थ) मुंबई २८.
२३-९-६६

पां. वा. गाडगीळ

आधुनिक कालखंडातील विकासाची प्रक्रिया १

स्वतंत्र भारताचा आर्थिक विकास ३२

संसदीय लोकशाहीचा फेरविचार ५८

धोरणात कसा केला आहे व त्यात उणीव काय आहे याचे विवेचन केले आहे. हा भारताचा विकास शांतताप्रधान अशा संसदीय लोकशाही मार्गाने करायचा असे येथे ठरले आहे. पण बहुपक्षीय अशा संसदीय लोकशाहीची रूढ कल्पना समाजातील फार मोठ्या वर्गास निराश व बेफाम कशी करते व तीत विध्वंसवृत्ती कशी बळावते हे सद्यःस्थितीच्या विवेचनाने दाखविले असून विचारविनिमय व सहकार यांवर ही लोकशाही आधारली जाण्यासाठी तिची नवी घडी कशी बसवावी हे तिसऱ्या व्याख्यानाच्या पहिल्या मुख्य भागात सांगितले आहे. तिसऱ्या व्याख्यानातला दुसरा विभाग पंतप्रधान व राष्ट्रपती यांच्या भारतीय राज्यघटनेतील अधिकारांच्या चर्चेचा असून संसदीय लोकशाहीत भावी कालात येणाऱ्या अडचणीत ही घटना सुसूत्रपणे चालण्याची तरतूद या घटनेत कशी आहे हे तेथे दाखविले आहे.

तिसऱ्या व्याख्यानातला तिसरा विभाग कायदेमंडळाच्या हक्कासंबंधीचा आहे. या विषयीची आजची बहुमतवाल्या पक्षाची दृष्टी संकुचित स्वार्थाची असून त्यांना दूरचा धोका दिसत नाही. हुकुमशाहीवादी पक्ष कायदेमंडळात बहुसंख्य झाल्यावर आजच्या परिस्थितीतला धोका कळेल. म्हणून हुकुमशाही प्रवृत्तीचा पक्ष कायदेमंडळात बहुसंख्य झाल्यास नागरिक स्वातंत्र्याच्या रक्षणाची तरतूद कशी करावी हे तिसऱ्या व्याख्यानातील या तिसऱ्या विभागात सांगितले आहे.

संसदीय लोकशाहीत सुकरता आणणे हाच या सर्व फेरविचाराचा हेतू आहे. आर्थिक विकासाच्या पद्धतीचे स्वरूप, तिची भारतात झालेली बजावणी व या आर्थिक विकासकार्यात संसदीय लोकशाहीच्या आलेल्या अनुभवावरून तिच्या पुनर्रचनेसंबंधाने सुचलेल्या कल्पना असा हा सर्व आर्थिक व राजकीय घटनात्मक सलग विषय या तीन व्याख्यानांत आला आहे. ही तीन व्याख्याने मिळून भारताच्या संसदीय समाजवादी लोकशाहीवर हा एक लहानसा प्रबंध आहे असे म्हणता येईल.

या तीन व्याख्यानांची मूळ हस्तलिखित प्रत वाचून श्री. पळशीकरांनी बहुमोल सूचना केल्या याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. मी या व्याख्यानमालेत व्याख्याने द्यावी अशी इच्छा ग. प्र. प्रधान व दि. के. बेडेकर यांनी काही वर्षांमागेच व्यक्त केली होती. गेल्या वर्षी हा योग त्यांनी जुळवून आणला व माझ्या हातून हे काम तडीस नेले हा त्यांचा मजवर मोठा अनुग्रह झाला आहे. 'मौज'चे श्री. वि. पु. भागवत यांनी पुस्तक लवकर व चांगले व्हावे म्हणून फार मेहनत घेतली. विशेषतः त्यांच्या कंपॉझिटरवर्गास विशिष्ट कारणाने विशेष त्रास पडला; पण त्यांनी मुळीच तक्रार न करता काम चांगले केले. त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

शेवटी आचार्य जावडेकरांना अभिवादन करून ही प्रस्तावना संपवितो.

सिताराम भुवन,
गोखले रोड (नॉर्थ) मुंबई २८.
२३-९-६६

पां. वा. गाडगीळ

आधुनिक कालखंडातील विकासाची प्रक्रिया १
स्वतंत्र भारताचा आर्थिक विकास ३२
संसदीय लोकशाहीचा फेरविचार ५८

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान मिळाले आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 145468 दि: 18/08/2013/09
क्रमांक 2055 नों: दि: 2013/09

व्या|ख्या|न
प | हि | ले

# आधुनिक कालखंडातील विकासाची प्रक्रिया

म. ग्रं. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 145120
संद. शाखा (स्थळ प्रत)

माणसाच्या अर्थकारणाचा व राजकारणाचा इतिहास हजारो वर्षांचा आहे. पण त्यात न शिरता येथे आपणाला आधुनिक इतिहासापुरतेच पाहायचे आहे. आधुनिक अर्थव्यवहाराशी निकटच्या कार्यकारणांनी बद्ध असा काळ गेल्या तीनचारशे वर्षांचाच आहे. त्या पूर्वीच्या कालखंडात माणसाने हत्यारे निर्मिली व राजकीय संघटना केल्या; तरी समाजाच्या जीवनाला अवश्य असे उपभोग्य धन पुरेसे होऊन थोडेसे अधिक संपादण्याचे कामी माणसाला यश फारच थोडे आले. त्या काळात प्रगती झाली ती अत्यंत सावकाश झाली. उलट गेल्या तीनचारशे वर्षांत झालेल्या आर्थिक प्रगतीचा वेग एवढा मोठा आहे की या काळात झालेली प्रगती त्यापूर्वीच्या हजारो वर्षांत झालेल्या प्रगतीपेक्षा मोठी आहे. शिवाय गेल्या तीनशे वर्षांतील प्रगतीचा हा वेग अलीकडील पन्नास वर्षांत इतका वाढला आहे की पूर्वीच्या तीनशे वर्षांत झालेल्या प्रगतीपेक्षा गेल्या पन्नास वर्षांतील प्रगती कित्येक पट अधिक आहे. या कालखंडात प्रगतीचा वेग वाढला, संपत्ती अधिक वाढली. त्याचबरोबर व्यक्ती आणि समाज, समाज आणि समाज यांमधील परस्परहितानुकूलता व हितविरोधही वाढले. संपत्तिसाधने वाढली त्याबरोबर विध्वंससाधनेही वाढली आणि खाजगी मिळकतीच्या मालकीचे रक्षण करणे हे जे राज्यसंस्थेचे कर्तव्य त्याबाबत विपर्यस्त व समाजहितविरोधी कल्पना बळावत जाऊन अर्थकारण व राजकारण यात फार मोठ्या उलथापालथी झाल्या. तरीही आर्थिक प्रगती होत आली आहे.

या विरोधातून, विध्वंसातून, विपर्यासातून जी ही प्रगती होत गेली तिची प्रक्रिया कोणती व ती कशी आहे ? अमुक माणसाने वाफेच्या शक्तीचा शोध लावला, दुसऱ्या अमक्याने वीजशक्ती शोधून काढली, त्यामुळे आर्थिक प्रगती झाली असे आपण म्हणतो. ते खरेही असते. पण उत्पादनाच्या पद्धतीत फरक होतात व त्या फरकांच्या ठिकाणी समाजाचे रूप पालटण्याचे फार मोठे सामर्थ्य असते. या पालटातच प्रगतीची बीजे व फळेही असतात. तीन शतकांपूर्वी इंग्लंडात कापड, काच, घोड्याच्या गाड्या, ब्रेड इत्यादी माल तयार करण्याच्या पद्धतीत अदृश्यपणे जी क्रांती होऊ लागली तो मानवी प्रगतीच्या इतिहासातला फार महत्त्वाचा टप्पा आहे. ऐतिहासिक कारणपरत्वे थोडथोडा धनसंचय ज्यांच्या हाती झाला होता त्या लोकांनी भांडवल उभारून हे धंदे मोठ्या प्रमाणावर सुरू केले. ऐतिहासिक कारणांनीच शेतीतून, सैन्यांतून हाकलले गेलेले बेकार लोक या नवीन भांडवलदारांच्या दारी रोजगारीसाठी आले. वरील मालांचे जुने लहान कारागीर आपले धंदे करीत होतेच. पण त्यांच्याजवळ भांडवल फार थोडे असे. त्यांना कच्चा माल उधारीने, फाजील किंमतीने खरीदावा लागे. एकटा कारागीर त्या त्या मालाच्या उत्पादनाच्या सर्व प्रक्रिया त्याचा तोच करीत असल्याने सर्व वेळ सर्व हत्यारांचा सारखा उपयोग न होऊन एकूण माल-उत्पादनात वेळ वाया जाई. शेवटी उत्पन्न झालेला माल त्या कारागिरास स्वतःच बाजारात नेऊन चढाओढीने विकावा लागल्याने त्याला किमतीत मार खावा लागे.

कारण वर उल्लेखिलेल्या भांडवलदारी उत्पादनात ही परिस्थिती अगदी वेगळी होती. हा भांडवलदार कच्चा माल एकदम मोठ्या प्रमाणावर रोखीने खरीदत असल्याने खाजगी कारागिरापेक्षा त्याला तो स्वस्त मिळे, आणि कामगारांमध्ये चढाओढ लागल्याने कमीत कमी मजुरीवर कामगार कामासाठी मिळत. अनेक मजूर एकच प्रकारचा माल कारखान्याच्या जागेत तयार करत, यामुळे त्या मालाच्या उत्पादनातील विविध प्रक्रियांची श्रमविभागतत्त्वावर फेररचना करण्याची कल्पना सुचून ती हळूहळू व्यवहारात आली. एकेकच प्रक्रिया एकेका कामगाराला करावी लागल्याने त्याची कार्यक्षमता व कामाचा वेग वाढून एकंदर मालाचा उत्पादनखर्च घटला. या भांडवलदाराने कामगारांना त्यांची ठरलेली मजूरी दिली की उत्पन्न मालावर त्याची मालकी प्रस्थापित होई. त्याने तो माल बाजारात विकायला नेला म्हणजे तेथे खाजगी उत्पादक कारागिराचा माल व भांडवलदार उत्पादकाचा माल यांच्यात किंमतीत चढाओढ होई. भांडवलदार उत्पादकाचा माल, त्याचा उत्पादनखर्च कमी असल्याने कमी किमतीला खपून कारागीर उत्पादकाचा माल खपलाच नाही, अथवा नुकसानीत गेला, व सदर कारागिराचा धंदा बुडून तो भांडवलदाराच्या दारी कामगार म्हणून रोजगारीसाठी उभा राहिल असा प्रकार सर्रास घडू लागला.

इकडे भांडवलदाराला नफा अधिक मिळून त्याचे भांडवल वाढत होते. वर दाखविल्याप्रमाणे मजुरांचीही संख्या वाढत होती. जुनी वैयक्तिक कारागिरी सर्व क्षेत्रात

याप्रकारे लयाला गेली आणि मजुरांच्या श्रमविभागावर आधारलेली भांडवलदारी कारखानदारी सुरू झाली. हळूहळू यंत्र आणि शास्त्र यांचा शिरकाव या कारखानदारीत झाला. यात उत्पादनखर्च कमी आणि गुणात व प्रमाणात माल अधिक चांगला, हे या उत्पादनाचे वाढत्या प्रमाणावर वैशिष्ट्य होते.

इंग्लंडच्या जीवनात याने जो सामाजिक पालट झाला तो फार महत्त्वाचा होता. एकूण मालाचे उत्पादन वाढत होते, माल अधिकाधिक सुबक निघत होता. जुन्या कारागीर-उत्पादकांचा धंदा उद्ध्वस्त होऊन ते बेकार होत व कारखानदाराच्या दारी रोजगारीस येत. मालाचे उत्पादन ज्या वेगाने वाढे त्या वेगाने मालाची मागणी वाढत नसल्याने कामगारांना बेकारीच्या धाकात घालून कमीत कमी रोजगारीवर त्यांना अगदी पिळून काढण्यात येई. अनेकांना बेकारीही येई.

## भांडवलशाही आर्थिक विकासाचे परिणाम

पण या प्रकाराने माणसांच्या हातून, संपत्तीची निपज अफाट होऊ लागली, जगाच्या आरंभापासूनच्या हजारो वर्षांत माणसांनी संपत्तीचे दारिद्र्य भोगल्यानंतर अचानक हा संपत्तीच्या विपुलतेचा कालखंड आला होता. आता संपत्ती वाढू लागली याचबरोबर काही माणसे फार धनवान होऊ लागली. उलट प्रचंड बहुसंख्य जनतेचा खाजगी धंदा जाऊन निवळ मजुरी करण्याची अथवा बेकार राहण्याची पाळी त्या जनतेवर आली. याचा परिणाम असा झाला की कमीत कमी रोजगारी त्यांना मिळत असल्याने लोक दरिद्री झाले, बाजारातील वस्तूंचे ढीगच्या ढीग त्यांना खरेदी करता येईनात. ही जी इंग्लंडात न खपणारी संपत्ती बाजारात पडून राही ती मग इंग्लंडबाहेर युरोपीय देशात, किंवा भारतासारख्या मागासलेल्या देशात जाऊ लागली. भांडवलशाही उत्पादनाच्या या वाढत्या उत्पादनाला स्वदेशातील बाजारात, खरेदीशक्ती कमी असल्यामुळे, गिऱ्हाईक मिळत नसे; म्हणून हा माल युरोपातल्या बाजारात जाई, भारतासारख्या मागासलेल्या प्रदेशात जाई व तेथल्या तेथल्या जुन्या कारागिरीचा पराभव करून तो बाजार काबीज करी.

यामुळे दोन प्रकारचे धक्के बाहेरच्या जगास बसले व जगाची अर्थसंघटना आणि राज्यसंघटना पालटू लागली. जर्मनीसारख्या राष्ट्रांनी इंग्लंडच्या भांडवलशाही मालाचे आक्रमण थांबविण्यासाठी संरक्षक जकातींची तटबंदी उभारुन ब्रिटिश मालाच्या आयातीस प्रतिबंध केला व स्वदेशात सुधारलेले भांडवलशाही उत्पादन सुरू करून ब्रिटिश भांडवलशाहीशी निर्यातीबाबत स्पर्धा सुरू केली. दुसरा धक्का भारतासारख्या मागासलेल्या राष्ट्रांना बसला, तो राजकीय पारतंत्र्य आले हा. स्वकीय भांडवलशाहीला स्पर्धेवाचून कच्चा माल खरीदता यावा व स्पर्धेवाचून पक्क्या मालाचा बाजार मिळावा यासाठी भारतासारख्या राष्ट्रावर साम्राज्यसत्ता स्थापणे ब्रिटनला इष्ट वाटले. पण या दोन धक्क्यांनी साऱ्या जगास एक तिसरा राजकीय धक्का दिला. तो म्हणजे पहिले जागतिक

महायुद्ध होय. ब्रिटनने हक्काचे बाजार मिळविण्यासाठी भारतासारख्या विस्तीर्ण राष्ट्रावर साम्राज्यसत्ता स्थापल्यामुळे जर्मनीलाही आपल्या साम्राज्यसत्तेसाठी विस्तीर्ण क्षेत्र मिळविण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. ही क्षेत्रे आफ्रिकेत व आशियात असून जर्मनीची ही महत्त्वाकांक्षा ब्रिटनच्या साम्राज्यावर व साम्राज्यमार्गावर आघात करणारी होती. तेव्हा ब्रिटनशी युद्ध अपरिहार्य आहे असे ओळखून जर्मनीने शस्त्रास्त्रवाढ केली व युद्धसज्जता वाढविली. यातून पहिले जागतिक महायुद्ध ओढवले.

या युद्धात जर्मनीचा पराभव झाला खरा. पण त्या युद्धाचे साऱ्या जगावर विविध परिणाम झाले. जपान व अमेरिका ही दोन भांडवलशाही उत्पादनाची राष्ट्रे पहिल्या महायुद्धानंतर पुढे आली. कालांतराने जर्मनीची भांडवलशाही पुन्हा बलाढ्य झाली. इटालीची भांडवलशाही बलवान होऊन साम्राज्याकांक्षा दाखवू लागली. इकडे पहिले महायुद्ध चालू असता रशियात कम्युनिस्ट क्रांती होऊन साऱ्या जगाच्या राजकारणात नव्या वैचारिक खळबळीचा व सामाजिक उलथापालथीचा एक विषय जगापुढे आला.

## भांडवलशाहीत युद्धे अनिवार

जगाला हादरे देणाऱ्या या साऱ्या घटना भांडवलशाही उत्पादनपद्धतीतून निर्माण झाल्या, हे वरील निवेदनावरून स्थूलमानाने समजून येते. पण येथे थोडे अधिक खोलात जाऊन त्यातला कार्यकारणभाव समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. इंग्लंडात गेल्या दीडदोनशे वर्षांपूर्वी भांडवलशाही उत्पादन सुरू झाल्याचा वर उल्लेख केला आहे. तेव्हापासून माणसाच्या विकासशील कृतीचा वेग वाढला. छापण्याची साधने, आगगाड्या, तारायंत्र, आगबोटी, मोठी शस्त्रास्त्रे या सर्वांत माणसाने विलक्षण वाढ केली. यामुळे माणसांचे धन व धनोत्पादनसामर्थ्य वाढले, देशादेशांमधील अंतरे कमी होऊन, व जगाच्या सर्व टोकांपर्यंत ज्ञान पोचून जग एक होऊ लागले. पण त्याचबरोबर भांडवलशाही देशात प्रचंड बहुजनांचे दारिद्र्य, बेकारी व पिळणूक ही वाढली आणि साऱ्या जगाला सर्वविध्वंसक युद्धाच्या भीतीने ग्रासले. हे असे का व्हावे? संपत्ती निर्मिण्याची माणसाची शक्ती जर वाढली, व संपत्ती हेच जर सुखाचे साधन, तर संपत्ती वाढत असता युद्ध आणि दारिद्र्य ही संकटे माणसावर का यावी?

आपण भांडवलशाही उत्पादनाचे स्वरूप समजून घेताना एक गोष्ट पाहिली ती ही की, भांडवलशाहीत उत्पादनवाढ होते, त्याचबरोबर मजुरामजुरांत रोजगारीसाठी चढाओढ लागून मजुरांना कमीत कमी मजुरीवर राबविले जाते. समजा, इंग्लंड नावाच्या देशात दीडशे वर्षांपूर्वी सर्व उत्पादन या भांडवलशाही पद्धतीने सुरू झाले, तर त्याचा परिणाम काय होईल? या भांडवलशाहीने खूपखूप माल निर्माण केला असे समजू. तो कोण खरेदी करतील? इंग्लंडातले लोकच खरेदी करतील हे उघड आहे. आता, या लोकात अगदी मूठभर लोक भांडवलदार व बाकीचे प्रचंड बहुसंख्य लोक मजूर आहेत. भांडवलशाहीच्या पद्धतीनुसार या मजुरांनी जास्तीत जास्त माल निर्माण

केला, पण त्यांना मजुरी मात्र कमीत कमी मिळाली. मजुरीतून ते लोक भांडवलशाहीने निर्मिलेला सारा माल खरीदू शकले नाहीत. त्यांना मिळालेल्या साऱ्या मजुरीने म्हणजेच खरेदीशक्तीने त्यांनी काही माल खरीदला व नंतर खूपसा उरला. याचे आता काय होईल ? विकत घेतलेला माल खरेदीदारांनी खाऊन पिऊन संपविला. तरी आणखी पुष्कळ माल बाजारात आहे. तो त्या मजुरांना खरीदायला हवा आहे. पण तो खरेदी करण्याला त्यांच्याजवळ आता पैसा म्हणजे खरेदीशक्तीच नाही. म्हणून भांडवलदाराचा माल खपत नाही. मग भांडवलदार काय करील ? भांडवलदार नवीन माल निर्माण न करता कारखाने बंद ठेवील. उद्योगधंद्यावर मंदीची छाया पसरेल, यामुळे मजूर बेकार राहतील व त्यांच्यापाशी खरेदीशक्ती नसल्याने न खपलेल्या संपत्तीच्या शेजारी उघडेवाघडे, उपाशी तडफडत मरतील हे अपरिहार्य वाटते.

पण इंग्लंडात दीडशे वर्षांपूर्वी असे घडले नाही याचे कारण काय? याचे कारण असे, की भांडवलशाही देशांतल्या बाजारातला न खपलेला माल जर्मनीसारख्या मागासलेल्या राष्ट्रात, भारतासारख्या मागासलेल्या राष्ट्रात गेला. ब्रिटिश मालाला परदेशी मागणी वाढत गेल्यामुळे ब्रिटिश भांडवलशाहीने उत्पादनपद्धती सुधारली, कामगारांची स्थितीही तौलनिक दृष्ट्या सुधारली आणि ब्रिटनने शस्त्रबलाने जगात आपले साम्राज्य स्थापले. ब्रिटनमध्ये जी बेकारी, उद्योगधंद्यांची मंदी व उपासमार येणे शक्य व अपरिहार्य झाले असते असे वर म्हटले, ती मंदी ब्रिटनला ब्रिटन-बाहेरचा बाजार हस्तगत करता आल्याने टाळता येऊन जगात वैभवाने व पराक्रमाने मिरवता आले. पण पुढे ब्रिटनसारखी भांडवलशाही-साम्राज्यशाही स्थापण्याची आकांक्षा जर्मनीने धारण केली व त्यातून भयानक असे पहिले महायुद्ध झाले. युद्धकाळी रशियात कम्युनिस्ट क्रांती झाली. युद्धानंतर जपान, अमेरिका वगैरे नवी भांडवलशाही राष्ट्रे पुढे येऊन या अनेक देशांत धनोत्पादनाची वाढ अतोनात होऊ लागली. त्याच बरोबर बाजारस्पर्धा व शस्त्रास्त्रस्पर्धाही वाढून जागतिक शांततेला व वाढत्या वैभवाला धोकाही वाढला. शिवाय वर संभाव्य म्हणून उल्लेखिलेली जी आर्थिक मंदी ब्रिटनमध्ये टळली ती अखेर साऱ्या जगावर आलीच.

भांडवलशाहीत आर्थिक कारणाने युद्ध अपरिहार्य कसे होते हे येथे समजून घेऊ. स्वदेशात जेवढा माल भांडवलशाही उत्पन्न करते त्यापेक्षा फार कमी प्रमाणात खरेदीशक्ती वाटते. त्यामुळे, भांडवलशाहीला, आपण उत्पन्न केलेला सर्व माल खपविण्यासाठी, स्वदेशीय उत्पादन-वर्तुळाबाहेरचे वर्तुळ बाजारासाठी राजकीयदृष्ट्या व्यापावे लागते. कालांतराने, या बाहेरच्या वर्तुळातील जुन्या उत्पादनपद्धती स्पर्धेत नष्ट होऊन तेथे भांडवलशाही उत्पादनाचे नवे वाढलेले वर्तुळ निर्माण होते. त्यामुळे साम्राज्यशाही राष्ट्राला बाजारासाठी आणखी बाहेरचे वर्तुळ गाठावे लागते. त्याच वेळी दुसऱ्या भांडवलदारी राष्ट्रांचीही अशी वर्तुळे वाढू लागतात. हीच साम्राज्यसत्तांची वाढ होय. ही वाढ चालू असता दोन साम्राज्यसत्तांची वाढती वर्तुळे कोठे तरी एकमेकास छेद देतात

तेव्हा युद्ध होते. सारांश उत्पादनवर्तुळाच्या बाहेरचे वर्तुळ बाजारासाठी मिळविणे, त्याचे नवे उत्पादनवर्तुळ बनवून पुन्हा आणखी बाहेरच्या वर्तुळात बाजारासाठी साम्राज्यसत्ता स्थापणे हे भांडवलशाही उत्पादनास अपरिहार्य होते आणि दोन भांडवलशाही राष्ट्रात ही वर्तुळे वाढविण्याची स्पर्धा सुरू झाली की या दोन प्रक्रियांचा खटका उडून युद्ध अपरिहार्य होते.

पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात सर्व जगात जास्तीत जास्त बलाढ्य व धनाढ्य अशी भांडवलशाही अमेरिकेत होती. ब्रिटन हे लहानसे बेट असून तेथे शेती अगदी कमी झाली व औद्योगिक कारखानेच वाढले. यामुळे कच्चा माल मिळविण्यासाठी व पक्का माल खपविण्यासाठी ब्रिटनला परदेशांची गरज लागली. तेव्हा स्पर्धाविरहित हक्काचे कच्चया-पक्कया मालाचे बाजार हवेत म्हणून ब्रिटनने साम्राज्ये जिंकली, पण त्यामुळेच राजकीय सत्तास्पर्धा वाढून महायुद्ध झाले व ब्रिटनच्या भांडवलशाही साम्राज्यशाहीच्या विकासाला जबरदस्त तडाखा बसला. त्या मानाने अमेरिकन भांडवलशाहीला फार मोकाट रान मिळाले. लोकसंख्येच्या मानाने दक्षिण अमेरिका व उत्तर अमेरिका ही दोन्ही खंडे फार विस्तीर्ण असून शेती व खाणी यांनी अत्यंत संपन्न अशी आहेत. अमेरिका हे राष्ट्र आरंभापासून तेथे नवीन कर्तृत्वासाठी गेलेल्या धाडशी, काटकसरी, कष्टाळू, पराक्रमी अशा युरोपीय लोकांनी भरलेले होते व आहे. त्यांनी दीडशे वर्षांत जगात कोठेही न झाली एवढी भांडवलशाहीची भरभराट केली. दक्षिण अमेरिका खंडातली राष्ट्रे शंभर वर्षांपूर्वी स्पेनपासून स्वतंत्र झाली तरी मागासलेली राहिली. पण कोणाही युरोपीय राष्ट्राला या प्रदेशाचा लोभ बाळगणे अनेक कारणांनी अशक्य झाल्यामुळे अमेरिकेला त्या प्रदेशावर राजकीय साम्राज्य स्थापावे न लागताच कच्चया व पक्कया मालाची हक्काची बाजारपेठ मिळाली. यामुळेच अमेरिकन भांडवलशाहीची भरभराट अपूर्व झाली.

पण तसाच त्या भांडवलशाहीला दोन महायुद्धांच्या दरम्यान मंदीचा तडाखा जो बसला तोही अभूतपूर्व असाच बसला व त्या वेळी साऱ्या जगातील भांडवलशाही राष्ट्रांवर मंदीचे संकट इतिहासात अपूर्व असे आले. महायुद्धाइतकाच हा मंदीचा मुद्दा महत्त्वाचा असल्याने त्याचे येथे थोडेसे विस्ताराने विवेचन करतो.

## १९२९ ची अभूतपूर्व जागतिक मंदी

पहिले महायुद्ध व दुसरे महायुद्ध यांच्या दरम्यान म्हणजे १९२९ पर्यंत अमेरिकेतली भांडवलशाही अर्थसंघटना वैभवाच्या शिखरास पोचली व त्याच वेळी तेथून त्या वैभवाचा कडेलोट झाला असे दृश्य दिसले. त्या वेळच्या परिस्थितीत भांडवलशाहीचे गुण व दोष दोन्ही दिसून येत असून पुढील काळात भांडवलशाहीचे दोष निवारण्याचे जे प्रयत्न झाले त्यांचे स्वरूप त्यावेळेच्या परिस्थितीच्या सिंहावलोकाने कळून येते. १९२८ च्या नोव्हेंबरमध्ये राष्ट्रपतिपदावर आलेला मुत्सद्दी हर्बर्ट हूव्हर त्यावेळच्या परिस्थितीचे वर्णन करताना सांगतो,

"मानव जातीच्या इतिहासात दारिद्र्यावर आज आम्ही जेवढा विजय मिळविला आहे, एवढा विजय कधीच कोणीही मिळविलेला नाही. गरिबांसाठी चालविलेली आश्रमगृहे आता गरज न राहिल्याने लोप पावली असून ती आता कुणाला पाहायलाही मिळत नाहीत. दारिद्र्य संपूर्ण नष्ट करण्याचे ध्येय अजून आम्ही गाठलेले नाही हे खरे, पण संधी मिळाल्यास ईश्वराच्या कृपेने तोही दिवस लवकरच आपल्या दृष्टीच्या टप्प्यात येईल."

आणि याच वेळी दृष्टीच्या टप्प्यापलीकडे अगदी लगत वैभवाच्या कड्यावरून दारिद्र्याच्या खोल अंधारदरीत अमेरिका लोटली जाणार आहे याची कोणालाही कल्पना नव्हती. त्यावेळी जो तो वैभवाच्या आकाशाकडे टक लावून पाहात बसला होता. अमेरिकन रोखेबाजारात नफेबाजीला महापूर आला होता. अमेरिकेत तेव्हा बारा कोटी लोकसंख्या होती. त्यातील एक कोटी लोकांनी शेअरबाजारात पैसे गुंतविले होते. खाजगी व सरकारी कर्जरोख्यांच्या किमती अफाट नफ्याच्या अपेक्षेने सतत वाढत होत्या. दुपारी खरेदी केलेल्या रोख्यांच्या किमती संध्याकाळी वाढून ते पुन्हा विकले जात; त्यांच्या किंमती दुसरे दिवशी पुन्हा वाढत व ते पुन्हा कोणी तरी खरेदी करी. हा एक विनाश्रम अफाट नफा मिळण्याचा मार्ग आपणाला सापडला आहे असा भ्रम लोकांना झाला होता. श्रीमंतांचे ड्रायव्हर आणि शिपाईही मालकामागोमाग रोखेबाजारात खरेदीविक्री करून काही तासात स्वतः श्रीमंत होऊ लागले होते. रोजच्या रोज शेकडों कोटी डॉलर्सचे रोखे विकले-खरीदले जात आणि त्यांच्या किमतींच्या वाढीचा वेग इतका वाढला होता की पूर्वी बारा महिन्यांत झालेल्या वाढीइतकी वाढ एकेका महिन्यात होऊ लागली होती. महिन्याच्या आरंभी हजार डॉलर गुतविणाऱ्याला महिनाअखेर दोन हजार मिळत, यामुळे गरीब लोकही कर्जे काढूनही अचानक वाढू लागलेली संपत्ती हावरेपणाने बकाबका खाऊ लागले होते. पण हजारो लोक एखाद्या उंच कड्याच्या टोकावर चढून दूर क्षितिजावरचे काही तरी मनोहारी दृश्य पाहण्यात दंग झाले असता तो कडा त्या साऱ्या माणसांसह कोसळावा त्याप्रमाणे मंगळवार ता. २९ ऑक्टोबर १९२९ रोजी न्यूयॉर्कच्या रोखेबाजारात एकदम साऱ्याच रोख्यांच्या किंमती खाली घसरू लागल्या, खरेदीवाले बाजारात येईनात, विक्रीवाल्यांचीच गर्दी झाली, सकाळचे लक्षाधीश संध्याकाळी कफल्लक झाले, ज्या सावकारांनी खरेदीदारांना भारी व्याजाने रकमा दिल्या होत्या त्यांच्यासमोर त्या देणेकरांनी खाका वर केल्या व सावकार व्याजमुदलासह सफा झाले. एक वर्षभर वाढलेली दौलत एका दिवसात भुईसपाट झाली. काही थोड्या आठवड्यांत तीस अब्ज डॉलर्सची राखरांगोळी झाली. अमेरिकेतल्या साऱ्या अर्थव्यवहारावर एकदम सुतकाची छाया आली. शहरातून नेहमी आढळणारी रस्त्यावरची गर्दी-धावपळ एकदम कमी झाली. दुकानातले गिऱ्हाईक घटले. रस्त्यावर भिकारी हिंडू लागले. रेल्वेतले उतारू घटले. कारखान्यांतल्या धुराड्यांतून धूर येईना. उबदार कपडे खरीदायला पैसा नाही, बाहेर काही कामही नाही, म्हणून घरोघर लोक उबेसाठी

शेकोटीजवळ बसून राहू लागले. साऱ्या अमेरिकन अर्थसंघटनेला या मंदीने मरगळ आली.

या अनर्थाचे तात्कालिक कारण रोखेबाजार अचानक कोसळला हेच होते. धन उत्पन्न करण्याऐवजी केवळ पैशाच्या उलाढालीने एकदम श्रीमंत होता येते असा भ्रम सार्वत्रिक पसरला होता. पैसेवाले फंदाईत लोक पैशाच्या बळावर एखाद्या कंपनीचे थोडेसे शेअर्स घेऊन कंपनीवर ताबा मिळवीत, त्या कंपनीचे पैसे वापरून आणखी कंपन्या जिंकून घेत, जाहिरातबाजीने रोख्यांच्या किंमती वाढवीत. पण यांच्या तळातला एखादा कारखाना नुकसानीत आला की बाजाराचा हा सारा उंच डोलारा कोसळणे अपरिहार्यच होते व तसेच घडले. पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात युरोपीय राष्ट्रांतील धंदेवाल्यांना अमेरिकेने कर्जे दिली होती; युरोपातील व अमेरिकाखंडातील राष्ट्रांना कर्जे देणाऱ्या कंपन्या अमेरिकेत निघाल्या होत्या. ही युरोपीय कर्जे व अमेरिकेतील धंद्यांचे बँकांचे रोखे यांचा बाजार इतर विक्रीमालाच्या बाजारापेक्षा अधिक भरभराटीचा झाला होता. शेवटी युरोपातली कर्जे वसूल होणे कठिण दिसू लागले, अमेरिका खंडातील कानडा, अर्जेंटिना वगैरे राष्ट्रांच्या शेतीमालाच्या किमती घसरू लागल्या आणि बाजारातील विश्वास अचानक नाहीसा होऊन रोखेबाजार कोसळला.

ही आर्थिक मंदी फक्त रोखेबाजारापुरतीच मर्यादित होती काय, अशी शंका या मंदीबाबत अनेकांनी घेतली आहे. रोखेबाजारात नेहमी जुगारी वृत्ती वावरत असते व किमती कृत्रिम प्रचाराने चढवून अथवा उतरवून बाजारात गोंधळ उडविला जातो. असा प्रकार मधूनमधून होतो व सरकार विविध नियंत्रणे निर्माण करून अशा आर्थिक संकटास आळा घालण्याचा प्रयत्न करते, तरी पण मधूनमधून मोठे धक्के बसून लोकांचे खूप नुकसान होतेच. पण एकूण अर्थसंघटना शाबूत असल्यास रोखेबाजारांतील धक्क्याने आलेली मंदी दीर्घकाळ टिकत नाही व सार्वत्रिक होत नाही. पण १९२९-नंतर अमेरिकेत आलेली मंदी अमेरिकेत पुढील दहा वर्षे टिकली व सारे तत्कालीन भांडवलशाही जग त्या मंदीत सापडून अधिकाधिक दरिद्री होत गेले. अमेरिकेचे राष्ट्रीय उत्पादन १९२९ साली १०४ अब्ज डॉलर होते ते १९३३ साली ५६ अब्ज डॉलरपर्यंत खाली उतरले. या क्रमात बेकारी वाढणे अपरिहार्यच झाले. १९२९ साली १५ लक्ष लोक बेकार होते. पण १९३३ साली ही संख्या त्याच्या आठपट झाली. एकंदर देशात घरबांधणी ९० टक्के घटली. बँका बंद पडल्या व ठेवीदारांची ९० लाख खाती बुडाली. ८५ हजार धंदेवाले बुडाले. कारखान्यात, खाणीत वगैरे सर्वत्र मजुरीचे दर खूप खाली आले. केंटकी राज्यातील खाणीकामगार गुरांचे गवत खाऊ लागले. पश्चिम व्हर्जिनियात धान्यासाठी दुकाने लुटण्यात येऊ लागली. १९३२ पासून दुसरे महायुद्ध सुरू होईपर्यंत सरकारने या मंदीचा जोर मोडून काढण्यासाठी अनेक उपाय केले, पण मंदी फारशी हटली नाही. यावरूनच ही मंदी केवळ रोखेबाजारातील जुगारामुळे आलेली नसून एकूण अर्थसंघटनेतच दोष उत्पन्न झाला असला पाहिजे ही गोष्ट अर्थशास्त्रज्ञांना व राज्यकर्त्यांना लक्षात घ्यावी लागली.

असा पुरावा मिळण्यास वेळ लागला नाही. शक्तिपात व्हावा त्याप्रमाणे साऱ्या अर्थसंघटनेतील शक्ती सर्वत्र नाहीशी झाली असल्याचे दिसून आले. अर्थसंघटनेचा हा ऱ्हास पूर्वीच्या काही वर्षांपासून चालू होता. पहिले महायुद्ध संपल्यानंतर १९२० पासून अमेरिकन कारखानदारी जरी वाढत होती तरी शेतीमालाच्या किमती पडू लागल्या. शेतकऱ्यांना कर्जापोटी जमिनी विकाव्या लागून शेतकरी आपल्या जमिनीवर कूळ होऊ लागले. कारखाना-मजुरापेक्षा शेतीमजुराची मजुरी कमीच असे. १९१० साली कारखानामजुराच्या ४० टक्के मजुरी शेतीमजुराला मिळे. १९३० साली हे प्रमाण ३० टक्याखाली आले. पुढील काळात दोन्ही क्षेत्रांत बेकारी वाढली व मजुरी घटली.

याचे कारण अंशतः शेतीव्यवसायाच्या स्वरूपात आहे. शेतकरी हा सर्वच देशात पहिल्या महायुद्धापूर्वीपर्यंत शहरी कारखानदारी-मजुरापेक्षा मागासलेला असे. नवे कारखाने, नवी रेल्वे इत्यादी आधुनिक साधने निर्माण होऊ लागली तेव्हापासून शेतकऱ्याच्या हिताची अबाळ होऊ लागली. अमेरिकेत औद्योगिक सुधारणा होऊ लागताच शेतीचा विकासवेग कमी झाला. शेतीच्या प्रगतीच्या काळातही शेतीची मशागतपद्धती सुधारण्याऐवजी क्षेत्र वाढविण्यावर भर दिला जाई. १९१० ते १९२० या काळात अमेरिकेत बिगरशेती उत्पादन वीस टक्क्यांनी वाढले तर शेतीचे उत्पादन दर एकरी घटलेच. १९२० ते १९३० या काळात शेतीचे उत्पादन दरमाणशी वाढले. पण कारखान्यांच्या उत्पादनवाढीच्या मानाने हे उत्पादन कमीच होते. शिवाय शेतीत उत्पादनवाढ होण्याने शेतीची परिस्थिती सुधारणार होती असे नव्हे. कारखानदारी मालाचे उत्पादन व शेतीमालाचे उत्पादन यांत बाजाराच्या दृष्टीने एक महत्त्वाचा फरक असतो. कारखानदारीचे उत्पादन वाढून उत्पादनखर्च घटला तर माल स्वस्त होतो व यामुळे त्याचा खप वाढतो. पण अन्नधान्य व इतर शेतीमाल यांचे उत्पादन वाढून उत्पादनखर्च घटला व स्वस्ताई झाली तरी लोक अधिक अन्न खाऊ लागत नाहीत. यामुळे अधिक झालेले अन्नधान्य खपले नाही की किंमती अफाट कोसळतात व शेतीचा धंदा नुकसानीतच येतो. पहिल्या महायुद्धात युरोपातील शेती बुडाली आणि अमेरिकन धान्याची मागणी वाढून किंमती खूप वाढल्या. युद्ध संपताच युरोपचे गिऱ्हाईक गेले आणि १९२०-२१ साली अमेरिकन अन्नधान्याची किंमत चाळीस टक्के घसरली तरी धान्य स्वस्त मिळते म्हणून लोकांनी काही अधिक खरेदी केले नाही. उलट शेतीवरील कर वाढत गेला आणि कारखानदारी मालाच्या किंमती फारशा न उतरल्यामुळे शेतकऱ्याला खरीदावा लागणारा माल महागच पडला. शेतीचा धंदा खालावला म्हणून शेतकरी इतर धंद्यात बहुसंख्येने गेले असतील म्हणावे तर तेही घडले नाही. १९१० ते १९३० या काळात एक कोटी शेतकरीकुटुंबे शेतीवर होती व त्यांतील जवळजवळ निम्म्या लोकांना आपल्या पोटापुरते उत्पादन करण्याहून अधिक करण्याला वाव नव्हता.

शेतीत आलेल्या या मंदीचा फटका हळूहळू कारखानदारीलाही बसू लागला. कारण शेतकरी हा लोकसंख्येत एकपंचमांश असून त्याला गरिबी आल्याने त्याची खरेदीशक्ती घटली व ट्रॅक्टर, मोटारगाड्या, गॅसोलिन, विजेच्या मोटारी इत्यादी औद्योगिक मालाचे गिऱ्हाइक घटले. कारखान्यांच्या उपभोग्य मालाचेही शेतकऱ्यांतले गिऱ्हाईक घटले.

१९२०-१९३० या कालात कारखानदारीत यांत्रिक व तांत्रिक शोध लागून उत्पादनाचा वेग वाढत गेला. पण त्याचा माणसांवर परिणाम वाईटच झाला. कारण उत्पादनवाढीच्या प्रमाणात रोजगारी न वाढता मजुरीचे उत्पन्न कमी कमीच होत गेले. १९२० ते १९२९ या काळात अमेरिकेतले कारखानदारी उत्पादन नवीन यांत्रिक व शास्त्रीय शोधामुळे ४९ टक्क्यांनी वाढले, तरी एकूण रोजगारी मुळींच वाढली नाही. खाणीचे उत्पादन ४३ टक्क्यांनी वाढले. पण रोजगारी उलट १२ टक्क्यानी घटलीच; वाहतूक व वीजधंद्यात उत्पादन वाढले पण रोजगारी घटली. १९२० ते १९२९ या काळात दरमाणशी कार्यक्षमतेची वाढ वाहतूकधंद्यात ३० टक्के, खाणधंद्यात ४० टक्के व कारखानदारीत ६० टक्के झाली. यामुळे मजुरीचे दर वाढले का? त्याकाळी कामगार-संघटना अगदी दुर्बल असल्याने मजुरीचे दर वाढले नाहीत. रेल्वेत कामगारसंघटना असल्याने रेल्वेकामगारांच्या पगारात फक्त ५ टक्के वाढ झाली. खाणकामगारांचे पगार २० टक्के घटलेच. उत्पादनाचा वेग वाढत होता तसे कामाचे तास घटत होते व अर्थात कामगारांचे पगार घटत होते. खाणी, वाहतूक, कारखानदारी या सर्व क्षेत्रांत उत्पादनाचा वेग दरमाणशी दरताशी वाढत होता, तशी मजुरीची मिळकत घटत होती. वाहतुकीचे दर व कारखानदारी मालाच्या किंमती यात घट होत होती. शेतीमालाच्या किंमती ज्या वेगाने घसरत होत्या त्या वेगाने कारखानदारी मालाची किंमत उतरली नाही. यामुळे उत्पादनवाढीचा वेग वाढला याचा फायदा शेतकरी समाजाला घेता आला नाही. आणि शेतकऱ्यांची खरेदी घटल्यामुळे शेतीच्या मागोमाग कारखानदारीतही मंदी येऊ लागली. एकंदर समाजाची उत्पादनक्षमता व उत्पादन झालेली संपत्ती यांची वाढ होत असता बहुजनसमाजाचे दारिद्र्य वाढत होते. आणि श्रमजीवी असा जो बहुजनसमाज त्याची रोजगारी वर वर्णिल्याप्रमाणे घटत असता भांडवलदार कारखानदारांचे नफे वाढत होते. १९२९ साली अमेरिकेत दर कुटुंबात एक लक्ष डॉलर अथवा अधिक वार्षिक मिळकत असणाऱ्या पंधरा हजार सधन कुटुंबांना जेवढी मिळकत होत होती, तेवढीच साठ लक्ष कुटुंबांना होत होती.

प्रचंड बहुसंख्य समाजाला कमी मिळकत होत होती आणि फार थोड्या लोकांना पुष्कळ मिळकत होत होती, याचा समाजाच्या एकंदर आर्थिक व सामाजिक जीवनावर आणि अर्थसंघटनेवर विशिष्ट परिणाम होत होता. पूर्वीच्या काळी संपत्ती कमीच निर्माण होत असे, यामुळे बहुसंख्य समाजाने दरिद्री राहणे हे अपरिहार्यच होते. पण आता माणसाचे संपत्ती निर्मिण्याचे सामर्थ्य अफाट वाढले तरी बहुसंख्य

समाजाला संपत्तीचा उपभोग घेण्याचे भाग्य लाभेना. संपत्तीची वाटणी विषम होत होती असे जे वर म्हटले आहे ते बहुसंख्य समाजाला संपत्ती न मिळण्याचे कारण होते. कारण उत्पन्न होणारी संपत्ती कोणासही फुकट मिळणार नव्हती. ती विकत घेणे जरूर होते. पण वर म्हटल्याप्रमाणे मिळकतीची म्हणजे खरेदी शक्तीची वाटणी विषम होत होती. पंधरा हजार श्रीमान कुटुंबांना जेवढी मिळकत होती तेवढीच साठ लाख दरिद्री कुटुंबांना होत होती.

या विषमतेतून आर्थिक मंदी कशी येते हे येथे पाहू. साठ लाख कुटुंबांना प्रत्येकी १ रुपया मिळकत आहे असे समजू. म्हणजे साठ लाख कुटुंबांना एकूण ६० लाख रुपये मिळाले तर दुसऱ्या पंधरा हजार कुटुंबांना ६० लाख रुपये मिळाले असे ठरते. म्हणजे या दुसऱ्या कुटुंबांना दर कुटुंबामागे ४०० रुपये मिळाले. आता ही एकूण १२० लाख रुपये किंमतीची मालरूपी संपत्ती जी निर्माण झाली त्यातली ६० लाखाची संपत्ती साठ लाख कुटुंबांनी खरेदी घेतली असे समजू. आता बाकीची पंधरा हजार कुटुंबे उरलेली ६० लाख रुपयांची संपत्ती खरीदतील का? येथे वस्तुस्थिती घडते ती अशी की साठ लाख कुटुंबांना ६० लाख रुपयांची मालरूपी संपत्ती उपभोगण्याला अत्यंत अपुरी पडते. पण उलट दुसऱ्या पंधरा हजार कुटुंबांना ६० लाख रुपयांची संपत्ती खरीदून उपभोगणे म्हणजे दर कुटुंबाने ४०० रुपयांची संपत्ती उपभोगणे शक्यच होत नाही. पहिल्या साठ लाख कुटुंबांनी प्रत्येकी १ रुपया उपभोग्य मालावर खर्च केला तर दुसऱ्या पंधरा हजार कुटुंबांपैकी प्रत्येक कुटुंब प्रत्येकी फार तर १० रुपये खर्च करील. म्हणजे ६० लाख रुपयांच्या मालापैकी फार तर १·५ लाख रुपयांचा माल ही पंधरा हजार कुटुंबे खरेदी करतील. बाकीचा ५८·५ लाख रुपयांचा माल न खपता पडून राहील व साठ लाख कुटुंबांना हा माल उपभोगायला हवा असता त्यांचेजवळ खरेदीशक्तीच नसल्याने त्यांना तो माल खरीदता येणार नाही. पण तो माल खपून जाईपर्यंत नवीन मालनिर्मिती होणे व नवीन रोजगारी मिळणे अशक्य असल्याने संपत्तीच्या ढिगाशेजारी उपाशी राहण्याची पाळी बहुसंख्य समाजाला येईल. स्थूल मानाने अमेरिकेत हेच घडले. १९२९ नंतर अमेरिकेत आलेली मंदी केवळ फक्त अमेरिकेतच आली असे नव्हे तर वरीलसारख्या कारणामुळे साऱ्या भांडवलशाही जगावर आली व ती दीर्घकाल टिकलीही.

पण भांडवलशाही जगावर ही मंदी प्रथमच १९२९ पासून आली होती असेही नव्हे. भांडवलशाही पद्धतीने उत्पादनवाढ सुरू झाली तेव्हापासून ही मंदीही माणसाच्या पाठीस लागली असून संपत्तीच्या वाटणीतली विषमता हेच तिचे कारण झालेले आहे. आरंभी विषमता कमी असेल, पण माणसाचे उत्पादनसामर्थ्य भांडवलशाही पद्धतीने वाढू लागले तेव्हापासून संपत्तीच्या वाटणीत विषमता होऊ लागली व त्यामुळे मंदी हे भांडवलशाहीचे लक्षणच झाले. मंदीतून तेजी व तेजीतून मंदी असा हा क्रम जवळ जवळ एकुणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून चालू राहिला होता. हे मंदी-तेजीचे

चक्र कसे चाले? सोयीकरता वर पंधरा हजार व साठ लाख हे जे आकडे आले आहेत तेच विचारासाठी घेऊ. साठ लाख कुटुंबांनी प्रत्येकी १ रुपयाप्रमाणे ६० लाख रुपयांची मालरूपी संपत्ती खरीदून उपभोगून टाकली व त्यांच्याजवळची खरेदीशक्ती संपली. बाकीच्या पंधरा हजार कुटुंबांनी वर म्हटल्याप्रमाणे प्रत्येकी रुपये १० प्रमाणे फक्त १.५ लाख रुपयांची संपत्ती खरीदली व उपभोगिली. आता बाकीची ५८.५ लाखांची संपत्ती उरली. ही या पंधरा हजार भांडवलदार कुटुंबांच्या खरेदीत येऊ शकते. यात काही भांडवली संपत्ती आहे, काही उपभोग्य संपत्ती आहे. साठ लाख लोकांना रोजगार देण्याला ती संपत्ती थोडीशी अपुरी असल्याने व पंधरा हजार कुटुंबांना उत्पादनाची घाई नसल्याने मजुरीचे दर कमी होत. भांडवलशाहीच्या आरंभकाली ही मंदी फार काळ टिकत नसे. मजुरीचे दर कमी होण्यामुळे नवीन रेल्वेविस्तार, नवीन सडका, नवीन कारखाने, नवीन घरबांधणी इत्यादी कामे निघण्याला भरपूर वाव असल्याने पुन्हा रोजगारी वाढू लागे आणि वाहतूक व दळणवळण अधिक सामर्थ्यवान झाल्यामुळे मागासलेल्या प्रदेशांचे नवे बाजार मिळून भांडवलशाहीत तेजी येई. भांडवलशाही नवेनवे बाजार मिळवीत होती त्या काळात नवीन यांत्रिक शोधांचा परिणाम निदान भांडवली राष्ट्रांत तरी बेकारी वाढण्यात होत नसे; कारण वाढत्या उत्पादनाला बाहेरचा बाजार मिळत असे. आणि दूरदूरच्या क्षेत्रात भांडवलशाही उत्पादनाचा नवा विस्तार होत जाई. यामुळेच निरनिराळ्या भांडवलशाही राष्ट्रांची साम्राज्यविस्ताराबाबाबत स्पर्धा झाली. यातून पहिले महायुद्ध कसे निर्माण झाले हे मागे सांगितले आहे.

पहिल्या महायुद्धानंतर दुसऱ्या महायुद्धाच्या भीतीमुळे सशस्त्र आक्रमण करून नवे बाजार जिंकणे अशक्य झाले. भांडवलशाही राष्ट्रांची संख्याही वाढली. त्याचबरोबर भांडवलशाही राष्ट्रांची उत्पादनशक्ती अफाट वाढून वाटणीतली विषमताही फार वाढली. यामुळे १९२९ ची मंदी साऱ्या भांडवलशाही जगावर पसरली व ती दीर्घकाळ टिकली. शेवटी १९३९ पासून दुसऱ्या महायुद्धाने विध्वंसाची गरज वाढली व उत्पादनाला मागणी वाढून मंदी नाहीशी झाली. पण महायुद्ध हा काही भांडवलशाहीतली मंदी घालविण्याचा आर्थिक उपाय नव्हे. पूर्वीच्या युद्धात नवीन मुलूख जिंकल्याने साम्राज्यवादी राष्ट्रांचा सत्ताविस्तार होऊन त्यांना समृद्धी आली असेल. पण दुसऱ्या महायुद्धाचा शेवट ज्या ॲटमबॉंबने केला त्याने युद्धाचे विध्वंसक सामर्थ्य इतके वाढविले की आर्थिक विकासासाठी युद्ध ही कल्पनाच अनर्थकारक ठरली. पण भांडवलशाहीतली मंदी नाहीशी करून भांडवलशाहीची कार्यक्षमता टिकविण्याचा व वाढविण्याचाही उपाय दुसऱ्या महायुद्धापूर्वी अमेरिकेत सापडू लागला होता. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात तो अनेक राष्ट्रात अमलात येऊन खूपच यशस्वी झाला आहे. त्याची माहिती आता करून घ्यायची आहे.

## रूझवेल्टचे नवे धोरण

४ मार्च १९३३ रोजी अमेरिकेत फ्रँकलिन रूझवेल्ट हा राष्ट्रपती अधिकारावर आला. १९२९ नंतर सुरू झालेली मंदी त्यावेळी जोरात होती. रूझवेल्टचा अधिकार-स्वीकारसमारंभ सुरू होण्यापूर्वी थोडेच तास अमेरिकेतील प्रत्येक बँक दरवाजे बंद करून बसली होती. एक कोटी तीस लक्ष लोक बेकार होते. आधीच्या वर्षी निवृत्त सैनिकांचा पंधरा हजारांचा मोर्चा टिअर गॅस, टँक्स, संगिनी यांचा वापर करून उधळून लावण्यात आला होता. शेतावर सावकारांचे जप्ती अधिकारी गेले असता त्यांच्यापुढे गळफास टांगून ठेवून त्यांना शेतकऱ्यांनी धमक्या दिल्या होत्या, यामुळे इन्शुअरन्स कंपन्या, बँका वगैरेंना कर्जे परत न आली तरी गहाण वस्तूंचा लिलाव करण्याबाबत भीती वाटू लागली होती. धंदेवाल्यांचा एक मोर्चा सीनेट फिनॅन्स कमिटीकडे गेला होता. आपण या मंदीबाबत हताश झालो आहो असे त्या धंदेवाल्यांनी सीनेट कमिटीला सांगितले. एका रेल्वेच्या अध्यक्षाने सांगितले की, "प्रथम एकदा संपूर्ण दिवाळे वाजवू व मग प्रथमपासून पुन्हा अर्थसंघटना उभी करू." सर्व धंदेवाल्यांनी परिस्थितीपुढे हात टेकले होते. पण राष्ट्रपती रूझवेल्ट याने पहिल्या शंभर दिवसांत असे उपाय अमलात आणले की, त्याने अमेरिकन लोकमताला लागोपाठ अनेक धक्के बसले.

रूझवेल्टच्या योजना 'न्यू डील' (नवा उपाय) या नावाने प्रसिद्ध आहेत. त्याने पंधरा विधेयके मंजूर केली. एका कायद्याने सरकारी नियंत्रणाखाली बँका उघडण्यात आल्या. दुसऱ्या एका कायद्याने शेतकऱ्यांना कर्जे देण्यात आली. टेनेसी नदीच्या प्रचंड खोऱ्यात सरकारने कोट्यवधी डॉलर्सची कामे सुरू केली. बँकांच्या ठेवींना काही मर्यादेपर्यंत सरकारने सुरक्षिततेची हमी दिली. रोखेबाजाराच्या कठोर नियंत्रणाचे कायदे करण्यात आले. सरकारने सामाजिक सुरक्षिततेचे कायदे केले, घरबांधणीच्या कार्यात सरकार उतरले व घरबांधणीमंडळ स्थापण्यात आले. कामगार-संघटनांना उत्तेजन देणारे कायदे करण्यात येऊन निरनिराळ्या कारखान्यांत कामगारांची वाढती संख्या संघटनेत सामील होईल अशी व्यवस्था करण्यात आली. किमान मजुरी व कामाचे कमाल तास यांसंबंधी कायदे करण्यात आले. लहान मुलांना नोकरीवर ठेवण्यास बंदी करण्यात आली. शेतकऱ्यांनी शेतीत उत्पादन कमी करावे, व आपसात चढाओढीऐवजी परस्पर सहकार्याने व्यवहार करावे अशी कायद्यात तरतूद करण्यात आली. रूझवेल्टच्या या कायद्यांनी बेकारी मागे हटून आर्थिक व्यवहार भरभराटू लागला. पण अमेरिकन राज्यघटनेचा भंग सरकार करीत आहे अशी अमेरिकन भांडवलदारवर्गात ओरड सुरू होऊन रूझवेल्टच्या नव्या कायद्यांवर सुप्रीम कोर्टात फिर्याद झाली व त्याचे सारे कायदे सुप्रीम कोर्टाने १९३५ साली घटनाबाह्य ठरविले. यानंतर रूझवेल्टने अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करून हे नवे उपाय रूढ केले. पण युद्ध सुरू होईपर्यंत त्याला विरोधच सोसावा लागला. शेवटी युद्धामुळे मंदी जाऊन

युद्धानंतरच्या काळात रूझवेल्टची विचारसरणी ही सरकारच्या अर्थव्यवहाराचा सिद्धान्त व धोरण म्हणून सर्वच लोकशाहीप्रधान राष्ट्रांत स्वीकारण्यात आली. तिने भांडवलशाहीवरील मंदीचे संकट कायमचे टळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रूझवेल्टच्या या धोरणाने भांडवलशाहीत फार मोठी क्रांती झाली आहे.

## 'लेसा फेर' विचारसरणी

रूझवेल्टच्या या विचारसरणीतला सिद्धान्त कोणता व तो लोकहितकारी असताही त्याला विरोध का झाला हे येथे समजून घेतले पाहिजे. भांडवलशाही अर्थसंघटना ही अनिर्बंध स्पर्धेवर आधारलेली होती. प्राचीन काळच्या खेड्यात उत्पादक व गिऱ्हाईक समोरासमोर असून कोणत्या वस्तूचे कोणी किती उत्पादन करावयाचे हे गिऱ्हाइकाची गरज उत्पादकाला माहीत असल्याने उत्पादक ठरवू शकत असे. पण दळणवळण व वाहतूक यांची साधने वाढली, उत्पादनाचे कारखाने भांडवलदारांच्या मालकीत गेले, कारखान्यात उत्पादन झालेला माल मजुरांना मजुरी वाटल्यानंतर कारखानदाराच्या मालकीचा झाला. आता तो माल व्यापारी दूर अंतरावर विक्रीसाठी नेऊ लागला आणि कारखानदाराला लागणारा कच्चा माल असाच दुरून आणावा लागू लागला. उत्पादक व गिऱ्हाईक आता एकमेकांचे डोळ्यासमोर न राहून माल किती निर्मावा, मजूर किती नेमावे, भांडवल किती घालावे यांचा अचूक अंदाज करणे उत्पादकाला अशक्य झाले. येथेच अनिर्बंध चढाओढीचे (लेसा फेर) तत्त्व मार्ग दाखवील असे वाटू लागले. समजा, कापड काढणाऱ्या गिरण्यांनी काही तरी कापड काढले. कापड काढणाऱ्यांनी अनिर्बंध स्पर्धेने माल विकला. ज्याचा माल खपला नाही त्याला थोडे नुकसान येईल. लगेच तो कापडधंद्यातले भांडवल काढून ज्या मालाला मागणी आहे अशा (समजा) साबणाच्या अथवा दुसऱ्या एखाद्या मालाच्या धंद्यात भांडवल घालील. कापडधंद्यात नको झालेले कामगार साबणधंद्यात जातील. म्हणजे धंदेवाल्यांना व कामगारांना अल्पकाळ बेकारी आली तरी एकंदरीने उत्पादनसंघटना व रोजगारी यांना मोठा खंड पडण्याचे काहीच कारण नाही.

पण थोडाही माल न खपण्याने पडून राहील व तो खपेपर्यंत नवीन उत्पादन होणे अशक्य असल्यामुळे बेकारी येईल हे संभवनीय नाही काय? 'नाही' असे या प्रश्नाचे उत्तर 'लेसा फेर'चे पुरस्कर्ते अर्थशास्त्रज्ञ देत. माल खपणार नाही हेच त्यांना मान्य नव्हते. त्यांचे हे उत्तर विचारपूर्वक समजून घेणे जरूर आहे. बाजारात माल न खपता पडून का राहील? प्रत्येक मालाच्या किमतीत मजुरी, खंड, व्याज व नफा हे चार भाग अंतर्भूत असतात. कारखान्याच्या जागेचे भाडे (म्हणजे खंड), भांडवलाचे व्याज, मजुराची मजुरी व कारखानदाराचा नफा यांची बेरीज म्हणजेच वस्तूची किंमत. बाजारात विक्रीसाठी तयार होणाऱ्या वस्तूंची किंमत जेवढी असेल तेवढी खरेदीशक्ती वरील चार स्वरूपांत समाजात वाटली जाते. नंतर ही सर्व खरेदीशक्ती परत

बाजारात येणारच व माल खपणारच. तो पडून का राहील ? सारा माल एकदम खपणार नाही, हे खरे. दूध, अन्नधान्य इत्यादी माल भराभर खपेल. कापड अधिक टिकाऊ असल्याने थोडे उशीरा खपेल, घरेदारे इत्यादी माल आणखी अधिक टिकाऊ असल्याने तो आणखी अधिक उशीरा खपेल. पण साधारण ठराविक काळाने निरनिराळ्या मालाचे उत्पादन, खप, उपभोग, पुन्हा उत्पादन हे चक्र चालणारच. यांतूनही काही थोडा माल खपला नाही तर कारखानदार तो माल पुन्हा निर्माण न करता तेवढे भांडवल दुसऱ्या उत्पादनात घालील व ते मजूरही त्या दुसऱ्या उत्पादनात जातील. म्हणजे उत्पादन व रोजगारी यांत पडणारा खंड हा अल्पकालीन असेल. अप्रतिबंध स्पर्धेच्या अर्थसंघटनेत दीर्घकाल बेकारी राहण्याचे तत्त्वतः काहीच कारण नाही. जो माल उत्पन्न झाला त्याच्या किमतीइतकी खरेदीशक्ती मजुरी, खंड, व्याज, नफा या स्वरूपात त्या त्या लोकांत वाटली जाईल व या सर्वांना माल हवाच असल्याने तो खपून जाऊन नवीन मालाच्या उत्पादनाला सतत मागणी राहील व अर्थात पूर्ण रोजगारीही कायम टिकेल. या अर्थशास्त्रज्ञांच्या मते अप्रतिबंध स्पर्धेत विषमताही असणार नाही. कारण वस्तूंच्या विक्रीत देवारी व घेवारी यांना प्रत्येकी जास्ती मिळावे व कमी द्यावे अशी इच्छा असली तरी प्रत्येकजण केव्हा तरी देवारी व केव्हा तरी घेवारी असतोच, व उभयपक्षी जास्त घ्यावे कमी द्यावे अशी इच्छा असल्याने अखेर सारख्यांचीच देवाणघेवाण होईल.

यामुळे समाजात साधारण आर्थिक समता राहीलच. पण मग प्रत्यक्ष व्यवहारात काही लोक श्रीमान व काही गरीब आहेत असे का होते ? या अर्थशास्त्रज्ञांचे उत्तर यावर असे की, भांडवलदार हे सामान्यतः श्रीमान असतात, पण त्यांनी पोटाला चिमटा घेऊन काटकसर केलेली असते, म्हणून त्यांना नफा मिळतो तो अधिक असतो. धंदा चालवण्याचे काम कौशल्याचे असते म्हणूनही कारखानदारांना नफा अधिक मिळतो. पण भांडवलदाराची ही श्रीमंती समाजाला उपयोगी असते. तो स्वता उपभोग्य माल कमी खरीदून भांडवली माल खरीदतो व कारखाना उभारतो. यामुळेच उत्पादनसंघटना चालू राहाते. म्हणजे भांडवलदाराजवळ अधिक पैसा असतो तो त्याने बचत करून अधिक उच्च दर्जाचे काम करून मिळविलेला असतो व शिवाय हे अधिक धन तो भांडवली माल खरीदण्यासाठी खर्चून उत्पादनसंघटना उभी करतो यामुळेच श्रमी लोकांना रोजगारी व समाजाला धन मिळते. केवळ अप्रतिबंध स्पर्धा व व्यक्तिस्वातंत्र्य असेल तर अशा प्रकारे समतेवर आधारलेली, सर्वांना रोजगार व सर्वांना उपभोग्य माल देणारी समाजव्यवस्था निर्माण होते. असे हे भांडवलशाहीचे तत्त्वज्ञान आहे. मग कामगारांना बेकारी येणे, कारखाने बंद पडणे असे प्रकार घडताना दिसतात ते का ? या ‘लेसा फेर’वादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते कामगारवर्ग हे संघटना करतात व अमुक इतकीच मजुरी हवी असा जेव्हा एकजुटीने हट्ट धरून बसतात तेव्हा ‘अप्रतिबंध स्पर्धेने मजुरीचे दर ठरले पाहिजेत’ या ‘लेसा फेर’

सिद्धांतास बाध येतो, कारखानदारास ते मजुरीचे दर परवडत नाहीत, कारखानदार कारखाने बंद ठेवतो व मग बेकारी येते. म्हणून कामगारांच्या एकजुटीच्या संघटना असू नयेत व सर्व क्षेत्रात अप्रतिबंध स्पर्धा असावी म्हणजे भांडवलशाही संघटनेने समता, पूर्ण रोजगारी व सर्वांना उपभोग्य धन याचा लाभ होईल असे मत भांडवलशाहीचे ‘लेसा फेर’वादी अर्थशास्त्रज्ञ मांडीत. म्हणून रूझवेल्टने बँकांच्या कारभारात हस्तक्षेप केला, शेतीनियंत्रणाचे कायदे केले, कामगारसंघटनांना पोषक कायदे केले, सरकारने स्वतः उत्पादनाची कामे हाती घेतली, या गोष्टी अप्रतिबंध स्पर्धेच्या तत्त्वास म्हणजेच व्यक्तिस्वातंत्र्यास बाधक आहेत व अर्थात अमेरिकन घटनेचा भंग करणाऱ्या आहेत असे अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाने ठरवून रूझवेल्टचे न्यू डीलचे कायदे वर उल्लेखिल्याप्रमाणे रद्द केले.

अप्रतिबंध स्पर्धेवर आधारलेल्या भांडवलशाहीच्या या ‘लेसा फेर’ विचारसरणीस रूझवेल्टच्या अमदानीपूर्वी जवळजवळ शतकभर सोशॅलिस्ट, कम्युनिस्ट वगैरे विचारपंथांनी विरोध सुरू केला होता. त्यांच्या मते भांडवलशाही उत्पादन अप्रतिबंध स्पर्धेवर आधारले तर व्यक्तिस्वातंत्र्य मुळीच राहात नाही आणि विषमता, दारिद्र्य व बेकारी अपरिहार्य होऊन संपत्तीशेजारी माणसे उपाशी राहाणे हेच अनिवार्य होते. भांडवलशाही म्हणजे तरी काय? ‘भांडवल’ या शब्दाचा अर्थ धनोत्पादनसाधन असा केला जातो. या अर्थाने शेतकऱ्याचा नांगर, कोष्टयाचा हातमाग, सुताराची करवत या वस्तु त्या त्या व्यवसायाचे भांडवल ठरतील. पण हे भांडवल स्वता त्या त्या लहान लहान कारगिराच्या मालकीचे असले तर त्यामुळे त्यांची ‘भांडवलशाही’ निर्माण होत नाही. हातमागांच्या जागी कापडगिरणी आली म्हणजे मात्र सारी परिस्थिती बदलते. हातमागवाला स्वता मालक व स्वता मजूरही असून त्याचे उत्पादनच तोकडे असते. त्याचे बाजाराचे क्षेत्र मर्यादित असते. दोन हातमागवाल्यात स्पर्धाही फार थोडी असते. हातमागाच्या जागी गिरणी येणे हा धनोत्पादनसाधनात मूलग्राही फरक झाल्याचा प्रकार असून त्याने समाजरचनेतही फरक पडतो. आता गिरणी एकाच्या मालकीची असते व शेकडो हजारो माणसे निवळ मजूर होतात. गिरणी हे जे नवे उत्पादनसाधन ते फार खर्चाचे भांडवल असते. पूर्वी एकेक हातमागवाला दर डोई जितके कापड काढत असे त्याच्यापेक्षा कित्येक पट अधिक कापड आता गिरणीत सर्व कामगार मिळून काढतात. कामगारांना मजुरी मिळाल्यानंतर ते सर्व कापड त्या गिरणीमालकाच्या मालकीचे होते. या मालाचा बाजार आता संकुचित राहिलेला नसून वाहतुकीच्या व दळणवळणाच्या वाढलेल्या साधनामुळे तो दूरवर पसरतो. आता कामगार व गिरणी मालक यांच्यात खुली स्पर्धा आहे असे मानले तरी कामगाराला योग्य वाटेल एवढी मजुरी न मिळाली तर एखादा हातमाग चालवून तो गिरणीमालकाशी स्पर्धा करू शकत नाही. अथवा गिरणी काढण्याचा प्रचंड खर्च करून तो गिरणी स्थापन करू शकत नाही. आणि चरितार्थाला

दुसरे साधन नसल्याने गिरणीमालकाच्या दाराशी नोकरी मागण्यास जाणे हे त्याला अवश्यच असते. याचाच अर्थ त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा लोपच झालेला असतो. गिरणीची उत्पादनशक्ती अफाट असून बाजाराचे दूरवर विस्तारत असलेले क्षेत्र उत्पादनाच्या वाढत्या प्रमाणापेक्षा कमी वेगाने वाढत असल्याने व गिरणीशी चढाओढीत न टिकलेले कोष्टी अधिकाधिक संख्येने बेकार होत असल्याने गिरणीला हवेत त्यापेक्षा अधिक मजूर तिच्या दाराशी रोजगारी मागण्यासाठी नेहमीच जमतात. अर्थात त्यांच्यात चढाओढ लावून भांडवलदार-कारखानदार त्यांना कमीत कमी मजुरी देतो व त्यांच्याकडून अधिकाधिक माल निर्मून घेतो. उत्पादनाच्या सर्व क्षेत्रात अशाप्रकारे प्रचंड उत्पादनसामर्थ्याचे व प्रचंड खर्चाचे भांडवल कार्यान्वित झाले म्हणजे त्या उत्पादनप्रकारास भांडवलशाही असे म्हणायचे. या उत्पादनप्रकारास भांडवलशाही का म्हणायचे? ज्याच्या मालकीत मोठे भांडवल असते त्याची सत्ता समाजाच्या रोजगारीवर म्हणजेच जीवनावर स्थापन होते म्हणून ही भांडवलशाही उत्पादनसंघटना होय.

भांडवलशाही उत्पादनपद्धतीचे फार मोठे सामाजिक परिणाम इतिहासात घडून आले आहेत. भांडवलदाराला बाजाराचे क्षेत्र वाढवावे लागते व त्यातून साम्राज्य-शाही व जागतिक युद्ध या गोष्टी कशा निर्माण झाल्या हे मागे सांगितले आहे. युद्धाने काही काळ बेकारी हटते. पण युद्ध हा काही निरंतर चालणारा अर्थसंघटने-तला एक प्रकार नव्हे. युद्ध संपले की भांडवलशाहीतला अंगभूत दोष अधिक स्पष्ट होतो. भांडवलशाही उत्पादनाचे मुख्य लक्षण कोणते? भांडवलशाहीचे उत्पादन-साधन अफाट उत्पादनसामर्थ्याचे असते, अफाट खर्चाचे असते, ही उत्पादनसाधने थोड्यांच्याच मालकीची होऊ शकतात, प्रचंड बहुसंख्य समाजाला मजूरच व्हावे लागते, व चढाओढीने रोजगारी मिळवावी लागते, या मजुरांना कमीत कमी मजुरीवर भांडवलदार वर्ग राबवितो व त्यांचेकडून जास्तीत जास्त माल निर्मितो, भांडवलशाहीच्या उत्पादनक्षेत्रात राबणाऱ्या मजुरांना कमीत कमी मजुरी वाटलेली असल्याने व जास्तीत जास्त माल निर्मिला असल्याने उत्पादन झालेला माल खपत नाही व तो माल खपण्या-साठी साम्राज्ये मिळवावी लागतात. पण त्याबरोबरच उत्पादनक्षेत्रही वाढत जाते, अनेक राष्ट्रांत भांडवलशाही उत्पादन सुरू होते. आणि शेवटी खरेदीशक्ती कमी कमी वाटली गेल्यामुळे उत्पन्न माल खपत नाही, लोकांना बेकारी येते, व संपत्ती-शेजारी माणसे उपाशी राहू लागतात. भांडवलशाही उत्पादनसंघटना उत्पादनाच्या बाबतीत अत्यंत सामर्थ्यशाली असताही व बाजारात मालाचे ढीग पडले असताही बहुसंख्य समाजाला त्या धनाचा उपभोग घेता येत नाही. माणसासाठी निर्मिलेले धन माणसाला उपभोगता येत नाही हा अमानुषतादोष भांडवलशाहीच्या अंगभूत असल्याचा प्रत्यय येतो.

## मार्क्सचा कम्युनिझम

कम्युनिस्ट पंथाचा संस्थापक कार्ल मार्क्स याने अप्रतिबंध स्पर्धेवर आधारलेल्या या भांडवलशाहीची मीमांसा वरीलप्रमाणे केली असून त्यांतील अमानुषता कशी जाईल याचेही त्याने विवेचन केले आहे. मार्क्सच्या अथवा कम्युनिस्टांच्या मते भांडवलशाही, म्हणजेच धनोत्पादनसाधनावरील खासगी मालकी असणारी समाजपद्धती, नष्ट करून सरकारने ती धनोत्पादनसाधने सरकारी मालकीची करावी आणि पोस्ट, सडका, न्यायालये, सैन्य, आरमार, मुलकी कारभार या गोष्टी जशा सरकारी मालकीत चालतात तशी सर्व उत्पादनसाधने सरकारी मालकीने चालवून, बाजारात न खपणारे धन समाजाच्या उत्कर्षासाठी वापरावे. रशियातील कम्युनिस्टांनी ही गोष्ट १९१७ साली झालेल्या क्रांतीनंतर करून दाखविली.

रशियात पहिल्या महायुद्धकाळात कम्युनिस्ट क्रांती झाली असा उल्लेख मागे आला आहे. त्या क्रांतीची आर्थिक कामगिरीही जागतिक अर्थविचारात फार मोठी भर घालणारी ठरली आहे. रशियात क्रांतीपूर्वी भांडवलशाहीविकास फार थोडा झाला होता. जो भांडवलशाही विकास झाला होता तो स्वदेशी भांडवलदारांनी फारसा केला नसून परदेशातून भांडवल घेऊन आलेल्या भांडवलदारांनी केला होता. स्वदेशी भांडवलदारात कर्तबगारी मुळीच नव्हती. रशियाचा पहिल्या महायुद्धात पराभव झाला आणि राज्यसंघटना व अर्थसंघटना कोसळून पडून कम्युनिस्टांच्या हाती राज्यसत्ता आली. कम्युनिस्ट हे भांडवलशाहीचे विरोधक आहेत. मोठी धनोत्पादनसाधने ही सरकारच्या मालकीत असावी, लहान शेती कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याच्या मालकीत असली तरी अर्थसंघटनेत अनिर्बंध स्पर्धा, व्यक्तिस्वातंत्र्य, खुला बाजार या गोष्टी नसाव्या आणि रोजगारी, उत्पादन व लोककल्याण या गोष्टी सरकारच्या जबाबदारीत असाव्या आणि त्या उद्दिष्टानुसार अर्थसंघटनेचे व वैयक्तिक स्वातंत्र्याचे नियंत्रण करावे, इत्यादि अशी कम्युनिझमची शिकवण आहे. आजच्या जगातील कम्युनिस्ट राजवटी सामान्यतः या तत्त्वानुसार अर्थसंघटना चालवितात.

उलट रूझवेल्टने अमेरिकेत भांडवलशाही नष्ट न करता बेकारीनिवारणाचे कर्तव्य राज्यसंस्थेतर्फे केले व भांडवलशाहीवरचे मंदीचे संकट कायमचे टाळले ही फार मोठी क्रांती होय असे वर म्हटले आहे. पण पुढारलेल्या पश्चिमी भांडवलशाही राष्ट्रांतील अर्थसंघटना गेली शंभर वर्षे विकसत असून त्या अर्थसंघटना आता अशाच विकसत जाण्याइतके त्यांचे सामर्थ्य वाढले असल्याने बेकारीनिवारणासारखी एकादी कामगिरी राज्यकर्त्यांनी उचलली की त्या अर्थसंघटनेची कार्यक्षमता टिकून राहते. पण रशियासारख्या मागसलेल्या राष्ट्रात विकास मुळी झालेलाच नव्हता. आंतरराष्ट्रीय आर्थिक व राजकीय स्पर्धेत रशियातला भांडवलदारवर्ग पुढे येऊन आर्थिक प्रगती करू शकेल ही शक्यता नव्हती. म्हणून रशियात कम्युनिस्ट सरकार आल्यावर

देशाचा आर्थिक विकास करण्याची जबाबदारी सरकारवरच आली. यामुळे केवळ बेकारीनिवारणावर न थांबता उत्पादनाचा विकासाच्या दृष्टीने अनुक्रम लावणारे अर्थसंघटनेच्या नियोजनाचे अगदी नवे तत्त्व कम्युनिस्ट सरकारला स्वीकारावे लागले. या तत्त्वाप्रमाणे मालांचे उत्पादन व उपभोग यांचे प्रमाण ठरवून, उत्पादनसाधने खास योजनेने निर्मून, उत्पादनाचा अनुक्रम ठरवून, अशा नियोजनबद्धतेने धनसाधने, व श्रमशक्ती यांचा व्यय करणे हे कम्युनिस्ट अर्थसंघटनेचे वैशिष्ट्य आहे. उत्पादन झालेल्या संपत्तीतील किती भाग भांडवलात घालायचा, कोणत्या उत्पादनात भांडवल किती, केव्हा घालायचे, उपभोगात किती कोणते धन आणायचे, याविषयीचे निर्णय भांडवलशाही उत्पादनात 'मागणी व पुरवठा 'या सिद्धान्तानुसार ठरतात. पण कम्युनिस्ट उत्पादनात सरकार एकंदर समाजाची गरज ठरवून त्याप्रमाणे संपत्तीचा विनियोग करते.

कम्युनिस्ट अर्थसंघटनेचे अगदी स्थूल स्वरूप येथे मी सांगत असून त्याहून अधिक चर्चा मला येथे करायची नाही. कम्युनिस्ट अर्थसंघटनेत सर्व अर्थसंघटनेचे संपूर्ण नियोजन व नियंत्रण होत असल्याने कम्युनिस्ट उत्पादनात आर्थिक मंदी ही अंगभूत नाही. कारण उत्पन्न माल लोकांच्या उपभोगात यावा या हेतूनेच खरेदीशक्ती वाटली जाते व शिवाय लोकांच्या हितासाठी सरकार आणखी माल खर्च करते. माल खपत नाही म्हणून बेकारी आली असे घडत नाही. कम्युनिस्ट क्रांतीने वरीलप्रमाणे भांडवलशाहीत आलेली कोंडी फोडली की नाही हा मुद्दा जगभर वादग्रस्त मानला जात असून त्याचीही चर्चा मी येथे करीत नाही. कम्युनिस्टांनी ही कोंडी फोडली असे मानले तरी कम्युनिस्ट क्रांती सर्व राष्ट्रांत घडवून आणता येईल का, हा प्रश्न रशियन क्रांती यशस्वी झाल्यानंतरही कायम राहिला आहे व तो रशियन क्रांतीनंतरच्या काळात अधिकाधिक बिकट होत गेला आहे. रशियात कम्युनिस्ट क्रांती झाल्यावर यादवी होऊन हिंसा अतोनात झाली. पहिल्या महायुद्धानंतर युरोपातील अनेक देशात कम्युनिस्ट क्रांती करण्याचे जे प्रयत्न झाले त्यामुळे रक्ताच्या नद्या वाहल्या. शेवटी रशियन कम्युनिस्ट सरकारला आपण जागतिक महायुद्धात सापडू अशी भीती वाटली व त्याने जागतिक कम्युनिस्ट क्रांतीत पुढाकार घेण्याची महत्त्वाकांक्षा सोडून देऊन 'एकेका देशात समाजवाद' जसा येईल तसा त्या त्या देशांनी आणावा असे प्रतिपादन करण्यास सुरवात केली. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटी पूर्वयूरोपीय राष्ट्रात रशियन सैन्ये आली व त्यांच्या बळावर तेथे तेथे कम्युनिस्टांनी सत्ता बळकावून क्रांती केली. अर्थात ही परिस्थिती अपवादात्मक होती व अशी कम्युनिस्ट क्रांती यापुढे जगात होऊ देणारच नाही अशी हल्ली अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्ट्रांची प्रतिज्ञाच आहे. चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती झाली, पण जनतेला क्रांतीपूर्वी दीर्घकाल अनन्वित आपत्ती सोसाव्या लागल्या असून कम्युनिस्ट क्रांती चीनच्या पद्धतीने झाल्यास अर्थसंघटना सुधारेल की नाही व जगात शांतता टिकेल की नाही

अशी नवी शंकाही उत्पन्न होत आहे. शिवाय दुसऱ्या महायुद्धानंतर जी राष्ट्रे भराभर स्वतंत्र झाली ती आता कम्युनिस्ट होऊ इच्छीत नाहीत. आणि भांडवलशाही जर आता कार्यक्षम राहिली नसेल व कम्युनिस्ट क्रांतीखेरीज दुसरा पर्याय जगापुढे नसेल तर जग फार मोठ्या आपत्तीत आले असे मानावे लागेल. १९२९ साली अमेरिकेत जी आर्थिक मंदी आली तिने जगाला खरोखर या कोंडीत पकडले होते. रूझवेल्टने जे उपाय अंमलात आणण्याचा प्रयत्न केला ते प्रयत्न अमेरिकेत थोडेसे यशस्वी झाले तरी तेथल्या भांडवलदारवर्गाने व सुप्रीम कोर्टाने ते हाणून पाडले व साम्राज्यशाहीच्या ज्या अपरिहार्य क्रमाने पहिले महायुद्ध झाले, त्याच क्रमाने दुसरे महायुद्ध झाले.

त्यानंतरच्या काळात भांडवलशाहीचा अंगभूत म्हणून वर वर्णिलेला दोष जर कायम राहिला असता तर महायुद्धानंतर लवकरच तिसरे महायुद्ध झाले असते. पण रूझवेल्टने अवलंबलेल्या मार्गाची उपयुक्तता व यशस्विता भांडवलशाही राष्ट्रांना युद्धकाळात व युद्धानंतर पटू लागली. त्यांनी त्या मार्गाचा अवलंब केला व शांततेने समाजक्रांती होण्याचा मार्ग आता जगाला दिसू लागला आहे. रूझवेल्टने जे मार्ग अवलंबले ते अडचणीत सापडल्यावर त्याला सुचले तसे त्याने अवलंबले. त्याचे अर्थशास्त्र असे त्याला स्वतःला फारसे माहीतही नव्हते, असे इतिहासकारांचे म्हणणे आहे. पण रूझवेल्टच्या काळींच हे तत्त्वज्ञान इंग्लंडात जॉन मेनार्ड केन्स हा लिबरल अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादत होता. आणि रूझवेल्टच्या धोरणावर केन्सच्या विचाराचा प्रभाव पडतच होता. आज पुढारलेल्या पश्चिमी जगावर व कम्युनिस्ट राष्ट्रांबाहेरच्या मागासलेल्या राष्ट्रांवर केन्सच्या या अर्थशास्त्राचा व विचारसरणीचाच प्रभाव पडलेला आहे. त्या अर्थशास्त्राचा व विचारसरणीचा आता संक्षेपाने परामर्ष घेऊ.

## केन्सचे नवे अर्थशास्त्र

भांडवलशाही समाजाचे अंगभूत दोष कार्ल मार्क्सने व कम्युनिस्टांनी जे सांगितले त्याहून भांडवलशाहीचे फारसे वेगळे दोषाविष्करण केन्स याने केलेले नाही. भांडवलशाहीत अप्रतिबंध स्पर्धा असली म्हणजे संपत्तीची वाटणी समाजात विषम होते हे केन्स मान्य करतो. प्रचंड बहुसंख्य जनतेला बाजारात येणारा उपभोग्य माल उपभोगायला जेवढा हवा असतो तेवढा खरीदण्याला पुरेशी खरेदीशक्ती नसते व मूठभर भांडवलदारवर्गाला जो अफाट पैसा मिळतो, त्याने बाजारातली सारी उपभोग्य संपत्ती ते खरेदू शकत नाहीत. यामुळे त्यांच्याजवळ न वापरलेली अशी खरेदीशक्ती साचून राहते आणि बाजारात न खपलेला असा उपभोग्य माल पडून राहतो. भांडवलदार जो पैसा उपभोग्य धन खरीदण्यासाठी वापरत नाही तो पैसा बचत होईल व ती बचत नवीन उत्पादनाला भांडवलदार हा भांडवलासाठी वापरील असे लेसाफेरवादी अर्थतत्त्वज्ञ म्हणतात. खरोखर भांडवलदारांनी आपली बचत अशी सतत भांडवलासाठी खर्चून नवेनवे उत्पादन चालू ठेवले तर बेकारी राहणारच नाही. पण बाजारात

न खपलेला माल पडून राहिला आहे अशा वेळी केवळ लोकांना रोजगारी मिळावी म्हणून भांडवलदार नव्या उत्पादनात पैसा गुंतवून न खपणारा माल आणखी आणखी का काढील व नुकसान का सोसेल? भांडवलदार हा नफ्यासाठी भांडवल-गुंतवणूक करतो, समाजाला रोजगार देण्यासाठी नव्हे. अर्थात भांडवलशाहीत विषम वाटणी असते म्हटले की श्रमजीवी लोक बाजारातील सर्व उपभोग्य माल खरीदू शकणार नाहीत, धनिकवर्गांना तो सर्व खरीदण्याची गरज नाही, म्हणून बाजारात न खपणारा माल पडला आहे, रोजगारी व खरेदीशक्ती नसलेले लोक उपभोग्य मालावाचून तडफडत आहेत आणि बाजारात मंदी असल्याने नवीन भांडवलगुंतवणूक करण्यास राजी नसणाऱ्या भांडवलदाराच्या तिजोरीत पैसा पडून आहे, सारांश न खपलेला उपभोग्य माल, उपभोगावाचून तडफडणारी माणसे आणि वापरली न गेलेली खरेदीशक्ती या तीन वस्तू एकाच समाजात एकमेकास न भेटता नांदत राहतात म्हणून भांडवलशाही उत्पादनाने बहुतेक काळ पूर्ण रोजगारी मिळूच शकणार नाही, असा सिद्धान्त केन्सने मांडला आहे आणि अप्रतिबंध स्पर्धा व व्यक्तिस्वातंत्र्य यांस सरकारने मर्यादा घालून समाजास रोजगार पुरविणे हे सरकारचे कर्तव्य होय, असे केन्सने म्हटले आहे. भांडवलदार हा नफ्यासाठीच भांडवल घालणार, म्हणून मंदी दिसली की नफ्याची आशा संपली असे मानून भांडवलदार नवी गुंतवणूक करणार नाही. अर्थात सरकारने अशा वेळी बेकारीनिवारणाची जबाबदारी पत्करून स्वतः शाळा, दवाखाने, सडका, बागा, गरीबांना राहण्यासाठी इमारती, पाणीपुरवठ्याच्या सोयी इत्यादींसाठी भांडवली खर्च करावा, त्यासाठी धनिकांवर कर बसवावे, बँकांकडून कर्जे काढावी व पूर्ण रोजगारी निर्माण करावी म्हणजे बाजारात पडून राहिलेला उपभोग्य माल लोक भराभर खरेदी करतील व नवीन उत्पादनास भांडवलदारांना हुरूप येऊन ते भांडवल-गुंतवणूक करतील असे केन्सने प्रतिपादिले आहे.

वरवर पाहता यात आक्षेपार्ह काहीच वाटत नाही. पण अमेरिकेत भांडवलदारांनी रूझवेल्टच्या याच आशयाच्या योजनांना विरोध केला व सुप्रीम कोर्टाने त्या योजना घटनाबाह्य ठरवल्या हे वर सांगितलेच आहे. रूझवेल्टच्या धोरणास अनुकूल असेच केन्सचे मत आहे. केन्सच्या मतात व रूझवेल्टच्या योजनेत अप्रतिबंध स्पर्धेच्या तत्वाचा भंग होतोच. कारण बेकारांना सरकारने काम देणे म्हणजे रोजगारीसाठी कामगारात अप्रतिबंध स्पर्धा होऊन भांडवलदाराला परवडणाऱ्या पातळीपर्यंत मजूरीचे दर उतरण्याला सरकारने प्रतिबंध करणे असे ठरत असून भांडवलदाराला परवडतील अशा मजुरीच्या दराने उत्पादन करण्याचे भांडवलदाराचे जे व्यक्तिस्वातंत्र्य त्यास सरकारने अडथळा केल्यासारखे होते या भूमिकेवर रूझवेल्टला भांडवलदारांनी विरोध केला व याच भूमिकेवर सुप्रीम कोर्टाने रूझवेल्टच्या योजना घटनाबाह्य ठरविल्या. पण केन्सने रूझवेल्टला नेहमी पाठिंबा दिला व त्याची शिकवण हे भांडवलशाहीचे नवे अर्थशास्त्र झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकन काँग्रेसने केलेल्या ठरावात बेकारी-

निवारण ही सरकारची जबाबदारी आहे हे तत्त्व स्वीकारण्यात आले. खरोखर अमेरिकन घटनातत्त्वात ही फार महत्त्वाची क्रांती होती. भांडवलशाहीत अप्रतिबंध स्पर्धा व व्यक्तिस्वातंत्र्य ही तत्त्वे पायाभूत मानली जाऊन धनोत्पादन-साधनांची खाजगी मालकी हेही पायाभूत तत्त्व मानले गेल्यामुळे भांडवलशाहीत बेकारी आल्यास सरकारने बेकारीनिवारणासाठी धंदे काढणे हे अप्रतिबंध स्पर्धेच्या तत्त्वाचा भंग करण्यासारखे आहे असे मानले जाई. हजारो लाखो लोक बेकार झाले असता व बाजारातला माल खपत नसल्याने नवीन उत्पादन थांबले असता जगातली सरकारे लोकांची आपत्ती पाहात दिङ्मूढ होऊन स्वस्थ बसली आहेत असा जगातील सर्व राष्ट्रांना १९२९ नंतरच्या मंदीच्या काळी अनुभव आला. १९३४ साली त्यावेळी अमेरिकेचा राष्ट्रपती रूझवेल्ट याने दरमहा ३० कोटी डॉलर्सचे कर्ज काढून बेकारी निवारणासाठी भांडवलगुंतवणूक केली. त्यावेळी अर्थसंघटनेतील या सरकारी हस्तक्षेपामुळे अर्थव्यवहारात तेजी येईल असे भाकित केन्सने केले व ते खरे ठरले.

इतका खर्च सरकारने पुन्हापुन्हा वाढवावा असे मत केन्सने १९३४ साली तो अमेरिकेत गेला असता प्रगट केले. मंदीचा जोर असेल त्या सर्व कालात सरकारने कर्ज काढूनही भांडवलगुंतवणूक करावी, एकदा तेजी आली म्हणजे सरकारला हा हस्तक्षेप थांबविता येईल असे केन्सचे मत त्यावेळी होते. पुढे १९३६ साली 'रोजगारी, व्याज व पैसा यासंबंधी सर्वसामान्य सिद्धान्त' हा ग्रंथ केन्सने प्रसिद्ध केला. भांडवलशाहीत बेकारी कायम राहणारच, सरकारने नेहमीच भांडवलगुंतवणूक करून संपूर्ण रोजगारी कायम ठेविली पाहिजे असे मत त्या ग्रंथात केन्सने मांडले.

भांडवलशाहीच्या या अंगभूत दोषाबाबत कम्युनिस्ट व केन्स यांची मीमांसा साधारपणे सारखीच आहे असे वरील एकंदर विवेचनावरून कळून येईल. पण कम्युनिस्टांना भांडवलशाही नष्टच करावयाची होती व धनोत्पादनसाधने सरकारी मालकीची करून त्यांचा खाजगी नफ्यासाठी नव्हे तर सार्वजनिक हितासाठी वापर करावा हे मत अभिप्रेत होते. रशियात कम्युनिस्टांनी हा मार्ग अवलंबलाही. पण त्यासाठी त्यांना हुकुमशाही स्थापावी लागली. इंग्लंडसारख्या पार्लमेंटरी देशात पार्लमेंटच्या कायद्याने धनोत्पादनसाधने खाजगी मालकीतून सार्वजनिक मालकीत आणता येतील असे ब्रिटनमधील सोशॅलिस्टांनाही वाटत नव्हते. सोशॅलिस्टांनी कोळशाच्या खाणी राष्ट्रीय मालकीच्या करण्याचा ठराव पार्लमेंटात मंजूर करून घेतल्यास भांडवलदार वर्ग बंड करून यादवी माजवील असे मत १९३८ साली प्रो. लास्कीने मांडले होते. याचा अर्थ असा होता की भांडवलशाहीत दीर्घकाल सार्वजनिक व भयंकर बेकारी व उपासमार ही अटळ आहेत आणि भांडवलशाही नष्ट करून सोशॅलिझम स्थापायचा तर रक्तपात व यादवी यांच्या वणव्यातून गेले पाहिजे; त्यानंतर लोकशाही जन्मण्याचा अथवा नांदण्याचा संभव फार कमी. रशियात लोकशाहीची परंपराच नसल्यामुळे तेथे हुकूमशाही आली हे ठीक झाले, पण इंग्लंड, फ्रान्स,

अमेरिका वगैरे लोकशाहीच्या परंपरेत वाढलेल्या राष्ट्रांत यादवी हुकूमशाही या मार्गाने सोशॅलिझम आणणे हे तेथील सोशॅलिस्टांना पसंत नव्हते. पण भांडवलशाहीच्या वैभवात माणूस उपाशीच राहात होता व ते वैभवही सुकून मरून चालले होते, माणसे असंतुष्ट झाली होती व भांडवलशाहीविरोधी हिंसा व यादवी अथवा महायुद्धे अटळ दिसत होती.

या विनतोड संकटाच्या कोंडीत पश्चिमी जग सापडले असता केन्सचा अत्यंत सौम्य उपाय पुढे आला. भांडवलशाही मरू घातली आहे हे त्याने मान्य केले. पण ती नष्ट करण्याच्या सोशॅलिस्टांच्या उपायाचा त्याने धिक्कार केला, भांडवलशाही टिकावी म्हणूनच सरकारने भांडवल-गुतवणूक करून उत्पादनव्यवस्थेत हस्तक्षेप केला पाहिजे व यामार्गे संपूर्ण रोजगारीची जबाबदारी सरकारने स्वीकारली पाहिजे असे मत केन्सने मांडले. एवढ्यापुरती मर्यादा अप्रतिबंध स्पर्धा व व्यक्तिस्वातंत्र्य यांना घातली पाहिजे असे त्याचे म्हणणे होते. मार्क्सने व कम्युनिस्टांनी भांडवलशाहीचे पृथक्करण करून तिचा अंगभूत दोष जितका सोपपत्तिकपणे दाखविला आहे तितके भांडवलशाहीचे सोपत्तिक दोषदर्शन केन्सने केले आहे असे वाटत नाही. पण त्याने सुचविलेल्या उपायात शांततेने क्रांती करण्याचे सामर्थ्य आहे हे खास. मुख्य म्हणजे कलह, हिंसा या गोष्टी तर यात येत नाहीतच. पण केन्सच्या मार्गाने फार मोठा सामाजिक बदल आपण करीत आहो असे समाजाला वाटतही नाही. कारण युद्धासारख्या आपत्तीत सरकार कर व कर्ज उभारून सरकारतर्फे भांडवल-गुंतवणूक करीतच असे, आणि बेकारी फार माजे तेव्हा सरकार आपल्या खर्चाने श्रमगृहे चालवीत असे. याच गोष्टी केन्सने सरकारवर कायम कर्तव्य म्हणून लादल्या. खासगी मालकीचे धंदे सरकारी मालकीत आणण्याला केन्सचा विरोधच होता. सरकारने बेकारी नष्ट करण्यापुरती भांडवलगुंतवणूक केल्यास भांडवलदारांच्या मालाला सतत गिऱ्हाईक मिळेल व भांडवलशाहीच्या अंगभूत असा मंदीचा रोग कायमचा नाहीसा होऊन भांडवलदार सतत भांडवलगुंतवणूक करीत राहतील असे केन्सचे म्हणणे होते. ते अनुभवाने खरे ठरले, इतकेच नव्हे, तर पश्चिमी राष्ट्रातील लोकशाही शाबूत ठेवून समाजवाद हळूहळू स्थापन करण्याचा मार्गही सोशॅलिस्टांना यात सापडला असे समाजवादी विचारवंत आता म्हणू लागले आहेत.

केन्सने आपल्या नव्या अर्थशास्त्रात सुचविलेली उपाययोजना सकृद्दर्शनी अगदी साधी आहे. भांडवलशाही समाजात जो विक्रीमाल उत्पन्न होतो तो सारा खपत नाही असा अनुभव आहे. याचे कारण संपत्तीच्या वाटणीतील विषमता हे आहे, असे मागे म्हटले आहे. कम्युनिस्ट, समाजवादी व केन्सवादी या सर्वांना ही वस्तुस्थिती सारखीच मान्य आहे. भांडवलशाहीत उत्पन्न होणारा विक्रीमाल जवळजवळ नेहमी बाजाराच्या गरजेहून अधिक निर्माण होतो, तो खपला नाही की नवी निर्मिती बंद पडते, त्यामुळे बेकारी येते. शंभर कामगार एखादा धंदा बंद पडल्याने बेकार झाले

की तेवढी खरेदीशक्ती बाजारात कमी येते व हे कामगार ज्या जीवनावश्यक अशा अनेक वस्तू खरेदीत असत त्या विकल्या जात नाहीत. यामुळे त्या त्या मालाच्या उत्पादन-व्यवसायात आणखी बेकारी येते, काही धंद्यांत बेकारी माजू लागली की इतर निरनिराळ्या धंद्यांत आणखी बेकारी येते, त्यामुळे मजुरीचे दर उतरू लागतात, यामुळे बहुसंख्य समाजातील खरेदीशक्ती आणखी घटते व त्यामुळे बाजारातील मालाचा खप घटतो, धंदेवाल्यांचा नफा घटतो अथवा बुडतो आणि भांडवलदार नवी भांडवलगुंतवणूक करीत नाहीत, यामुळे धंदे थंडावतात, शेवटी मजूरीचे दर अत्यंत उतरतात, मालाच्या किमतीही अगदी भुईसपाट होतात शेवटी उत्पादनखर्चही घटून उत्पादनांत नव्या आशेची परिस्थिती दिसू लागली म्हणजे भांडवलदार धंद्यात भांडवल घालू लागतात व तेजीच्या दिशेने भांडवलशाही उत्पादन जाऊ लागते. पहिल्या महायुद्धापूर्वी पाऊणशे वर्षेपर्यंत तेजीनंतर मंदी व मंदीनंतर तेजी हे अर्थचक्र दर सात ते दहा वर्षे एक फेरी करीत राहात असे, ते १९२९ नंतरच्या मंदीत खचतच चालले. थोडी तेजी होते तो पुन्हा मंदी अधिक दीर्घकाल येते व अर्थचक्र आणखी आणखी खोल खोल खचत जाते असा अनुभव येऊ लागला. उलट कामगार वर्ग संघटित होऊन मजूरीचे दर कमी होण्यास सामुदायिक विरोध करू लागला. बेकारीने असंतोष माजून दंगली माजू लागल्या व 'कम्युनिझमची गिधाडे आकाशात फिरत आहेत' असे दिसू लागले. या परिस्थितीत केन्सने एवढा या मोठ्या संकटावर अगदी साधा उपाय सुचविला. एकादे मोठे धरण कोठे तरी एकादी भेग पडून गळू लागते. अर्थात् त्या गळतीच्या दिशेने तलावातल्या पाण्याचे दडपण वाढते. गळणाऱ्या, पाझरणाऱ्या पाण्याने धरणाचे आतले बांधकाम ढासळू लागते, गळती वाढते, पाण्याचे दडपण वाढते व शेवटी मोठे खिंडार पडून धरण कोसळते व पाणी वाहून जाते. हे सर्व मुळातच टाळण्याचा उपाय एंजिनियराजवळ असतो. एंजीनिअर सांगतात की गळतीवर पाळत ठेवून गळती दिसेल तेथे तेथे ताबडतोब धरणाची दुरुस्ती करावी म्हणजे बारीक फट वेळीच बुजेल व तिचे खिंडार होणारच नाही. केन्सचा उपाय असा अगदी प्राथमिक दुरुस्तीचा आहे.

समजा, अमुक एका राष्ट्राच्या समाजात अमुक एका वेळी शंभर लाख रुपयांचा माल तयार झाला व अर्थात मजुरी, खंड, व्याज, नफा या रूपांनी शंभर लाख रुपयां-इतकी खरेदीशक्ती वाटली गेली. पण उत्पन्न झालेला सारा विक्रीमाल खपत नाही, असा अनुभव आहे ना ? समजा, ऐंशी लाख रुपयांचा माल खपला व वीस लाख रुपयांचा उरला. हा वीस लाख रुपयांचा माल खपेनासा दिसला की मंदीच्या भीतीने भांडवलदार नवीन भांडवलगुंतवणूक करण्याचे टाळतात. त्यामुळे मंदी व बेकारी आणखी वाढत जाते. तेव्हा, जो वीस लाख रुपयांचा माल खपला नाही तो खपविण्याचा उपाय येथे ताबडतोब शोधला पाहिजे. म्हणजे एवढा माल खपेल एवढी खरेदीशक्ती समाजात वाढेल इतकी रोजगारी वाढली पाहिजे. केन्स म्हणतो, ही रोजगारी वाढेल

क्रमांक ...५५५६९ दि: ...निबंध
...२०६ नों: दि: २०१३/७



इतकी भांडवलगुंतवणूक सरकारने करावी व उत्पादन वाढवावे. पण बाजारात असलेला मालच जर खपेना तर सरकारने आणखी माल उत्पादन करून तो कुठे खपवावा? केन्स म्हणतो, सरकारने तावडतोब उपभोगण्याच्या विक्रीमालाची निर्मिती करू नये. सडका बांधाव्या, स्वस्त भाड्याची घरे बांधावी; पूल बांधावे, शाळा बांधाव्या, शिक्षण वाढवावे, धरणे बांधावी, वीजशक्तीनिर्मितीची केंद्रे बांधावी; यामुळे नवी रोजगारी वाढेल व बाजारात असून न खपणारा उपभोग्य माल नव्या रोजगारी लोकांनी केलेल्या खरेदीने खपून जाईल. इतकेच नव्हे तर रस्ते, पूल, धरणे, आगगाड्या, स्वस्त भाड्याची घरे, शिक्षण या सर्वांचा विकास होण्याने एकंदर भांडवलशाही उत्पादनात वाढ होत जाईल व नव्यानव्या रोजगारीची सोय होईल. "कामगारवर्गात संघटनेचे तत्त्व शिरले असल्याने आता अनिर्बंध चढाओढीचा कालखंड कायमचा मेला आहे, तो पुन्हा जिवंत होईल, अशी आशा करू नका," असेही केन्सने बजावले आहे. एखाद्या धरणांतील प्राथमिक लहानशी गळती ही अखेर धरणाला खिंडार पाडून त्याचा पूर्ण विध्वंस करते, त्याप्रमाणे थोडीशी प्राथमिक बेकारीही अधिकाधिक भडकत जाऊन भांडवलशाही संघटनेचा मृत्यू सतत जवळजवळ आणते. म्हणून प्राथमिक बेकारी हे युद्धासारखे महासंकट मानले पाहिजे हे केन्सने जनतेला पटविले. महायुद्धकाळांत अर्थसंघटनेमध्ये सरकारी हस्तक्षेप जसा समर्थनीय ठरतो, तसाच बेकारी-निवारणासाठीही अर्थसंघटनेत हस्तक्षेप करण्याचा सरकारला अधिकार आहे, हा केन्सचा विचार पश्चिमी राष्ट्रांनी मान्य केला. अमेरिकेत 'बेकारीनिवारण ही सरकारी जबाबदारी आहे,' हे तत्त्व सरकारने १९४६ साली मान्य केले आणि इंग्लंडात मजूर सरकारने १९४७ साली पार्लमेंटरी कायद्याने कोळशाच्या खाणी राष्ट्रीय मालकीच्या करून घेतल्या.

त्यानंतरच्या काळात केन्सचाच विचार आता रबरासारखा ताणला जाऊन इंग्लंडसारख्या राष्ट्रात धंद्यांचे राष्ट्रीयीकरण, खाजगी धंद्यांचे नियंत्रण इत्यादी उपाय सरकारी हस्तक्षेपाने अमलात आणले जात आहेत. यामुळे लोकशाही मार्गाने हा समाजवाद येत आहे असे पश्चिमी राष्ट्रांतील समाजवादीही मान्य करीत आहेत. लोकशाही समाजवाद तो हाच होय. अर्थसंघटनेला मंदी येऊ द्यायची नाही या हेतूने सरकारने लोकोपयोगी भांडवलगुंतवणूक करायची, याचा अर्थ, लोककल्याण —लोकांचा सर्वांगीण उत्कर्ष हा एक सरकारच्या कर्तव्याचा भागच होय असे म्हणण्या-पर्यंत ताणता येतो. केन्सपूर्वीच्या भांडवलदारी राज्यशास्त्रात सरकारच्या कर्तव्यकक्षेत लोककल्याण समाविष्ट नव्हते. लोक बेकार झाले तरी सरकारने फक्त अप्रतिबंध स्पर्धा व व्यक्तिस्वातंत्र्य संभाळावे, फार तर तात्पुरती श्रमगृहे अथवा अन्नछत्रे चालवावी, लोक असंतुष्ट होऊन दंगली करू लागले, तर त्यांना दडपून टाकावे, असे केन्सपूर्व राज्यशास्त्राचे स्वरूप होते. स्वदेशात माल खपत नाही म्हणून परदेशी बाजार जिंकणे, त्यासाठी साम्राज्य मिळविणे, युद्धे करणे, आणि व्यक्तिस्वातंत्र्य नष्ट करून हुकुमशाही

स्थापणे हे सर्व भांडवलशाहीच्या केन्सपूर्वीच्या अर्थशास्त्रात व राज्यशास्त्रात अपरिहार्य झाले होते. केन्सने भांडवलशाहीच्या उत्पादनक्षेत्रातच सारा उपभोग्य माल सतत खपत राहील अशासाठी सरकारने नेहमी पुरवणी भांडवल-गुंतवणूक करावी हा मार्ग सांगितला. आणि आता दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात बेकारी, साम्राज्यलोभ व आंतरराष्ट्रीय युद्धे यावाचून त्या त्या देशांतील भांडवलशाहीचे व एकंदर समाजाचेही वैभव वाढू शकते, असा अनुभव पश्चिमी जगाला आला आहे.

यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधातही क्रांती होत आहे. साम्राज्यांतर्गत राष्ट्रे 'रणावीण स्वतंत्र' केली जात आहेत. अमेरिकेसारख्या, फ्रान्ससारख्या, इंग्लंडसारख्या देशात बेकारी राहाता कामा नये या उद्दिष्टासाठी सतत अधिकाधिक भांडवलगुंतवणूक ते ते सरकार करते. त्यामुळे परिणामी खाजगी भांडवलदार व एकंदर जनता या सर्वांचे वैभव एवढे वाढते की ते खपविण्यासाठी पुन्हा परदेशचे बाजार शोधावे लागतात. पण आता त्यासाठी परदेश जिंकण्याची अथवा जिंकलेले प्रदेश शस्त्रबलाने काबूत ठेवण्याची जरुरी राहात नाही. मागासलेल्या राष्ट्रांना स्वातंत्र्य देऊन, त्यांच्या ठिकाणी विकासाची आकांक्षा निर्माण करून त्यांना विद्या, कला व उत्पादनक्षमता शिकवून, त्यांना आर्थिक विकासाची साधने पुरवून, मागासलेल्या राष्ट्रांचा उत्कर्ष पुढारलेल्या राष्ट्रांना आपल्या उर्वरित धनाने करता येत आहे. त्यामुळे पुढारलेल्या राष्ट्रांचे बाजाराचे क्षेत्र वाढते. पण त्यासाठी मागासलेल्या प्रदेशांना आता स्वातंत्र्य गमवावे लागत नाही. राष्ट्रीय स्वातंत्र्य कायम राहून मागासलेल्या राष्ट्रांना पुढारलेल्या राष्ट्रांचे साहाय्य मिळणे हे आता केन्सच्या सिद्धान्ताचा अपरिहार्य परिणाम म्हणून शक्य झाले आहे. केन्स हा भांडवलशाहीचा कट्टा पुरस्कर्ता होता. पण वरील विवेचन समजून घेतल्यास त्याने सुचविलेला मार्ग कलह व रक्तपात यांवाचून समाजवादाकडे जाणारा आहे हे लक्षात येते. कारण बेकारीनिवारणासाठी सरकारने सतत भांडवलगुंतवणूक करीत राहिले पाहिजे हे तत्त्व एकदा मान्य केले म्हणजे भांडवली साधनांची विपुलता होण्याचा काल केव्हातरी अवतरणारच. आणि भांडवल विपुल झाले, बौद्धिक व कारागिरी शिक्षण खूप वाढले, विज्ञानविकास झाला, नक्तपगारी अधिकाऱ्यांकडून, तज्ज्ञांकडून, नोकरांकडून प्रमाणबद्ध धनोत्पादनासाठी त्या भांडवलाचा वापर होऊ लागला म्हणजे खाजगी भांडवलशाहीची आवश्यकता व अपरिहार्यता राहणार नाही. असेही केन्सने म्हटले आहे.

अर्थात पुढील विकास सर्व सरळ व सुसूत्र होईलच असे नव्हे. आज अमेरिकन अर्थसंघटनेत एक नवी विकृती निर्माण झाल्याची तक्रार प्रो. गॅलब्रेथ यांनी आपल्या 'ॲफ्लुअंट सोसायटी' या ग्रंथात केली आहे. त्यांचे म्हणणे असे दिसते की केन्सने सांगितलेला सिद्धान्त अमेरिका आंधळेपणाने अमलात आणीत आहे. बेकारीनिवारण करण्यासाठी नवी नवी भांडवल-गुंतवणूक सरकारने करावी असे केन्सने म्हटले; अमेरिकन भांडवलदारही भांडवल-गुंतवणुकीसाठी आता चढाओढीने पुढे सरसावत

आहेत. पण ते ज्या वस्तू निर्माण करतात त्या माणसाच्या भौतिक व सांस्कृतिक जीवनाला अवश्य अशा, व योग्य त्या क्रमाने, न निर्मिता चैनीच्या, व्यसनाच्या वस्तु निर्मीत आहेत. आणि असला हा माल खपावा म्हणून जाहिराती करकरून लोकांना नवे विलास, नवी व्यसने शिकवीत आहेत. यामुळे व्यसनाच्या व चैनीच्या वस्तूंवर खर्च अधिक होऊन शिक्षणावर जरूर त्यापेक्षा कमी खर्च होत आहे. सडका चांगल्या होण्यापूर्वी मोटारींची संख्या वाढत आहे. श्रीमंतांनी फाजील खाल्लेले अन्न पचविण्यासाठी औषधे निर्माण होतात, पण सामान्य जनतेच्या आरोग्याची साधने व सोयी करण्याला म्युनिसिपालिटीपाशी पैसा नसतो, इत्यादी उदाहरणे प्रो. गाल्ब्रेथ यांनी दिली आहेत. राष्ट्रात खूप संपत्ती निर्माण होणे आणि बेकारी नाहीशी होणे एवढ्याच गोष्टीवर केन्सने भर दिला. पण अर्थसंघटना लोकहितकारी होण्याला एवढेच पुरेसे नसून समाजातील भांडवलाचा व संपत्तीचा हिशेबी व विवेचक वापर करणे हे अवश्य आहे, असे गॅल्ब्रेथ म्हणतात. याचा अर्थ, कम्युनिस्टांचे नियोजनाचे तत्त्व पुढारलेल्या भांडवलशाही राष्ट्रातही कमीअधिक प्रमाणात अवलंबले पाहिजे असा करावा लागतो.

मागसलेल्या राष्ट्रात नियोजन हवे ही गोष्ट प्रा. गाल्ब्रेथ यांनी स्वतःच मान्य केली आहे. मागासलेल्या राष्ट्रात केवळ बेकारीनिवारण एवढाच प्रश्न नसतो. भांडवलाचा व्यय करताना विकासाच्या गरजांच्या दृष्टीने अनुक्रम लावावा लागतो. उदाहरणार्थ, सीमेंटचे उत्पादन मर्यादित असताना श्रीमंतांच्या हवेल्यांसाठी ते न वापरता गरिबांच्या घरांसाठी, सार्वजनिक शाळांसाठी, दवाखान्यासाठी ते वापरावे असे म्हणणे हेच नियोजन होय. पण नियोजन हा खास कम्युनिस्टांचा शोध असल्याने आर्थिक विकासाची ही संपूर्ण प्रक्रिया केन्स व कम्युनिझम यांच्या समन्वयाने होते असे आता म्हणता येते.

## मागासलेल्या राष्ट्रांचा प्रश्न

आजच्या जगात कम्युनिस्ट राष्ट्रे व भांडवलशाही राष्ट्रे यांच्या भिन्न भिन्न अर्थपद्धती व राज्यपद्धती नांदत असून वरील समन्वय त्या दोन्ही पद्धतींचे पुरस्कर्ते मान्य करीत नाहीत व जमातीतील मागासलेल्या राष्ट्रांना आपापल्या पद्धती स्वीकारण्याचा आग्रह करतात. पण कम्युनिस्ट अर्थसंघटना चांगली की भांडवलशाही अर्थसंघटना चांगली या प्रश्नाचे उत्तर बिनतोड असे देता येत नाही. कारण व्यवहारात असे उत्तर शोधणे व्यर्थच ठरते. प्रत्यक्ष व्यवहारांत या दोहोपैकी एकाची निवड करण्याचे स्वातंत्र्य राष्ट्रांना मिळतच नाही. आज जगभर बहुतेक राष्ट्रे स्वतंत्र असली तरी विकासाच्या निरनिराळ्या टप्प्यांवर आहेत. त्यांना इतिहासाच्या ओघात अर्थसंघटनेचे जे रूप बनते ते पत्करावे लागते. निरनिराळ्या देशकालपरिस्थितीत अर्थसंघटनेबाबत निवड करण्यास फार थोडा वाव राहतो असाच आजवरचाही इतिहास आहे विचार करावा लागतो तो अनेक मार्गांत निवड करण्याचे स्वातंत्र्य असून कोणता मार्ग

निवडावा या प्रश्नाचा नव्हे तर कोणता मार्ग अपरिहार्य आहे, या प्रश्नाचा विचार करावा लागतो, मिश्र मार्ग शोधावा लागतो, त्याच्या स्वीकाराची तयारी लागते. एक गोष्ट निश्चित की हल्लीचे मतभेद, वैरे व युद्धे या गोष्टी या दोन्ही अर्थसंघटनांच्या अंगभूत नसून परस्परविषयीचे अज्ञान, हट्ट, पूर्वग्रह, विद्वेष, राजकीय महत्त्वाकांक्षा व ऐतिहासिक अशा काही कारणांतून उद्भवलेली भीती यांचा तो परिणाम आहे. भांडवलशाही अर्थसंघटनेत आता सरकारचा नियंत्रक हात जसा शिरू शकतो त्याप्रमाणे कम्युनिस्ट अर्थसंघटनात वैयक्तिक आर्थिक स्वातंत्र्य व उपक्रमशीलता यांना वाव देण्याची गरज निदान रशियात व पूर्व युरोपीय राष्ट्रात हळूहळू पटू लागली आहे. यामुळे आजची आंतरराष्ट्रीय राजकीय वैरे शमत जातील तसतशी या दोन्ही अर्थसंघटना अंगभूत गुणांबाबत जवळजवळ येत जातील व दोहोतही त्या त्या समाजातील माणसांच्या गरजांहून पुष्कळच अधिक धन निर्मिण्याची शक्ती असून दोन्ही समाजसंघटनांनी मानवजातीचे कल्याण हे ध्येय स्वीकारलेले असल्याने त्यांचे धन मागासलेल्या राष्ट्रांच्या विकासासाठी शिक्षणसाधन व भांडवल म्हणून उपयोगी पडेल हे स्पष्ट दिसते. भांडवलशाही व कम्युनिझम या व्यवस्थांखाली सुधारणेच्या मार्गावर निश्चितपणे चालू लागलेली जगातली लोकसंख्या मात्र एकंदर जागतिक लोकसंख्येच्या मानाने फार फार थोडी आहे. आणि संपूर्णपणे मागसलेल्या व किंचित सुधारलेल्या अशा प्रचंड लोकसंख्यांच्या राष्ट्रांच्या प्रगतीचा प्रश्न आज फार महत्त्वाचा झाला आहे. या प्रश्नाचे निवळ तात्त्विक उत्तर फार सोपे आहे. पुढारलेल्या राष्ट्रांनी आपले शिल्की धनोत्पादन अंशतः मागसलेल्या राष्ट्रांच्या उत्कर्षासाठी देणे आणि आपल्या भौतिक व सांस्कृतिक ज्ञानाचा आणि कारागिरीचा प्रसार मागासलेल्या राष्ट्रात करून त्यांना स्वावलंबनाने उत्कर्ष साधता येईल अशा प्रकारे त्यांना साहाय्य करणे हे पुढारलेल्या राष्ट्रांचे कर्तव्य होय.

पण पुढारलेल्या राष्ट्रांतही अजून बदललेल्या कालखंडाचे आकलन पुरेसे झालेले नाही. भांडवलशाहीच्या अर्थशास्त्रीय विचारात व व्यवहारात जुना कालखंड व नवा कालखंड यात फरक किती पडला आहे हे मोठमोठ्या विचारवंतांना उमगलेले नाही. धान्य, कापूस इत्यादि माल खपत नाही म्हणून हा माल कमी पिकवा, असा प्रचार अमेरिकेत १९३२ साली चालला असता तेथेच खरेदीशक्ती नाही म्हणून अपुऱ्या अन्नवस्त्रामुळे माणसे तडफडत होती. कॉफी खपत नाही म्हणून ब्राझिलमधले लोक एंजिनात जळणासाठी कॉफी वापरत होते आणि कॉफी खरेदी करण्याची शक्ती नसलेले लोक त्याच देशांत असंख्य होते. आजच्या कालखंडात "ज्यांना अन्नवस्त्र हवे त्यांना खरेदीशक्ती देण्यासाठी रोजगारी द्या, आणि पीक भरपूर काढून त्यांची गरज भागवा, इतकेच नव्हे तर मागसलेल्या देशातील गरीब जनतेचा आर्थिक व सांस्कृतिक उत्कर्ष करण्यासाठी, पुढारलेल्या राष्ट्रांनो, त्यांना धन व विद्या द्या. यानेच जगात सर्वांनाच सधनता येईल" असे केन्सीयन अर्थशास्त्रज्ञ शिकवीत आहेत. युद्ध करून साम्राज्ये

मिळविणे हा धनवर्धनाचा मार्ग नसून मागासलेल्या राष्ट्रांना पुढारलेल्या राष्ट्रांनी आत्मोद्धाराच्या कार्यात मदत करणे हा दोघांच्याही वैभववर्धनाचा मार्ग आहे हे चालू कालखंडाचे जागतिक तत्त्वज्ञान झाले आहे. पण पुढारलेल्या व मागासलेल्या राष्ट्रांतील सुशिक्षितांना व समाजसेवकांना या बदललेल्या वैचारिक व व्यावहारिक परिस्थितीचे आकलन अजून व्हायचे आहे. ते झाले पाहिजे. भांडवलशाही व कम्युनिझम याबाबतच्या केन्सपूर्वकालीन टीका आज निरुपयोगी आहेत. दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या दहा वर्षांत भांडवलशाहीची वाढ खुंटून ती मरू घातली होती, भांडवलशाहीखालची प्रचंडसंख्य मानवजात दारिद्र्य, उपासमार, साम्राज्यसत्ता, आंतरराष्ट्रीय युद्धे यांच्या खाईत सापडली होती आणि कम्युनिझम हा एकच या सर्वांगीण संकटातून व कुचंबणुकीतून सुटण्याचा तर्कशुद्ध मार्ग दिसत होता. पण कम्युनिस्ट राष्ट्रात व्यक्तिस्वातंत्र्याचा संपूर्ण नाश, भीतीचे, अस्नेहाचे, संशयाचे, कठोरतेचे वातावरण, क्रूर हुकूमशाही यांमुळे मानवी जीवन सुखशून्य, कोंडलेले, गुदमरल्यासारखे व दुःखमय झाले होते. पण आता परिस्थिती दोन्ही बाजूंस बदलत आहे. भांडवलशाही मरणोन्मुख झाली असताच तिला वाचविण्याचा मार्ग केन्सने शोधला व व्यक्तिस्वातंत्र्य शाबूत राहून भांडवलशाहीत लोककल्याणराज्य स्थापता येते हे पश्चिमी राज्यकर्त्यांनी सिद्ध केले आहे. इकडे रशियातील कम्युनिस्ट समाजाचे शिक्षण, आर्थिक सामर्थ्य व लोकांसाठी धनोपयोगाची व उत्कर्षाची संधी यांची जसजशी वाढ होत आहे तसतशी तेथील राजवट सौम्य, शांत, लोकभावनांशी समंजसपणे जुळते घेणारी अशी होत आहे. आता भांडवलशाही राष्ट्रांचा माल खपविण्यासाठीही सक्तीचे बाजार मिळविण्याची गरज नाहीशी झाली आहे. असे बाजार ताब्यात ठेवण्यासाठी शस्त्रास्त्रवाढ व सैन्ये यांजवरचा अनुत्पादक असा प्रचंड खर्च सोसून व त्यामुळे अपरिहार्यपणे उद्भवणाऱ्या युद्धांनी सर्वनाश पत्करण्यापेक्षा अंकित राष्ट्रांना स्वातंत्र्य देऊन त्यांच्या उत्कर्षासाठी त्यांना साहाय्य द्यावे आणि मग त्यांच्या उत्कर्षामुळे मिळेल तो खुषीचा बाजार मिळवावा हा विचार भांडवलशाही राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय धोरणात आता आला आहे. यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक राष्ट्रांतील शंभर कोटीहून अधिक जनता भांडवलशाही राष्ट्रांच्या विचारक्रांतीने स्वतंत्र झाली आहे. पण आता या मागसलेल्या राष्ट्रांची प्रगती कशी होणार हा प्रश्न उद्भवला आहे.

युद्धाचा अनुभव नसलेल्या पुष्कळ मागसलेल्या राष्ट्रांत युद्धाबद्दल मोठे कुतूहल असते. जगाची प्रगती युद्धामुळे झाली आहे असे म्हणणारा लहानमोठा पक्ष जगातील प्रत्येक देशात अजून आहे व तो युद्ध ओढवून घ्यावे म्हणत असतो. युद्धे नको म्हणणारी सरकारेही, आपले उद्दिष्ट युद्धावाचून साध्य होत असले अथवा युद्धात पराभवाची भीती असली तरच युद्धविरोधी असतात. युद्धाने स्वार्थ साधणार असेल तर युद्ध ओढवून घेण्यास कचरत नाहीत. दोन जागतिक महायुद्धे झाली, अॅटमबॉंबने

दोन मोठी शहरे उध्वस्त होऊन आता सारे जग अनेकदा फुटेल इतके ॲटमबॉंब जगात साठले, तरी युद्ध हवे असा प्रचार माणसे करीत आहेत, ती यामुळेच. युद्धाने माणसांची प्रगती झाली हे एका दृष्टीने खरेही आहे. इतिहासात दुष्ट राज्यकर्ते आंतरराष्ट्रीय युद्धात पराभूत झाले, यामुळेच दुर्बल जनतेची जुलमापासून सुटका झाली. इतिहासात पुरोगामी समाज सामान्यतः प्रतिगामी समाजाशी लढून विजयी झाले आहेत. सरंजामी सत्तांचा भांडवलशाहीने युद्धानेच पाडाव केला. जर्मनी व जपानमधील प्रतिगामी भांडवलशाहीचा पुरोगामी भांडवलशाही व कम्युनिझम यांनी पराभव केला. इतिहासातले, औषधापासून शस्त्रास्त्रापर्यंतचे सारे शोध युद्धाच्या निकडीने लागले, युद्धाने विजयी राष्ट्रांच्या अर्थसंघटना सुधारल्या, माणसांच्या अंगी शौर्य आले, पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाने मोठमोठी साम्राज्ये विलयास जाऊन कोट्यवधी जनता स्वतंत्र झाली, अनेक राष्ट्रात सोशलिस्ट सरकारे आली, वगैरे युक्तिवाद युद्धाच्या बाजूने केला जातो व तो खरा वाटतोही. पण साऱ्या इतिहासात सर्व युद्धे टाळण्याचे शिकस्तीचे प्रयत्न त्या त्या काळच्या मोठमोठ्या लोकांनी केले होते हेही लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय इतिहासात कांहीही घडलेले असो, आजच्या जगात मागासलेल्या राष्ट्रांना युद्ध हे मुळीच हितावह नाही. आर्थिक विकासाचे तंत्र व शास्त्र आता इतके विकासले आहे व आणखी आणखी इतक्या वेगाने विकासत आहे की त्यातच शौर्य, धैर्य, दूरदृष्टी, सहकार्य, चिकाटी वगैरे सर्व राष्ट्रीय गुणांच्या विकासाला भरपूर वाव असून नव्या नव्या भौतिक संशोधनांत हटकून यश येण्याइतके शास्त्रीय हिशेब पक्के झाले आहेत. उलट युद्धांनी आता शौर्य-धैर्यादि गुणांचा लाभ होत नसून स्त्रिया, मुले, वृद्ध, न लढणारे नागरिक, शेकडो वर्षांची संपत्ती या सर्वांचा विध्वंस होतो. उलट शांततेच्या काळात राष्ट्राराष्ट्रांच्या सहकार्याने सर्व मानवी गुणांचा उत्कर्ष होऊन मागसलेल्या राष्ट्रांना पुढारलेल्या राष्ट्रांचे साहाय्य व मार्गदर्शन मिळते. शिवाय जगातील राष्ट्राराष्ट्रांची शस्त्रास्त्रे कमी झाल्यावाचून वातावरणात सुरक्षितता वाटणार नाही आणि शस्त्रास्त्रावरील खर्च कमी झाल्याशिवाय मागासलेल्या राष्ट्रांना पुढारलेल्या राष्ट्रांकडून संधी व साहाय्य मिळू शकणार नाही हेही उघड आहे.

पुढारलेली राष्ट्रे व मागासलेली राष्ट्रे असे जगाचे निव्वळ द्विदल वर्गीकरण करणे हेही भ्रामक आहे, असा एक महत्त्वाचा विचार प्रो. गॅलब्रेथ यांनी मांडला आहे. एका राष्ट्रगटाने मदत देत राहायचे व दुसऱ्या गटाने मदत घेत राहायचे असा या द्विदल वर्गीकरणाचा अर्थ होऊ शकतो. पण जगाची वस्तुस्थिती अशी आहे की विकासाच्या अनेक टप्प्यांवर निरनिराळी राष्ट्रे असून एका टप्प्यावरील राष्ट्राने पुढल्या टप्प्यावरील राष्ट्राचे साहाय्य घ्यायचे व मागल्यांना आपण साहाय्य द्यायचे असाच जागतिक विकासाचा क्रम राहील असे प्रा. गॅलब्रेथ म्हणतात. यासाठी प्रत्येक राष्ट्राला विकासाची आस लागली पाहिजे. ज्याने त्याने स्वतः विकासप्रयत्नाची हिंमत बांधून आपण साहाय्याला पात्र आहो अशी स्वतःची व इतरांची खात्री केली पाहिजे

व आपल्याहून मागसलेल्यांना साहाय्य करण्याची उत्सुकता व त्यासाठी त्यागाची तयारी दाखविली पाहिजे. केन्सच्या विचारसरणीतच पुढारलेल्या राष्ट्रांनी मागसलेल्या राष्ट्रांना मदत करण्याची शक्यता अनुस्यूत आहे व तशी त्यात प्रेरणाही आहे. शांततेने आर्थिक प्रगती करण्याचा हा सुगम उपाय केन्समुळे सापडून जगापुढे दुसऱ्या महायुद्धापूर्वीपर्यंत असलेली भयंकर चिंता नाहीशी झाली आहे.

व्या|ख्या|न
दु | स | रे

# स्वतंत्र भारताचा आर्थिक विकास

पुढारलेली राष्ट्रे व मागासलेली राष्ट्रे असे जगातील राष्ट्रांचे द्विदल वर्गीकरण न करता विकासमार्गावरील राष्ट्राची ही एक लांबवर पसरलेली रांग आहे असे जगांतील राष्ट्रांचे चित्र रेखाटले म्हणजे भारत हे पुढारलेले राष्ट्र की मागासलेले राष्ट्र असा प्रश्न न विचारता विकासाच्या कोणत्या टप्प्यावर भारत आहे असा प्रश्न विचारावा लागतो.

आफ्रिकेत काँगोसारखी जी राष्ट्रे नुकतीच स्वतंत्र झाली ती पन्नासपाऊणशे वर्षे पुढारलेल्या राष्ट्रांच्या अमलात राहिली तरी तेथे कोट्यवधी लोकसंख्येत चारपाचशे माणसेही सुशिक्षित झालेली नाहीत. सामान्य जनता अगदी उघडी नागडी, विश्वदरिद्री व अडाणी आहे, अशा परिस्थितीत ती राष्ट्रे आहेत. त्या मानाने भारताची परिस्थिती पुढारलेली आहे. इंग्लंडने भारत जिंकला तेव्हा येथे तत्कालीन विद्या, कला, संस्कृती यांत पुष्कळ वाढ झालेली असून सुबुद्ध विचार सामान्य जनतेपर्यंतही पोचलेले होते. प्राचीन हस्तव्यवसाय व कारागिरी या देशात इतकी उत्कर्ष पावली होती की येथल्या मालाला त्याकाळी परदेशात मागणी असे. भारत धनवान आहे या त्याच्या लौकिकानेच भारताचा शोध करण्याचा, भारताला जाणारा समुद्रमार्ग शोधण्याचा, प्रयत्न पाश्चात्यांनी केला व त्या प्रयत्नात त्यांना अमेरिका सापडली. पण ज्याकाळी पाश्चात्य देशात साहसी माणसे जगाच्या पर्यटनास निघाली, व्यापार, नौकानयन यांत युरोपीय राष्ट्रे धाडशीपणा दाखवू लागली, त्याकाळी भारताची प्राचीन कालापासून जी काही संस्कृती परंपरेने आली होती तिची वाढ शेकडो वर्षे खुंटलेली होती.

इंग्रजांचा भारतात प्रवेश होण्याचे वेळी येथे अनेक राज्यांची युद्धे व एकेका राज्यात यादवी हे विध्वंसप्रकार सतत चालू होते. त्यांचा खेड्यापाड्यापर्यंत संपर्क पोचत नव्हता. ग्रामीण भागांची प्रगती खुंटलेली होती तरी जुन्या काळचे शेती, विणकाम, बांधकाम, सुबक व नाजुक कारागिरी वगैरे व्यवहार अगदीच खंडित झाले नव्हते. पण ब्रिटिशांच्या आधुनिक मालाच्या आयातीने ग्रामीण भागातली उच्च दर्जाची ती कारागिरीही खालावली. मोंगल राजे कलाकौशल्याचे भोक्ते व आश्रयदाते असल्याने मोठ्या शहरांच्या आसपास वाढलेली कला मात्र या देशात पुष्कळ काळ टिकून राहिली. या परिस्थितीत इंग्रज राज्यकर्त्यांनी या देशाला दिलेली मोठी देणगी म्हणजे आधुनिकता. वाहतुकीच्या व दळणवळणाच्या आधुनिक साधनांनी त्यांनी एक विस्तीर्ण व विकीर्ण देश एकत्र आणला. नक्त पगारी नोकरवर्ग नेमून विशिष्ट नियमांनी व कायद्यांनी बांधलेली नोकरशाही हा एक नवा राज्यप्रकार येथे सुरू केला. शिक्षणप्रसार करून वकील, डॉक्टर, कारकून, अधिकारी निर्माण केले. त्याच शिक्षणांतून टागोर, गांधी, टिळक ही अलौकिक बुद्धिमत्तेची माणसेही निर्माण झाली. पण भारतावर इंग्रजांची सत्ता स्थापन झाल्यानंतरच्या काळात खुद्द ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, जपान ही राष्ट्रे ज्या मानाने उत्पादनक्षम आणि धनाढ्य व बलाढ्य झाली त्या मानाने ब्रिटिश अमलात भारताची प्रगती फारच थोडी झाली. याला काही ऐतिहासिक कारणे होती; काही कारणे इंग्रजांनी आपली राजवट टिकविण्यासाठी हेतुपूर्वक निर्माण केली; काही त्यांच्या राज्यकारभाराच्या पद्धतीतून अहेतुकपणे निर्माण झाली.

## विकासमार्गातले ऐतिहासिक खाचखळगे

भारतातील हिंदुधर्माचे विशिष्ट स्वरूप हे भारताची प्रगति थांबण्याचे पहिले व ऐतिहासिक महत्त्वाचे कारण होय. हिंदू हे नाव या धर्माला कधीही मिळालेले असो, पण या धर्मातला समाज कधीही कोणत्याही अर्थाने एक नव्हता. अनेक विभिन्नांना, विस्कळतांना एकत्र एका संघटनेत आणून संख्याबल व संघटनाबल वाढविणे हे मुख्य काम ख्रिस्ती व महंमदी धर्मांने जगात केले, तर उलट हिंदुधर्म हा या देशात निव्वळ विघटनाकार ठरला आहे. जातिभेद व पोटजातिभेद यांनी हा हिंदुसमाज सर्वत्र फाटलेला आहे. हिंदुधर्म हा सहिष्णु धर्म आहे असे मानले जाते ते खरे नसून हा खरोखर सामाजिक दृष्ट्या बेफिकीर धर्म आहे. हेतुपूर्वक बदल अथवा प्रगती या धर्माला माहीतच नाही. या धर्मात थोर साधुसंत व विद्वान अनेक होऊन गेले. पण त्यांनी सनातन क्रूर रूढी मोडल्या नाहीत. साऱ्या जगात अपरिवर्तनीय जाती व अपरिवर्तनीय स्पृश्यास्पृश्य रूढी हिंदूतल्या इतक्या कोठेही नाहीत. मुसलमानांनी भारतावर आक्रमण केले तेव्हा रजपूत हे शूर गणले जात होते. पण ते आपसात भांडले व मुसलमानांना शरण गेले. जातिभेदाने हिंदु समाजाला आलेली दुर्बलता रजपुतांना कधीच झोंबली नाही; ती त्यांच्या लक्षातही आली नाही. चंद्र, सूर्य, तारका या जशा

शाश्वत तसेच जातिभेद शाश्वत असे त्यांच्या सुप्त मनात वाटत होते. हिंदूंच्या खुळ्या धार्मिक समजुतींचा फायदा घेऊन लाखो माणसे हिंदुधर्मातून मुसलमान काढून नेत आहेत, मुसल्मानांची संख्या वाढवीत आहेत याची फिकीर हिंदूंनी कधी केली नाही.

या बाबतीत ब्राह्मणवर्गाकडे फार मोठा दोष येतो. मुसलमानांकडील चतकोर भाकरी अथवा चिमूटभर मांस एखाद्या हिंदूने खाल्ले की तो मुसलमान झाला असे ब्राह्मण मानत व सर्व हिंदू समाजही तसे मानी. काश्मीरचे सारे मुसलमान हे मूळचे हिंदू. त्यांना परत हिंदुधर्मात घेण्याचा विचार शंभर वर्षांपूर्वी त्यावेळच्या हिंदू राजाने केला होता. पण काशीच्या ब्राह्मणांनी काश्मीरच्या राजाचा तो विचार हाणून पाडला. शिवाजीने आपल्या घराण्याचे हिंदुराज्य स्थापले. पण हिंदुधर्मातील जातिभेदांनी समाज फाटतो, दुबळा होतो याची फिकीर त्याने कधीच केली नाही. मुसलमान झालेल्यात ताबडतोब धार्मिक एकजूट होते व त्यांचे संघबळ, माथेफिरूपणा, धर्माभिमान यांत अचानक वाढ होते. हेच लोक हिंदु असता मेषपात्र असून आपसात फुटलेले असतात हे दुहेरी दृश्य शिवाजीच्या डोळ्यासमोर असताही त्याचा विचार त्याने कधी केलाच नाही. इंग्रजी अंमल स्थिर झाला तेव्हा हिंदुमुसलमान वैर शमले होते. पण मुसल्मानांचा कडवेपणा व जातीय अभिमान इंग्रजांनी जागृत करून राष्ट्रीय चळवळीच्या मार्गात मोठी धोंड निर्माण केली. पण ब्रिटिशांच्या या धोरणाचा प्रतिकार करण्यासाठी ज्यांनी हिंदुसंघटनेची चळवळ केली त्यांना हिंदूंतल्या जाती नष्ट करता आल्या नाहीत व आपल्या चळवळीला हिंदूंचा पाठिंबाही मिळविता आला नाही. खिस्तीधर्माची चळवळ ही तर सांस्कृतिक सुधारणेचीच चळवळ ठरली. जो खिस्ती झाला त्याची सांस्कृतिक सुधारणा मिशनरी करीत. पण हिंदूंतली लाखो माणसे खिस्ती होऊन सांस्कृतिक सुधारणेचा फायदा घेऊ लागली तरी वरिष्ठ हिंदूंनी या गोष्टीचा मत्सरही कधी केला नाही अथवा यापासून सुधारणेची प्रेरणा कधी घेतली नाही. हल्ली फार महत्त्वाची कारागिरी मुसल्मानात आढळते. याचे कारण मुसल्मान धर्मगुरूंनी ही कारागिरी त्यांना शिकवली असे नव्हे. तर हिंदुसमाजातील कारागिरांच्या जातींच्या जाती त्याकाळी मुसलमान झाल्या हे होय. यामुळे हिंदुसमाज आर्थिक दृष्ट्या अत्यंत दुबळा झाला. हिंदूंतील अस्पृश्यतेइतकी क्रूर व जुलुमी रूढी जगात कोठेही नाही. आणि ती रूढी सहज नाहीशी करणे हे शक्य आहे, याचा अनुभव आधुनिक काळात शहरात नेहमी येत असता ती रूढी नाहीशी करण्याचा हिय्या कोणीही धरीत नाही.

भारतातील धर्मांचे व धर्मभेदांचे प्रश्न सुटणे अवघड आहे, आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीला त्यांचा मोठा अडथळा आहे, त्यातल्या त्यात हिंदु धर्माचा अडथळा फार मोठा आहे, एवढे सांगण्यासाठी वरील परिस्थिती मांडली. आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीचा वेग वाढला व अधिकाधिक समता निर्माण झाली म्हणजे धार्मिक प्रश्न हळू हळू सुटत जातीलच. चीन व भारत यांची तुलना अलीकडे वरीच होते

व भारत सरकारने भारतीयांना चीनला तोंड देण्याइतके बलवान केले नाही म्हणून टीका केली जाते. पण चीन व भारत यांचे तौलनिक महत्त्वमापन केले जात नाही. चीनची लोकसंख्या भारताच्या लोकसंख्येच्या दीडपट नेहमीच असून गेली दोन हजार वर्षे चिनी समाज एकसंध आहे. तेथे खिस्ती व मुसलमान यांची धर्मांतराने संख्या वाढली, पण आपण चिनी आहो व चीनचा अभिमान आपण बाळगला पाहिजे ही भावना साऱ्या चीनमध्ये शेकडो वर्षे जाग्रत आहे. भारतात शेकडो भाषांमुळे देश जाणीवेच्या बाबतीत फाटून गेला आहे. चीनमध्ये प्रदेशपरत्वे भाषा थोडथोडी बदलली तरी सामान्यतः सर्वत्र एक भाषा सर्वांना कळणारी अशी तेथे आहे. चीन व भारत यांच्यांतील खरा फरक शेतीबाबतचा. चीनवर राज्ये, साम्राज्ये आली, मोडली, पण उत्तम शेती करण्याची कला शेतकरी कधीही विसरला नाही. सर्व लोकसंख्येचे व जनावरांचे मलमूत्र नियमाने खळग्यात घालून त्याचे कंपोस्ट करून चिनी शेतकरी शेतीत घालतो व सघन शेती करतो. शेकडो वर्षे ही प्रथा अखंड चालू आहे. त्याचे दरएकरी पीक भारताच्या दिडीदुपटीने शेकडो वर्षे येते आहे. राज्यकर्ते बदलले तरी शेतीच्या पद्धतीला कोणी धक्का लावला नाही. आणि उत्तम शेतकरी उत्तम सैनिकही होतो हा सर्वत्र येणारा अनुभव चीनमध्ये आला आहे.

उलट भारतात इंग्रजी अमलापूर्वी शेती फारशी चांगली नव्हतीच व इंग्रजी अमलात ती फार खचली ही गोष्ट इतिहासकारांच्याही फारशी लक्षात आलेली नाही. इंग्रजी अमलापूर्वी फार काळ अंदाधुंदीचा गेला. त्याकाळी ग्रामीण समाजव्यवस्थेला कोणी धक्का लावत नसे, तरी सैन्ये शेते तुडवीत आणि शेतकऱ्यांचे धान्य व इतर धन लुटत असत. यामुळे शेती पिकवण्यात शेतकऱ्याला उत्साह नव्हता. राजेलोक गावोगावच्या पाटलाकडून शेतकऱ्यांची आर्जवे करवीत व त्यांना शेती करायला लावण्याचा प्रयत्न करीत पण धोक्याच्या परिस्थिमुळे बरकतीची शेती होत नव्हती. इंग्रजी अमलात याच्या उलट्या बाजूने शेतीची धूळधाण झाली. इंग्रजांनी कायदा व सुव्यवस्था आणली. पण या कायद्यांनी शेतकरी व शेती यांची नागवणच झाली. हा मुद्दा नीटपणे समजून घेतला पाहिजे. युरोपातले सरंजामदार-जमीनदार हे परंपरागत असून ते शेतीच्या विकासाला कारण झाले. पण भारतात, मुख्यतः बंगालमध्ये जे जमीनदार ब्रिटिशांनी निर्माण केले ते मोंगलांचे जमीनसारावसुलीचे अधिकारी होते. हेस्टिंग्जच्या कारकीर्दीत ते मोगलांऐवजी ब्रिटिशांना जमीन महसूल देऊ लागले. हेस्टिंग्जने जमीनमहसुलाचे लिलाव करून शेतकऱ्याला कफल्लक करून जास्तीत जास्त वसुली आणणाऱ्यांना वसुलीची मक्तेदारी दिली. या मक्तेदारांनी वसुली फाजील प्रमाणात करून शेतकऱ्याला कफल्लक करून टाकले. त्यामुळे शेतकऱ्याजवळ भांडवल राहिले नाही व जमिनीचा कस कमी कमी होत गेला. पुढे ब्रिटिशांनी या महसूलमक्तेदारांनाच जमीन-मालक करून त्यांना कायमचा जमीनसारा ठरवून दिला. तेव्हा त्या जमीनदारांनी शेतकऱ्यांना उपरी करून खंड वाढविले, त्यांच्यावर वसुली एजंट नेमले. त्या एजंटांनी

आपले एजंट नेमले. अशा प्रकारे विनभांडवलाने निकस शेतीत राबणाऱ्या शेतकऱ्याच्या डोकीवर शोषक जळवांची एक उतरंड ब्रिटिशांच्या अमदानीत चढवण्यात आली. पण ब्रिटिशांच्या कठोर व कार्यक्षम अमलात शेतकरी बंड करू शकला नाही. महाराष्ट्र, मद्रास वगैरेसारख्या ज्या प्रांतात रयतवारी पद्धत आली तेथेही परिस्थिती याहून फारशी अधिक चांगली नव्हती. कारागिरी बुडाली, सैनिकी पेशा गेला, लोकसंख्या वाढली, यामुळे जमिनी मिळविण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये चढाओढ लागून खंड वाढले. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला. सावकारांनी कर्जापोटी जमिनी गिळंकृत केल्या. पण त्यांचा विकास न करता जमिनी पुन्हा त्याच त्याच कुळाकडे ठेवून खंड, व्याज व कर्जफेड यापायी शेतकऱ्याला कफल्लक केले. यामुळे शेतीत घालायला शेतकऱ्याजवळ भांडवल राहिले नाही व जमिनींचा कस कमी होत गेला. चालू शतकाच्या सुरवातीस जवळजवळ सर्व प्रांतांत अशी स्थिती झाली होती की सरकारचे मोठ्यात मोठे उत्पन्न देणारा जो जमीनसारा तो देण्याची ऐपत प्रचंड बहुसंख्य शेतकऱ्यांजवळ नव्हतीच, व सरकार चिंताग्रस्त झाले होते.

ब्रिटिश अमलात चलनी नाण्याला महत्त्व आले. सरकार, सावकार, दुकानदार, यांना रोखीने पैसा देणे शेतकऱ्याला भाग पडू लागले. मागसलेल्या देशात वाहतुकीची आधुनिक साधने वाढली व चलनव्यवहार सुरू झाला की अर्थसंघटना भरभराटते असे मानण्याची रीत आहे. पण भारतात या आधुनिक वाहतुकीने व चलनव्यवहाराने शेतकऱ्याचे या देशात प्रथम नुकसानच झाले. १८२५-५० या काळातल्या 'ज्ञानोदय' साप्ताहिकातला एक उतारा अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. त्यात लेखकाने पुढीलप्रमाणे तक्रार केली आहे :

"शेतीतून पीक निघून बाजारात येताच शेतकऱ्याला रोकडीची निकड असल्याने तो चढाओढीने माल विकतो व त्याच्या मालाच्या किमती कोसळतात. पैशाची निकड फार असल्याने कमी पीक आले असले तरी त्यांतले शेतकऱ्याला विकावे लागते. मग व्यापाऱ्याच्या हाती माल गेला म्हणजे त्याचे भाव भडकतात व शेतकऱ्याला वर्षाच्या उत्तरार्धात घरी खाण्यासाठी जेव्हा धान्य खरीदावे लागते तेव्हा त्याला धान्य विकताना किंमत मिळालेली असते त्यापेक्षा फारच अधिक किंमत देऊन त्याला धान्य खरीदावे लागते. म्हणून सरकारने शेतकरी धान्य विकतो त्यावेळी त्याला रास्त किंमत देऊन त्याचा माल खरीदावा, त्याचे जागोजाग साठे करावे आणि पुन्हा शेतकऱ्याला धान्य खरेदी करावे लागेल त्यावेळी त्याला ते रास्त किंमतीला द्यावे. म्हणजे शेतकऱ्याची पिळवणूक टळेल." (सारांश). एकशे पंधरा वर्षांपूर्वीची ही स्थिती आहे आणि आजही सरकारला वरीलसारखाच उपाय सुचविण्यात येत आहे, यावरून गेल्या शंभर वर्षांत आणि स्वातंत्र्यानंतरच्या अठरा वर्षांवरील परिस्थितीत मूलग्राही फरक काहीच झाला नाही हे लक्षात येते.

पालेमोड-निवारणयोजना हल्ली सरकार कोठे कोठे हाती घेत आहे. ही पाले-

मोड म्हणजे काय ? पालेमोड याचा अर्थ, पेरणीच्या वेळी शेतकऱ्याजवळ पेरण्याला व खाण्यालाही धान्य नसते, मग तो व्यापाऱ्याकडून पोतेभर धान्य आणतो आणि चार महिन्यात सव्वा पोते परत करण्याचा करार करतो. व्यापारी शेतातील पिकावरच आपला हक्क ठेऊन पीक आले की ते कर्जफेडीदाखल घेतो. यामुळे शेतकऱ्याची पिढ्यानुपिढ्या लूट होत राहिली आहे. सारी ब्रिटिश अमदानी ही 'पालेमोड राज्य' होती व काँग्रेसच्या अठरा वर्षांच्या अमदानीतही ही पालेमोड थांबलेली नाही.

चीन, रशिया यांसारख्या मूळच्या मागासलेल्या व हल्ली कम्युनिस्ट अमलाखाली गेलेल्या देशांबाबतचे एक ऐतिहासिक सत्य आहे की 'मालकीची जमीन सावकारी कर्जाच्या फेडीपोटी खरेदीविक्री करता येते' हा कायदा तेथल्या कोणत्याही जुन्या राजवटीत नसल्याने व सरकारच्या पोलिसाचा व कोर्टाचा अमल त्या त्या देशात खेड्यपाड्यापर्यंत कार्यक्षम असा कधीच न बसल्याने कष्टकरी शेतकऱ्याची लूट व नागवणूक, मालकीची जमीन हिरावली जाण्यापर्यंत, कधीच फारशी पोचली नाही. सरंजामदार व जमीनमालक कठोरपणे वागले तर शेतकरी संघटितपणे त्याला जरब दाखवीत. यामुळे शेतकऱ्याची शेतीबद्दलची आस्था व मेहनतीने शेती करण्याची सवय सुटली नाही. भांडवलशाही पिळवणुकीचा कालखंड तेथे शेतीत कधी आलाच नाही. जुन्या सरंजामशाहीतून एकदम कम्युनिझमखाली जाण्याचे भाग्य रशिया व चीन येथील शेतकऱ्यांना लाभले व कम्युनिस्ट राज्यकर्त्यांना सुरुवातीला त्या शेतीचा मोठा आधार मिळाला. भारतात ब्रिटिश अमलाने शेतीत प्रतिगामी भांडवलशाही म्हणजे सावकारशाही आणली, त्यामुळे वर सांगितल्याप्रमाणे शेतीचा विकास होण्याऐवजी शेती उजाड झाली.

चालू शतकाच्या आरंभी भारतात काही विद्वान लेखक व विचारवंत भांडवलदारी शेतीचा पुरस्कार करीत होते. त्यांच्या मते सावकारांनी कर्जापोटी जमिनी घेतल्या तरी ते जमिनीत भांडवल घालून पीक अधिक काढतील. पण प्रत्यक्ष अनुभव वेगळा आला. शेतीमाल चांगला पिकला की किमती कोसळतात व भांडवलातही नुकसान येते आणि ज्यावर्षी पीक कमी येते त्यावर्षी किंमत अधिक आली तरी बुडालेले भांडवल भरून निघत नाही हे सावकारांना दिसत होते. म्हणून सावकार कर्जापोटी जमिनी मिळवीत तरी पण त्या स्वतः कसण्याची जबाबदारी न घेता शेतकऱ्याला कसणुकीसाठी देत, पण त्याला शेतीविकासासाठी साहाय्य व मार्गदर्शन करीत नसत. आणि खंड, व्याज व मुद्दल जास्तीत जास्त प्रमाणात त्याजवर लादून शेतकऱ्याला चिपाड करीत. यामुळे ब्रिटिश अमदानीत भारतातल्या शेतकऱ्याची, खस्ता खाऊन शेती करण्याची सवय सुटली व शेतीचा मूळचाही कमीच असलेला कस आणखी कमी कमीच होत गेला. पस्तीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या शेतीकमिशनच्या रिपोर्टात शेतीची ही दुःखकथा इतकी स्पष्टपणे मांडली गेलेली नाही. पण शेतीचा ऱ्हास, दुरुस्ती करण्यास अत्यंत कठिण इतक्या अवस्थेपर्यंत गेला असल्याची कबुली त्या कमिशनने दिली आहे.

नंतरच्या वीस वर्षांत जागतिक मंदी व युद्ध ही संकटे आल्यामुळे शेती आणखी खचत गेली. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या पन्नास वर्षांत भारतातल्या शेतीचे एकूण पीक अथवा शेतीचा मगदूर यांची वाढ झालीच नाही. मंदीचा फटका शेतीलाच फार बसला व सारे शेतकरी कर्जबाजारी झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात शेतीमालाच्या किंमती वाढल्या. यामुळे काही शेतकरी थोडे सावरले, त्यांनी गहाणवटे सोडवून घेतली. पण शेतीचा मूलग्राही विकास तेव्हा झालाच नाही. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीची शेतीचीही ऱ्हासकथा येथे मुद्दाम सांगितली आहे. चीन व रशिया या देशांतील कम्युनिस्ट सरकारांनी शेतीची प्रगती भराभर केली, पण भारत सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अशी भराभर प्रगती केली नाही अशी अनेकांची तक्रार आहे. ही तक्रार बऱ्याच अंशी खरीही आहे. पण कोणत्या प्रकारच्या शेतीचा वारसा तेथल्या राज्यकर्त्यांना मिळाला होता व स्वतंत्र भारताच्या सरकारला कोणत्या प्रकारची शेती वारसाक्रमाने मिळाली या विषयीचे अज्ञान या तक्रार करणाऱ्यांच्या ठिकाणी आहे. ते दूर व्हावे म्हणून वरील माहिती सांगितली. स्वातंत्र्यकाळात भारत सरकारने व राज्यसरकारांनी शेतीची जाणूनबुजून हेळसांडही केली आहेच. ती क्षम्य आहे असे मला म्हणायचे नाही. तो विषय पुढे येणारच आहे.

## स्वतंत्र भारतातील विकास

भारतातील ब्रिटिश अमलात आधुनिक उद्योगधंद्याची येथे वाढ होऊन स्वदेशी भांडवलशाहीही निर्माण झाली हे खरे आहे. पाश्चात्य राष्ट्रांच्या अमलाखालून अलीकडेच स्वतंत्र झालेल्या कोणत्याही देशात विदेशी साम्राज्यसत्तेखाली एवढी प्रगती झाली नव्हती. पण स्वतंत्र भारताला फार मोठ्या औद्योगिक विकासाचा वारसा मिळाला असा याचा अर्थ नव्हे. ब्रिटिश अमलापूर्वी फार उच्च दर्जाची कारागिरी भारतात होती. साध्या डोळ्याला दिसरणारही नाही इतका बारीक धागा काढून त्याची जी अत्यंत बारीक मलमल ढाक्यास विणली जाई तिचा पाश्चात्यांना मोह पडला होता. दिल्लीजवळच्या कुतुबमिनारचे पोलाद आजच्या शास्त्रज्ञांनाही फार श्रेष्ठ गुणाचे असल्याचे आढळले आहे. हा कुतुबमिनार १५०० वर्षांइतका प्राचीन आहे.

पहिल्या महायुद्धकाळी भारतात थोडासा औद्योगिक विकास सुरू झाला. त्या युद्धानंतरच्या काळात कापडगिरण्या व तागगिरण्या थोड्याशा वाढल्या व त्यांच्या आसपास यंत्रे दुरुस्त करण्याचे लहान लहान वर्कशॉप्स वाढले. सडका व आगगाड्या यात थोडीच वाढ झाली. कोळसा मुख्यतः रेल्वेच्या गरजेसाठी खाणीतून निघू लागला. जमशेटपूरचा टाटांचा पोलाद कारखाना पहिल्या महायुद्धापूर्वीच निघाला होता. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरपर्यंत तेवढा एकच कारखाना होता. सीमेंट, साखर, कागद वगैरे काही धंदे निघाले होते. रसायने निर्मिण्याचे कारखाने फार थोडे होते. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतात एकदम खूप धंदे वाढले असा एक समज आहे. पण

१९५१ साली म्हणजे पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षी युद्धपूर्वकाळापुढे भारताचा औद्योगिक विकास फारसा गेला नव्हता असे संशोधकांनी नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर स्वतंत्र भारताचा आर्थिक विकास कसा काय झाला हे पाहून नंतर त्यासंबंधाने चर्चा करू.

स्वतंत्र भारतात औद्योगिक उत्कर्ष नमूद करण्यासारखा झाला असल्याचे पाश्चात्य तज्ज्ञांनीही म्हटले आहे. शेतीच्या व उद्योगांच्या उत्कर्षाचा फक्त अतिसंक्षिप्त आढावा येथे घेतो. पहिली पंचवार्षिक योजना जुनी कामे पुढे चालविण्यात वापरली गेली. शिवाय पहिल्या योजनेत वीजशक्ती, वाहतूक व शेती यांवर भर देण्यात आला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून नवीन उद्योगधंद्यांच्या वाढीवर विशेष भर देण्यात आला. भारतात पोलाद, सीमेंट, विविध रसायने इत्यादींना लागणारा कच्चा माल भरपूर असून कोळसानिर्मिती, वीजनिर्मिती इत्यादींसाठी योग्य स्थळे पुष्कळ आहेत. यामुळे औद्योगिक उत्कर्षास भारतात वाव बराच असून त्याचा पुष्कळ उपयोग करण्यात आला आहे. १९५१ साली भारतात दोन मोठे पोलाद कारखाने व एक लहान कारखाना होता. त्यात सालीना ११ लाख टन पोलाद तयार होई. १९६० पर्यंत यांची उत्पादनशक्ती पुष्कळ वाढली. शिवाय ब्रिटन, जर्मनी व रशिया यांनी अनुक्रमे दुर्गापूर, राउरकेला व भिलाई हे पोलाद कारखाने सुरू केले. या सर्वांपासून १९६३–६४ साली ४४ लक्ष टन पोलाद निघाले. सायकली १९५५ साली ५ लक्ष निघत होत्या त्या १९६४ साली १४ लाखांवर गेल्या. मोटारी याच मुदतीत २३ हजारांवरून १ लाखांवर, शिवण्याची यंत्रे १ लाखावरून ७ लाखांवर, सल्फ्यूरिक ॲसिड १ लक्ष ६९ हजार टनांवरून सवा पंधरा लाख टनांवर, साखर १६ लाख टनांवरून २१ लाख टनांवर (१९६१ साली ३० लाख टनांवर), सीमेंट साडे पंचेचाळीस लाख टनांवरून १ कोटी ३२ लक्ष टनांवर अशी प्रगती झाली आहे. १९५१ साली कापड ५०० कोटी वार निघत होते ते आता ८०० कोटी वारांवर गेले आहे. विजेचे पंखे १९५१ साली फक्त २ लाख तयार होत. १९६४ साली १२ लाख विजेचे पंखे तयार झाले. एंजीनिअरिंग कारखान्यातली यंत्रे व कापडगिरण्या, साखरगिरण्यांतील यंत्रे करण्याचे कारखानेही आता निघाले असून त्यांचे उत्पादन सतत वाढत आहे.

सरकारचे परराष्ट्रधोरण अमेरिकेला प्रतिकूल असून खाजगी धंद्यापेक्षा सरकारी धंद्यावर सरकार फार भर देते यामुळे विदेशी भांडवल या देशात येणार नाही अशी भीती स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात व्यक्त केली जात होती. पण प्रत्यक्षात ही भीती खोटी ठरली आहे. १९४८ साली भारतात परदेशी भांडवल २५६ कोटी रुपयांचे होते, १९६० साली हा आकडा ६९० कोटी रुपयांवर गेला. आता हे विदेशी भांडवल ९०० कोटींवर गेले आहे. भारतीय भांडवलदारांच्या धंद्यात विदेशी भांडवलदार सहकार्य करीत असून याविषयी परदेशी व स्वदेशी भांडवलदारांचे २२०० करार

झाले आहेत. औद्योगिक उत्पादन गेल्या पंधरा वर्षांत दुप्पट झाले आहे हे तर साध्या आकड्यांवरून कळते. पोलाद, यंत्रे, रासायनिक द्रव्ये, शस्त्रास्त्र इत्यादींच्या उत्पादनामुळे औद्योगिक उत्पादनाचा दर्जा वाढला आहे.

शेतीमालाच्या उत्पादनात चालू शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत जवळजवळ मुळीच वाढ झालेली नव्हती हे लक्षात घेता गेल्या पंधरा वर्षांत झालेली वाढ बरीच मोठी आहे असे आढळेल. १९५०–५१ साली तांदूळ २ कोटि ३५ लक्ष टन झाला, तर १९६३–६४ साली ३ कोटी ६४ लक्ष टन झाला; गव्हाचे हेच आकडे अनुक्रमे ६३ लक्ष व ९७ लक्ष टन आणि एकूण अन्नधान्याचे अनुक्रमे ५ कोटी ४९ लक्ष टन व ७ कोटी ९४ लक्ष टन असे आहेत. याच मुदतीत अन्नधान्याखालील जमीन १० कोटी हेक्टेरवरून ११ कोटी हेक्टेरवर गेली आहे. (हेक्टेर म्हणजे अडीच एकर). उसाखालची जमीन १७ लाख हेक्टेरवरून २२ लाख हेक्टेरवर गेली असून उसाचे उत्पादन पंधरा वर्षांत दुप्पट झाले आहे. कापसाचे उत्पादन दुप्पट झाले आहे, तागाचे उत्पादन अकरा पट झाले आहे. तंबाखूचे उत्पादन जवळजवळ दीडपट वाढले आहे.

लोकसंख्या मात्र या पंधरा वर्षांत ३६ कोटींवरून ४७ कोटींवर गेली. १९४१-५१ च्या वाढीपेक्षा १९५१–६१ या दशकात दीडपट वाढ लोकसंख्येत झाली. आणि ही वाढ त्यापुढे अधिकच वेगाने होत चालली असल्याने आता चिंता उत्पन्न झाली आहे.

हल्ली आर्थिक बाबतीत जनतेत जो असंतोष आहे तो बाजारभाव फार वाढले यामुळे आहे. सर्व वस्तूंच्या किमती १९५०–५१ ते १९६२–६३ या काळात १११·८ पासून १२७·९ निर्देशांकांवर गेल्या. पण १९६२–६३ नंतर १९६४–६५ पर्यंत दोन वर्षांत त्यापुढे १५२·७ वर गेल्या. म्हणजे पहिल्या ११ वर्षांत १६ निर्देशांक महागाई वाढली, तर पुढील दोनच वर्षांत २५ निर्देशांक महागाई वाढली असून युद्ध वगैरे निमित्तांनी ही महागाई आणखी भडकतेच आहे. चोहोकडे सर्व वस्तु व सोयी याबाबत माजलेली महागाई व टंचाई, हिमालयावरील रणांगणातला पराभव आणि अठरा वर्षांतही मुख्यतः मध्यम वर्गाला नको असलेले पण न बदललेले सरकार यामुळे महाराष्ट्रातला व भारतातलाही मध्यमवर्ग फार चिडला आहे. सत्ताधारी वर्गाने अनेक बाबतीत राज्यही फार नालायकीने केले. राज्यकर्त्यांतील बहुसंख्यांच्या ठिकाणी ध्येयवाद उरला नसून सत्ता व मानमरातब यांमागे ते धावत आहेत. लोकहित व लोकमत याबाबत अगदी उन्मत्तपणें व बेफिकीरपणे ते वागत आहेत. यामुळे लोकात असलेला असंतोष समर्थनीय असाच आहे. एका महागाईच्या मुद्द्यावर सरकारविरोधी मोहीम काढून कोणी पुढील निवडणुकांत काँग्रेसचा पराभव करू पाहाणार असतील तर त्यांना बरीच अनुकूल संधी यावेळी आहे. सार्वत्रिक निवडणुका अगदी काही महिन्यांवर आल्या आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थिती तोवर भारताला अधिक अनुकूल होईल व आंतरराष्ट्रीय संकटाची कारणे निवडणुका तहकूब करण्यासाठी राहाणार नाहीत. भारताला चालू आंतरराष्ट्रीय राजकारणात जरी यश लाभले असले

तरी हे आंतराष्ट्रीय राजकारणातले यश सर्व पक्षांच्या पाठिंब्याने मिळाले असल्याने निवडणुकीत तो पक्षीय विग्रह विषय होऊं शकणार नाही. आणि मग भडकलेली महागाई, अन्नधान्याची तूट, शेतीचे घटू लागलेले उत्पादन आणि लोकांचा असंतोष, चोहोकडून अर्थसंघटनेत येत असलेली निर्जीवता या आपत्ती अजून दीर्घकाल राहणार असल्याने या सर्व आपत्तींबाबत काँग्रेससरकारला जबाबदार धरून निवडणुकीत सर्व विरोधी पक्ष काँग्रेसविरुद्ध जोरदार मोहीम काढू शकतील.

पण त्यांना जर यश येऊन काँग्रेसचा पाडाव झाला तर या विरोधी पक्षांना सत्ता स्वीकारून राज्य चालवावे लागेल, धोरणे आखावी लागतील. तेव्हा त्यांना येथल्या अर्थव्यवहाराचा शास्त्रशुद्ध विचार करावा लागेल. अजून तसा ते करीत नाहीत. आजची विरोधी पक्षांची मोहीम रोग्याच्या संतापासारखी आहे. रोगजन्य दुःखाने व संतापाने रोगी विव्हळतो. ते रास्त असते. पण विव्हळणे हा काही रोगनिवारणातला महत्त्वाचा भाग नव्हे. डॉक्टराला रोगनिवारणाचे प्रयत्न करताना रोगाचे कारण शोधावे लागते, उपाय शोधावा लागतो, या उपायात रोग्याला काही दुःख पत्करावे लागते, काही पथ्य पाळावे लागते. विरोधी पक्षांनी आज विव्हळत राहून रोग्याची भूमिका घेतली आहे ती सोडू नयेच. पण त्याचबरोबर थोडीशी आता डॉक्टराचीही भूमिका घेतली पाहिजे व निवडणूकप्रचारात नुसतेच न विव्हळता आजच्या आर्थिक परिस्थितीची कारणमीमांसा करून तिजवर आपण काय उपाय करणार, लोकांची कर्तव्ये काय व लोकांना सुखदुःख काय सोसावे लागेल यासंबंधीचे आपले विचार विरोधी पक्षांनी स्पष्टपणे मांडून लोकमत जागृत व सुबुद्ध केले पाहिजे, तरच दिवसानुदिवस अधिकाधिक कठिण होत जाणाऱ्या परिस्थितीत लोकशाही शाबूत राहील. कालांतराने परिस्थिती सुधारेल अशी आशा आपण बाळगू व तसा प्रयत्नही करू या. शिवाय कितीही प्रयत्न केला तरी परिस्थिती पुन्हा सुधारू लागण्यापूर्वी आणखी बरीच बिघडणार आहे. सरकार बदलले तरी हा वाढता बिघाड एकदम थांबणार नाही हेही विरोधी पक्ष व आजचा सत्ताधारी पक्ष या दोघांनीही ध्यानात ठेवले पाहिजे.

## परिस्थितीचे परीक्षण

आजची आर्थिक परिस्थिती कशी आहे? वाढती महागाई व टंचाई हे तिचे ठळक लक्षण असून गेल्या दोन वर्षांत भडकलेल्या आणि अजूनही भडकत असणाऱ्या महागाईने सामान्य जनतेला व विचारी लोकांनाही कासावीस केले आहे. पण विचारी लोकांनी फक्त कासावीसच न होता थोडासा विचारही केला पाहिजे. पुष्कळ सुशिक्षितांचाही असा समज आहे की आजची महागाई जाऊन रुपयाला शेरभर तूप आणि पाच रुपयांना पोतेभर जोंधळे हा दुसऱ्या महायुद्धापूर्वीचा कालखंड परत यावा. त्यावेळी मध्यमवर्गाला अशी स्वस्ताई अनुभवता येत होती हे खरे. आणि *"मालाचा पुरवठा मागणीपेक्षा अधिक वाढतो तेव्हाच स्वस्ताई होते व मागणीपेक्षा*

*पुरवठा अधिक असला म्हणजे ते पुष्कळ धन वाढल्याचे, सुबत्तेचे लक्षण असते"* असे हलीचा मध्यमवर्ग शाळा-कॉलेजात शिकविल्या जाणाऱ्या अर्थशास्त्रांतून शिकला आहे. पण दुसऱ्या महायुद्धापूर्वीची ती स्वस्ताई सुबत्तेची द्योतक नव्हती. १९२९-३९ च्या काळातल्या जागतिक मंदीचा तडाखा भारतालाही बसून शेती-मालाच्या किमती कोसळल्या होत्या. (त्या जागतिक मंदीचे स्वरूप अमेरिकेच्या उदाहरणाने पूर्वीच्या व्याख्यानांत मांडले आहे.) शेतकऱ्याच्या मालाला त्या काळी किंमत नसल्याने भारतीय शेतकरी कर्जात अधिकाधिक खचत होता. यामुळे पुढल्यापुढल्या साली शेतीत घालण्याला त्याच्याजवळ भांडवल राहात नव्हते, यामुळे पीक घटत होते आणि कर्ज फिटत नव्हते तर ते अधिकाधिक वाढत होते. शेतीत भांडवल जात नसून पुरेशी मशागत होत नसल्यामुळे जमिनी ओस पडू लागल्या होत्या. यामुळे शेतमजुरांत बेकारी माजली. खंड व व्याज यांच्या वसुलीची शाश्वती नसल्याने जमीनमालक शेतीत भांडवल न गुंतविता शहरातील भाड्याची घरे, सरकारचे व कंपन्यांचे रोखे यात पैसा गुंतवू लागले होते. पण शेतकरी व शेतमजूर यांना ज्या मंदीने ग्रासले होते तिने शहरी धंदे व सरकार यांना आपल्या तडाख्यातून सोडले नव्हते. शेतकऱ्याच्या मालाला अगदी कमी किंमती आणि कर्जापोटी अधिकाधिक माल सावकाराला घालण्याची गरज, यामुळे शेतकऱ्याजवळ विकायला मालही कमी कमी राहू लागला. जमिनीला भांडवल नाही म्हणून उत्पादन घटले. शेतकऱ्याजवळ खरेदीशक्ती शून्य झाली. प्रचंड बहुसंख्य असा शेतकरी कापड, तेल, पायताणे, शेतीची अवजारे, घरबांधणीचे साहित्य यांची खरेदी करीना, म्हणून कापडगिरण्या, तेलगिरण्या, बांधकामसाहित्य या सर्वांवर मंदी आली. बँका मंदावल्या. सरकारी महसूल घटला. शेतकरी मुलांना शाळांत पाठवीना म्हणून शाळा ओस पडल्या. मास्तर, कारकून, बँकवाले यांच्यांत बेकारी पसरली. प्रवासभाडे कमी होते तरी लोकाजवळ पैसा नव्हता, धंदा नव्हता म्हणून प्रवास घटला, वाहतूकधंदा घटला, वाहतूक कामगारात बेकारी आली. हे त्या स्वस्ताईच्या काळातल्या अर्थसंघटनेचे स्वरूप होते. स्वस्ताई होती, पण लोकांजवळ पैसाच नव्हता. लोकांजवळ पैसा नसल्याने खरेदी घटली म्हणून स्वस्ताई आली होती. भांडवलाच्या अभावी उत्पादन घटत होते, शेती नुकसानीत चालली होती. ही स्वस्ताई सुबत्तेची द्योतक नव्हती. *"ज्याला जो धंदा परवडत नाही तो धंदा तो धंदेवाला सोडून देईल व बरकतीचा दुसरा धंदा करील, यामुळे कोणीही कायमपणे नुकसानीत धंदा करणार नाही व प्रत्येक धंदेवाला आणि त्याचा धंदा नफ्यातच राहील"* असे जुन्या अर्थशास्त्राचे एक सामान्य तत्त्व आहे. त्याप्रमाणे पाहता युद्धापूर्वीच्या त्या मंदीत ज्या अर्थी शेतकरी शेती करीत राहिला होता त्या अर्थी त्याला शेती परवडत होती असे म्हणावे लागते. पण वस्तुस्थिती अशी होती की लक्षावधी शेतकऱ्यांना शेती हा एकच धंदा माहीत होता. नुकसान येवो, नफा येवो, शेती हे एकच जिणे त्याला हजारो वर्षे

सरावातले होते. शेती दारिद्र्यात खचत असताही शेतकरी शेतीत खपतच होता. पण त्याला शेती परवडत होती असा याचा अर्थ कधीच नव्हता. शिवाय इतर धंद्यातही मंदीच होती. मग शेती सोडून दुसऱ्या धंद्यात शेतकरी जाणार कसा आणि कुठे?

पुढे युद्धाने साऱ्या जगातील मंदी मागे हटली तशी थोडी फार भारतातलीही मंदी मागे हटली. युद्धाने शेतीमालाला मागणी वाढली, किमती वाढल्या, मागे म्हटल्याप्रमाणे काही थोड्या शेतकऱ्यांनी काही कर्जे फेडून जमिनींची मालकी पुन्हा मिळविली. युद्धानंतर युद्धामुळे उद्भवलेली मागणी घटून पुन्हा किंमती पडतील असा संभव दिसू लागला. पण तसे घडले नाही. याला राजकीय परिस्थिती कारण झाली. भारतांत जातीय असंतोष भडकून दंगे झाले. फाळणीमुळे लोकसंख्येच्या मानाने अधिक शेतमुलूख भारतातून पाकिस्तानात गेला, दंगे चालूच राहिले, फाळणीने व दंगलींनी सारी अर्थसंघटना विस्कटली. १९५० साली कोरियन युद्ध सुरू झाले. यामुळे महागाई भडकतच गेली, स्वतंत्र भारताच्या सरकारने नियंत्रणाबाबतच्या अनुभवाने धरसोड केली. त्याचा परिणाम किंमती भडकण्यात झाला. १९५२ साली दुष्काळ पडला. त्यामुळे किंमती चढ्याच राहिल्या. शेवटी १९५३-५४ साली पाऊसकाळ चांगला झाला; पिके चांगली आली आणि १९५४-५५ व १९५५-५६ साली किमती एकदम घसरल्या.

पुष्कळ पुढाऱ्यांना वाटले की अन्नतुटवड्याचा व इतर टंचाईचा प्रश्न, उत्पादनवाढ खूप झाल्याने सुटला. पण पीक थोडेसे वाढले तरी किंमती फार कोसळतात व शेतकऱ्याचे नुकसान होते या मंदीकाळच्या सिद्धान्ताचा तो दाखला होता. शेतीमालाच्या किमती त्यामुळे कोसळल्या हे सुबत्तेचे लक्षण नसून आर्थिक मंदीला आमंत्रण होय हे लवकरच भारत सरकारच्या लक्षात आले. १९४९ साली पंतप्रधानांनी आकाशवाणीवर केलेल्या एका भाषणात "युद्धपूर्वकाळच्या शेतीमालाच्या किमती परत येऊ देणार नाही" असे आश्वासन दिले होते. त्याची बहुधा भारत सरकारला आठवण झाली असावी. शेतीमालाच्या किमती पडू नयेत यावर उपाय शेतीमालाचे गिऱ्हाईक वाढविणे हा होता. म्हणून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेकडो कोटी भांडवल भारी उद्योगधंद्यात, धरणासारख्या बांधकामात गुंतविण्यात आले. त्याने रोजगारी वाढून अन्नधान्य, कापूस, कापड, सीमेंट वगैरे सर्व प्रकारच्या मालाला मागणी वाढली, उद्योगधंद्यास लागणाऱ्या शेतीतल्या कच्च्या मालाला मागणी वाढली, व तेथून जी महागाई वाढत आहे ती केव्हाही कमी झाली नाही. आता तर तेल ओतलेल्या आगीप्रमाणे महागाई भडकत आहे. हल्लीची अफाट प्रमाणात वाढणारी महागाई ही अयोग्यच आहे. पण १९५५-५६ साली किमती घसरण्याचे थांबले, स्वस्ताई आलेली परत गेली हे बरे झाले की वाईट झाले या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. "ती स्वस्ताई काही युद्धपूर्वकाळाएवढी नव्हती. पिके खरोखरच चांगली आली, यामुळे भाव उतरले होते. सरकारने नियंत्रणे उठविली. खुल्या बाजारात

लोकांना चांगले धान्य, कापड, घरबांधणीसाहित्य मिळू लागले. युद्धपूर्वकालासारखी मंदी आलेली नव्हती. मग किंमती स्थिर ठेवल्या असत्या अथवा थोड्या उतरू दिल्या असत्या तर त्यात वाईट काय होते? मग मुद्दाम जादा भांडवलगुंतवणूक करून सरकारने भाव का भडकविले?" अशी टीका करण्यात आली आहे. त्यावेळी मोठ्या धंद्यात बरीच मोठी भांडवलगुंतवणूक सरकारने केली याला दुहेरी कारण होते. पोलाद, विविध रसायने, यंत्रे इत्यादी भारी मालाचे कारखाने काढल्यावाचून राष्ट्राचे औद्योगिक सामर्थ्य व उत्पादनसामर्थ्य वाढणार नव्हते. शेतीच्या विकासासाठीही विविध औद्योगिक माल हवा होता, त्यांचे कारखाने काढणे जरूर होते. त्यावाचून देशाचे मागासलेपण संपणार नव्हते. म्हणून राष्ट्राची औद्योगिक बैठक उंचावण्यासाठी फार मोठी भांडवलगुंतवणूक अवश्य होती. त्यासाठी नवीन धंद्यात पैसा मोठ्या प्रमाणावर गुंतविण्यात आला. शिवाय लोकसंख्या वाढत असून, शिक्षणप्रसार वाढत होता यामुळे बेकारी भडकत होती. शेतीच्या विकासाला वाव पुष्कळ होता. कारण योग्य भांडवल व मशागत मिळाल्यास या देशात अजून तीनशे टक्केही पीकवाढ शक्य आहे असे विदेशी तज्ज्ञ सांगतात. अशा स्थितींत किंमती घसरू लागल्या असत्या तर पुन्हा शेतीवर मंदीची छाया आली असती, उत्पादन घटले असते, पुन्हा युद्धापूर्वीची मंदी येऊन औद्योगिक विकासही थांबला असता. मोठी भांडवलगुंतवणूक झाली व ती आपत्ती टळली. किमती वाढल्या तरी १९६२ पर्यंत आर्थिक प्रगती होतच राहिली.

पण किंमती वाढणे हेच दारिद्र्य वाढण्याचे लक्षण होय या समजाने फार मोठ्या सुशिक्षित मध्यम वर्गाच्या मनाची पकड घेतली असून त्यांना किंमतवाढ व आर्थिक प्रगती या गोष्टी परस्पराशी अनुकूल असू शकतात हे पटतच नाही, हे आजच्या असंतोषाचे बरेचसे कारण आहे. १९६२च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेसविरोधकांनी महाराष्ट्रातील काही सभांमध्ये एक मोठा 'मर्मभेदी' वाटणारा युक्तिवाद मांडला होता. त्यांच्या मते ब्रिटिश अमलातल्या काळापेक्षाही भारताची आर्थिक स्थिती काँग्रेसच्या अमलात १९६०-६१ साली अधिक वाईट झाली होती. वर स्वातंत्र्याच्या कालखंडातले आर्थिक उत्कर्षाचे आकडे दिले आहेत. पण त्यामुळे औद्योगिक उत्कर्षाचा देखावा दिसला तरी श्रीमान हे अधिक श्रीमान झाले आणि मोटारींची संख्या वाढली, पण गरीब हे अधिकच गरीब झाले असे मत हे काँग्रेसविरोधक मांडत. हे मत सिद्ध करण्यासाठी मर्मभेदी वाटण्यासारखा जो युक्तिवाद मांडण्यांत आला त्याचा मथितार्थ असा :"*स्वताई व महागाई यांत फरक काय? महागाईत दहा रुपयात जेवढ्या वस्तू खरेदी करता येतात त्यापेक्षा किती तरी अधिक वस्तु त्याच दहा रुपयात स्वस्ताईत खरेदी करता येतात. स्वस्ताई म्हणजे तेवढ्या पैशात ज्यास्त वस्तू खरेदी करता येणे, म्हणजेच खरेदीशक्ती जास्त असणे, म्हणजेच सुबत्ता असणे. उलट महागाई म्हणजे तेवढ्याच पैशात कमी वस्तू खरेदी करता येणे,*

*म्हणजे खरेदीशक्ती कमी असणे म्हणजे दारिद्र्य येणे. आता १९६०-६१ साली अतिशय महागाई आहे व १९३८-३९ साली अतिशय स्वस्ताई होती यावरून ब्रिटिश अमलात जनतेला सुबत्ता होती व आता जनता दरिद्री आहे हे साधे अनुमान निघते व ते साध्या हिशेबाने खरे वाटते. म्हणून आज उद्योगधंदे वाढलेले दिसले तरी त्यांनी श्रीमंतांची धन केली असून सामान्य जनता या महागाईने भिकेलाच लागली आहे."* असा या विरोधकांचा एकंदर युक्तिवाद होता.

या युक्तिवादाची आता थोडी छाननी करू. पंचवीस वर्षांपूर्वी ज्या एखाद्या तालुक्याच्या गावी तुम्ही गेला असाल तेथे पुन्हा आज जा. तेथे पूर्वी तुम्हांला पाच दुकाने दिसली असली तर आज तिथे पंधरा आहेत. आणि त्यावेळी त्या पाचही दुकानांतला माल खपत नव्हता, त्याऐवजी आता पंधरा दुकानांतला माल दुप्पट तिप्पट खपतो आहे. महाडास एका कार्यकर्त्यांच्या बैठकीत मी ही तुलना केली असता "हे वाढलेले गिऱ्हाईक श्रीमंतांचे आहे" असे एका कार्यकर्त्याने म्हटले. पण लगेच तेथेच एक तरुण दुकानदार होता तो म्हणाला, "आमचे हे सारे वाढलेले गिऱ्हाइक खेडेगावातून येणाऱ्या शेतकऱ्याचे आहे." असो. सायकलींचे उदाहरण घ्या. खेड्यापाड्यातून हल्ली रस्ते सुधारलेले असून सायकलींची किंमत वाढली तरी संख्या पूर्वीच्या पाचपट वाढली आहे. शिवण्याच्या यंत्रांना पूर्वी लहान गावात पुरेसे काम नव्हते, पण आता तिप्पट चौपट यंत्रे वाढूनही काम संपत नाही. सायकली व शिवण्याची यंत्रे यांच्या किमती अफाट वाढल्या तरी ही परिस्थिती आहे. जेथे प्राथमिक शाळा चांगलीशी चालत नव्हती तेथे आता हायस्कुले चालत असून आसपास आणखी हायस्कुले झाल्यामुळे प्रत्येक तालुक्याच्या गावी कॉलेज निघत आहे. पंचवीस वर्षांपूर्वी बी.ए., बी. एस्सी., बी.ई. यांची संख्या आजच्या पंचमांशही नव्हती. त्यांतले बहुतेक बेकार होते. पण आज सर्वत्र अफाट वाढलेल्या बांधकामांना एंजिनिअरांची संख्या सर्वत्र कमी पडत असून बी. ए., बी. एससी. शिक्षकांची सर्वत्र टंचाई आहे. मोटारबसेस, आगगाड्या यांचे दर तिप्पट चौपट वाढले असूनही पूर्वीच्या चौपट पाचपट लोक प्रवास करीत आहेत. कोणी म्हणतात, लोकसंख्या वाढली म्हणून हे गिऱ्हाइक वाढले. पण हे खरे नव्हे. वस्तू व सोयी तेवढ्याच असत्या तर दरडोई त्या कमी कमी मिळाल्या असत्या. पण ऐनजिनसी वस्तू व सोयी जास्त निर्माण झाल्या व खपत आहेत हेच तर वरील पाहणीवरून कळते. चलन फुगल्याने विक्री वाढली असे काही लोकांचे म्हणणे आहे. पण यालाही उत्तर असे की चलन फुगल्याने महागाई वाढेल, पण महागाई वाढूनही ऐनजिनसी वस्तू व सेवा वाढल्या आहेत असे अनुभवाला येत आहे. महागाई झाली तशी पगारवाढही झाली आहे. महागाई ज्या प्रमाणात वाढली त्या प्रमाणात पगारवाढ झाली नाही हे खरे. पण पंचवीस वर्षांपूर्वी घरात एक मिळविता असता तीन बेकार होते. आता सारे चारी रोजगारीवर आहेत, यामुळे घरटी मिळकत वाढली हे हिशेबानेच कळते. याचा अर्थ असा आहे

लोकांना चांगले धान्य, कापड, घरबांधणीसाहित्य मिळू लागले. युद्धपूर्वकालासारखी मंदी आलेली नव्हती. मग किंमती स्थिर ठेवल्या असत्या अथवा थोड्या उतरू दिल्या असत्या तर त्यात वाईट काय होते? मग मुद्दाम जादा भांडवलगुंतवणूक करून सरकारने भाव का भडकविले?" अशी टीका करण्यात आली आहे. त्यावेळी मोठ्या धंद्यात बरीच मोठी भांडवलगुंतवणूक सरकारने केली याला दुहेरी कारण होते. पोलाद, विविध रसायने, यंत्रे इत्यादी भारी मालाचे कारखाने काढल्यावाचून राष्ट्राचे औद्योगिक सामर्थ्य व उत्पादनसामर्थ्य वाढणार नव्हते. शेतीच्या विकासासाठीही विविध औद्योगिक माल हवा होता, त्यांचे कारखाने काढणे जरूर होते. त्यावाचून देशाचे मागासलेपण संपणार नव्हते. म्हणून राष्ट्राची औद्योगिक बैठक उंचावण्यासाठी फार मोठी भांडवलगुंतवणूक अवश्य होती. त्यासाठी नवीन धंद्यात पैसा मोठ्या प्रमाणावर गुंतविण्यात आला. शिवाय लोकसंख्या वाढत असून, शिक्षणप्रसार वाढत होता यामुळे बेकारी भडकत होती. शेतीच्या विकासाला वाव पुष्कळ होता. कारण योग्य भांडवल व मशागत मिळाल्यास या देशात अजून तीनशे टक्केही पीकवाढ शक्य आहे असे विदेशी तज्ज्ञ सांगतात. अशा स्थितींत किंमती घसरू लागल्या असत्या तर पुन्हा शेतीवर मंदीची छाया आली असती, उत्पादन घटले असते, पुन्हा युद्धापूर्वीची मंदी येऊन औद्योगिक विकासही थांबला असता. मोठी भांडवलगुंतवणूक झाली व ती आपत्ती टळली. किमती वाढल्या तरी १९६२ पर्यंत आर्थिक प्रगती होतच राहिली.

पण किंमती वाढणे हेच दारिद्र्य वाढण्याचे लक्षण होय या समजाने फार मोठ्या सुशिक्षित मध्यम वर्गाच्या मनाची पकड घेतली असून त्यांना किंमतवाढ व आर्थिक प्रगती या गोष्टी परस्पराशी अनुकूल असू शकतात हे पटतच नाही, हे आजच्या असंतोषाचे बरेचसे कारण आहे. १९६२च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारात काँग्रेसविरोधकांनी महाराष्ट्रातील काही सभांमध्ये एक मोठा 'मर्मभेदी' वाटणारा युक्तिवाद मांडला होता. त्यांच्या मते ब्रिटिश अमलातल्या काळापेक्षाही भारताची आर्थिक स्थिती काँग्रेसच्या अमलात १९६०-६१ साली अधिक वाईट झाली होती. वर स्वातंत्र्याच्या कालखंडातले आर्थिक उत्कर्षाचे आकडे दिले आहेत. पण त्यामुळे औद्योगिक उत्कर्षाचा देखावा दिसला तरी श्रीमान हे अधिक श्रीमान झाले आणि मोटारींची संख्या वाढली, पण गरीब हे अधिकच गरीब झाले असे मत हे काँग्रेसविरोधक मांडत. हे मत सिद्ध करण्यासाठी मर्मभेदी वाटण्यासारखा जो युक्तिवाद मांडण्यांत आला त्याचा मथितार्थ असा :"*स्वताई व महागाई यांत फरक काय? महागाईत दहा रुपयात जेवढ्या वस्तू खरेदी करता येतात त्यापेक्षा किती तरी अधिक वस्तु त्याच दहा रुपयात स्वस्ताईत खरेदी करता येतात. स्वस्ताई म्हणजे तेवढ्या पैशात ज्यास्त वस्तू खरेदी करता येणे, म्हणजेच खरेदीशक्ती जास्त असणे, म्हणजेच सुबत्ता असणे. उलट महागाई म्हणजे तेवढ्याच पैशात कमी वस्तू खरेदी करता येणे,*

*म्हणजे खरेदीशक्ती कमी असणे म्हणजे दारिद्र्य येणे. आता १९६०-६१ साली अतिशय महागाई आहे व १९३८-३९ साली अतिशय स्वस्ताई होती यावरून ब्रिटिश अमलात जनतेला सुबत्ता होती व आता जनता दरिद्री आहे हे साधे अनुमान निघते व ते साध्या हिशेबाने खरे वाटते. म्हणून आज उद्योगधंदे वाढलेले दिसले तरी त्यांनी श्रीमंतांची धन केली असून सामान्य जनता या महागाईने भिकेलाच लागली आहे."* असा या विरोधकांचा एकंदर युक्तिवाद होता.

या युक्तिवादाची आता थोडी छाननी करू. पंचवीस वर्षांपूर्वी ज्या एखाद्या तालुक्याच्या गावी तुम्ही गेला असाल तेथे पुन्हा आज जा. तेथे पूर्वी तुम्हांला पाच दुकाने दिसली असली तर आज तिथे पंधरा आहेत. आणि त्यावेळी त्या पाचही दुकानांतला माल खपत नव्हता, त्याऐवजी आता पंधरा दुकानांतला माल दुप्पट तिप्पट खपतो आहे. महाडास एका कार्यकर्त्यांच्या बैठकीत मी ही तुलना केली असता "हे वाढलेले गिऱ्हाईक श्रीमंतांचे आहे" असे एका कार्यकर्त्याने म्हटले. पण लगेच तेथेच एक तरुण दुकानदार होता तो म्हणाला, "आमचे हे सारे वाढलेले गिऱ्हाइक खेडेगावातून येणाऱ्या शेतकऱ्याचे आहे." असो. सायकलींचे उदाहरण घ्या. खेड्यापाड्यातून हल्ली रस्ते सुधारलेले असून सायकलींची किंमत वाढली तरी संख्या पूर्वीच्या पाचपट वाढली आहे. शिवण्याच्या यंत्रांना पूर्वी लहान गावात पुरेसे काम नव्हते, पण आता तिप्पट चौपट यंत्रे वाढूनही काम संपत नाही. सायकली व शिवण्याची यंत्रे यांच्या किमती अफाट वाढल्या तरी ही परिस्थिती आहे. जेथे प्राथमिक शाळा चांगलीशी चालत नव्हती तेथे आता हायस्कुले चालत असून आसपास आणखी हायस्कुले झाल्यामुळे प्रत्येक तालुक्याच्या गावी कॉलेज निघत आहे. पंचवीस वर्षांपूर्वी बी.ए., बी. एस्‌सी., बी.ई. यांची संख्या आजच्या पंचमांशही नव्हती. त्यांतले बहुतेक बेकार होते. पण आज सर्वत्र अफाट वाढलेल्या बांधकामांना एंजिनिअरांची संख्या सर्वत्र कमी पडत असून बी. ए., बी. एससी. शिक्षकांची सर्वत्र टंचाई आहे. मोटारबसेस, आगगाड्या यांचे दर तिप्पट चौपट वाढले असूनही पूर्वीच्या चौपट पाचपट लोक प्रवास करीत आहेत. कोणी म्हणतात, लोकसंख्या वाढली म्हणून हे गिऱ्हाइक वाढले. पण हे खरे नव्हे. वस्तू व सोयी तेवढ्याच असत्या तर दरडोई त्या कमी कमी मिळाल्या असत्या. पण ऐनजिनसी वस्तू व सोयी जास्त निर्माण झाल्या व खपत आहेत हेच तर वरील पाहणीवरून कळते. चलन फुगल्याने विक्री वाढली असे काही लोकांचे म्हणणे आहे. पण यालाही उत्तर असे की चलन फुगल्याने महागाई वाढेल, पण महागाई वाढूनही ऐनजिनसी वस्तू व सेवा वाढल्या आहेत असे अनुभवाला येत आहे. महागाई झाली तशी पगारवाढही झाली आहे. महागाई ज्या प्रमाणात वाढली त्या प्रमाणात पगारवाढ झाली नाही हे खरे. पण पंचवीस वर्षांपूर्वी घरात एक मिळविता असता तीन बेकार होते. आता सारे चारी रोजगारीवर आहेत, यामुळे वरटी मिळकत वाढली हे हिशेबानेच कळते. याचा अर्थ असा आहे

की श्रीमंत हे अधिक श्रीमंत झाले आहेत हे खरे असले तरी गरीब हे अधिक गरीब न होता त्यांची परिस्थिती थोडी तरी सुधारलेली आहे हे खास. ग्रामीण भागासंबंधाने वर जे अवलोकन केले आहे त्यावरून हे सिद्ध होतेच. पुण्यास एका व्याख्यानात हा विषय मी मांडला असता एका अर्थपंडिताने म्हटले की 'पानशेत कोसळल्यावर पुण्याची जी स्थिती होती त्या परिस्थितीशी कितीही वाईट परिस्थितीची तुलना केली तरी ती वाईट परिस्थिती चांगलीच दिसेल, त्याप्रमाणे पंचवीस वर्षांपूर्वीच्या आर्थिक मंदीशी आजच्या परिस्थितीची तुलना केली तर आजची परिस्थिती चांगली दिसणारच." पण त्या अर्थपंडिताने हा युक्तिवाद अविचाराने मांडला होता. १९२९-३९ ची जगाला ग्रासलेली मंदी हा काही पानशेतसारखा अपघात नव्हता. त्यापूर्वीच्या शंभर वर्षांत भांडवलशाहीच्या अंगभूत अशी ती अवस्था अथवा 'व्यवस्था' होती. वर पहिल्या व्याख्यानात दाखविल्याप्रमाणे केन्स या अर्थशास्त्रज्ञाने या परिस्थितीवर उपाय शोधला. सरकारने स्वतः भांडवल घालून सार्वजनिक हिताची कामे काढावी व बेकारी-निवारणाची जबाबदारी पत्करावी असे मत त्याने मांडले. रूझवेल्टप्रभृती पाश्चात्य राज्यकर्त्यांनी या मताचा स्वीकार करून त्याचा इतका विस्तार केला की भांडवलशाही अर्थसंघटनेचा आधार अशी जी अप्रतिबंध स्पर्धा तिला बराच आळा बसला आणि, समाजावर आर्थिक आपत्ती आली तरी अर्थव्यवहारात सरकारने हस्तक्षेप करू नये हे तत्त्व मागे पडून लोककल्याणासाठी राज्यकर्त्यांनी अर्थसंघटनेत हस्तक्षेप करावा हे समाजवादी तत्त्व पाश्चात्य भांडवलशाहीने कमीअधिक प्रमाणात मान्य केले. स्वतंत्र भारताने हे समाजवादी तत्त्व आपल्या नियोजनात स्वीकारले व त्यामुळे गेल्या पंधरा वर्षांत भारतात आर्थिक विकास झाला असे माझे म्हणणे आहे. हा विकास आपोआप, अहेतुकपणे घडून आलेला नसून नियोजनपूर्वक सरकारने भांडवल वाढविले, त्यामुळे झाला आहे.

पाश्चात्य लिबरल अर्थशास्त्रज्ञ केन्स याने फक्त बेकारीनिवारणाची जबाबदारी राजकर्त्यांवर टाकली होती. केन्सच्या विचाराचा विषय झालेल्या अर्थसंघटना कमी अधिक प्रमाणात औद्योगिक दृष्ट्या पूर्णतया विकासलेल्या असल्याने बेकारीनिवारण करून मंदीचे संकट दूर करणें एवढीच त्यांची गरज होती. पण भारतासारख्या मागासलेल्या देशात पायाभूत उद्योगधंद्यांचा अभाव असून शेती वगैरे जुने व्यवसाय मागासलेले असतात. पाश्चात्य देश जेव्हा मागासलेले होते तेव्हा तेथे खाजगी भांडवलशाहीने जनतेची पिळणूक करून आणि नफेबाजीसाठी साम्राज्ये वाढवून व युद्धे माजवून त्या त्या राष्ट्रांचा विकास केला. भारतासारख्या मागासलेल्या देशाला आता भांडवलशाहीमार्फत जनतेची पिळवणूक करून व नवी साम्राज्ये मिळवून विकास करता येणार नाही. म्हणून राष्ट्राच्या विकासाचा पाया घालण्याचे काम सरकारने स्वतः धंदे काढून व खाजगी भांडवलशाहीचे नियंत्रण करून पार पाडले पाहिजे, ही भूमिका भारताने घेतली आहे. केन्सच्या विचारसरणीतून हे धोरण क्रमप्राप्त होत

असून समाजवाद केन्सच्या विचारातून निर्माण होऊ शकतो असे मानता येते. हा समाजवाद संसदीय लोकशाहीमार्फत अमलात आणला जात आहे, म्हणून भारत लोकशाही समाजवादाच्या मार्गावर आहे असे म्हणता येते.

## अर्थव्यवहार कसा चालला

वर युद्धापूर्वीची मंदीची स्थिती व १९६१-६२ ची स्थिति यांची तुलना केली आहे व आजची प्रगती दाखविली आहे. पण आता दरम्यानच्या काळाकडे पाहू. १९४० ते ५० या दशकात फक्त महागाई वाढली, धनोत्पादन वाढले नव्हते. धनोत्पादनाची वाढ स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५० साली सुरू झालेल्या नियोजनानंतरचीच आहे हे प्रामुख्याने लक्षात ठेवले पाहिजे.

१९५० ते १९६३ या काळात श्रीमंतांचे धन वाढले इतके गरिबांचे वाढले नाही याच्या कारणांचा आता विचार करू. अमुक एका व्यक्तीच्या, गटाच्या, पक्षाच्या इच्छेने ही विषमता निर्माण झालेली नाही. अर्थसंघटनेचा जो व्यवहार चालतो त्यात या विषमतेचे कारण शोधले पाहिजे. अर्थसंघटनेचा सारा व्यवहार धनाचे (१) उत्पादन, (२) वाटणी, (३) विनिमय व (४) उपयोग या चार टप्प्यांतून चालतो. यात विषमता कोठे निर्माण होते ? पैकी (१) उत्पादन हे काही विषमता निर्मीत नाही. (४) उपयोग हाही स्वतः विषमता निर्मीत नाही. उपयोगापूर्वीच विषमता निर्माण झालेली असून उपयोगात ती फक्त व्यक्त होते. (२) वाटणीत विषमता होण्याला जागा आहे. मजुरी, खंड, व्याज व नफा या चार रूपांत जी संपत्ती वाटली जाते ते वाटणीचे क्षेत्र होय. पण या चारही प्रकारांचे हल्ली समता आणण्याच्या दिशेने, कायदा व संघटनाकार्य यामार्फत नियंत्रण चालू आहे. सरकारी कायदे व कामगार-संघटना यांच्या बळावर पगारवाढ, बोनस वगैरे लाभ श्रमजीवी वर्गांना होतात. खंड व नफा यांजवर आज कात्री लावली आहेच. अर्थात त्यावर हल्लीपेक्षा अधिक कात्री लावली पाहिजे हे खरे आहे. मजुरी ही संघटनेने वाढविली गेली पाहिजे. कामगार-संघटनाबल व सरकारी दडपण आणि कायदे यांनी मजुरी वाढत आहे. या सर्व गोष्टी नियंत्रणाच्या कैचीतही आणल्या जात आहेत; आणखी आणता येतील. पण पूर्ण अराजकाच्या अवस्थेत असलेले दालन म्हणजे (४) विनिमय ऊर्फ व्यापार. आजची फार मोठी विषमता ही बाजारातील अराजकाने उद्भवली आहे. पाच रुपयांच्या पाच वस्तू बाजारात असता दहा दहा रुपये देण्याच्या तयारीने जेव्हा दहा माणसे बाजारात येऊन खरेदीत चढाओढ करतात तेव्हा त्याच पाच वस्तूंची किंमत प्रत्येकी रु. दहा अथवा अधिकही होते. वास्तविक आजच्या टंचाईच्या कालखंडात लोकांनी खरेदी-संयम व खरेदीनियोजन केले पाहिजे व जीवनावश्य मालांच्या बाबतीत अनुक्रम व हिशेब ठेवून आपली नित्याचीही खरेदी केली पाहिजे. लोकांची खरेदीशक्ती वाढत असता जीवनावश्य मालाची निपज त्या वेगाने वाढत नाही आणि जीवनावश्य मालाची

खरेदीविक्री व्यापाऱ्यांमार्फत होते. अर्थात टंचाईच्या वस्तूंवर गिऱ्हाईकांच्या उड्या पडू लागल्या की गिऱ्हाइकाची कोंडी करून व्यापारी नफा लाटतो व श्रीमंत होतो.

मागासलेल्या देशात उत्पादक लहान व किरकोळ असतो. गिऱ्हाइकही लहान व किरकोळ असते. आणि दोन्हीकडून दोघांची कोंडी करून व्यापारी श्रीमंत होतो. यामुळे उत्पादनव्यवहारातल्यापेक्षा व्यापारात जास्त भांडवल असणे हे मागासलेल्या देशांचे लक्षणच ठरते. सरकारावरही व्यापाऱ्यांचे वर्चस्व असून सरकारची अनेक धोरणे व्यापाऱ्यांनाच अनुकूल असतात, यामुळे विषमता फार होते. मालाची आयात-निर्यात करायची नसताही मालाच्या आयातनिर्यातीसाठी केवळ वशीलेबाजीने परवाने मिळवून त्या परवान्यांचा काळाबाजार करणे, उत्पादक धंद्यांचे परवाने मिळवून व नाममात्र उत्पादनाचा देखावा करून त्या परवान्यांचा काळाबाजार करणे हे काळा पैसा निर्माण होण्याचे मार्ग, सरकारवर व्यापारी वर्चस्व असल्यामुळे यशस्वितेने अवलंबले जातात. हा नफा उत्पादन वाढीनेवाढत नसून व्यापारातील गैरवाजवी कोंडीने वाढतो. या परिस्थितीवर इलाज नाही असे नाही. इलाज आहे तो अवघड आहे. पण तोच इलाज आहे, दुसरा नाही. तो उपाय यशस्वितेने अमलात आणला असता या परिस्थितीतून मार्ग निघेल. त्या उपायाचे विवेचन पुढे येणारच आहे. वर जी अनाचाराची परिस्थिती वर्णिली त्यातील मूलगामी दोष एकच आहे. कृत्रिम कोंडीमुळे बाजारभाव भडकणे व श्रीमंतांच्या खिशात अधिकाधिक पैसा जाणे या रूपाने हा दोष व्यक्त होतो.

या रोगाचे स्वरूप समजून घेण्यासाठी थोडीशी पुनरुक्ती पत्करून महागाईविषयी एक उलटसुलट मुद्दा मी येथे मांडतो. महागाई म्हणजे किंमतवाढ व ती कोणालाही बाचक वाटते. पण पुष्कळदा आर्थिक प्रगतीचे लक्षण असे तिचे स्वरूप असते व आर्थिक प्रगतीला महागाईची गरज असते. स्वस्ताई म्हणजे मागणीपेक्षा पुरवठा अधिक म्हणजे मालाची विपुलता असे आपण मानतो. पण ते नेहमीच खरें नव्हे. बाजारात धान्य खपत नाही म्हणून त्याचे भाव पूर्वी उतरत होते त्यावेळी असंख्य लोक उपाशी होते, पण त्यांना रोजगार नव्हता म्हणून, त्यांच्याजवळ खरेदीशक्ती नव्हती म्हणून धान्य खपत नव्हते. अर्थात ती स्वस्ताई विपुलतेमुळे नव्हती. लोकांत खरेदीशक्ती नव्हती म्हणून ती स्वस्ताई होती. लोकांना रोजगार मिळताच त्यांनी धान्य खरेदी करण्यासाठीं बाजाराकडे धाव घेतली व पुरवठ्यापेक्षा मागणी वाढली, म्हणजेच टंचाई आली, किंमती वाढल्या. पण ते चांगले झाले. गिऱ्हाइक वाढतेसे पाहून शेतकऱ्याने शेतीत अधिक मशागत करून अधिक भांडवल घातले व धान्यपीक वाढले. रोजगारीवाढ, मागणीवाढ, टंचाईवाढ यातून उत्पादनाला अवश्य अशी ईर्षा मिळते. ही टंचाई व महागाई प्रगतीशील असते. उत्पादकाचा हा नफा प्रगतिशील असतो.

महाई व टंचाई याचा एक उलटा प्रकार असतो. बाजारात गिऱ्हाईक वाढतेसे पाहून माल अधिक निर्मिण्याऐवजी शेतकरी अथवा धंदेवाला मालाची कोंडी करून

महागाई व टंचाई वाढवितो. ही टंचाई व महागाई प्रतिगामी असते. म्हणून उत्पादन वाढवून मिळणारा उत्पादनावरचा नफा हा विकासकारी ठरतो व मालाची कोंडी करून मिळविलेला व्यापारातला नफा हा विकासविरोधी ठरतो. त्यासाठी उत्पादक भांडवलशाही व व्यापारी भांडवलशाही असे वर्गीकरण मुख्यतः मागासलेल्या राष्ट्रांबाबत करणे जरूर असून उत्पादक भांडवलशाही ही व्यापारी भांडवलशाहीपेक्षा अधिक विकासकारी ठरते. उलट मागासलेल्या देशात व्यापारी भांडवलशाही ही उत्पादक भांडवलशाहीपेक्षा प्रभावी असणे हे मागासलेपणाचे लक्षण व त्याचे कारणही असते. हा सर्व मुद्दा अभ्यासकांनी येथे लक्षात ठेवला पाहिजे. केन्सच्या विचारसरणीनुसारच हा विचार मी येथे केला आहे.

## सद्यःस्थिती कशी आहे

हल्लीच्या आर्थिक दुःस्थितीवर इलाज शोधण्यापूर्वी प्रथम सद्यःस्थिती पुनः एकदा स्थूलपणे पाहिली पाहिजे. लहान व किरकोळ उत्पादक आणि लहान व किरकोळ गिऱ्हाईक या दोघांचीही कोंडी करून नफेबाजीने स्वतः सधन होणारा घाऊक व्यापारी हा मागासलेल्या राष्ट्रांतील मागासलेपणाचे लक्षण असतो व तो प्रभावी असेपर्यंत मागासलेपणा त्या राष्ट्रातून जाणार नसल्याने तो त्या मागासलेपणाचे कारणही असतो. हा घाऊक व्यापारी कमजोर करणे हा, विनिमयातून निर्माण होणारी विषमता दूर करण्याचा मुख्य उपाय आहे. भारतात पाच एकरवाल्या अथवा त्या खालच्या शेतकऱ्याची संख्या फार मोठी आहे. हा लहान व दुबळा उत्पादक आहे. या शेतकऱ्याचे उत्पादन थोडेच असते. यांतला प्रचंड बहुसंख्य शेतकरी हा अन्नधान्य पिकविणारा शेतकरी आहे. त्याला सालभर पुरेसे धान्य पिकविता आले नसले तरी तेल, मीठ, कापड इत्यादींसाठी पैसा हवा म्हणून त्यातले धान्य विकावेच लागते. लहान शेतकरी पैशासाठी अडलेले असून धान्य विकणे हाच पैसा मिळविण्याचा मार्ग असल्याने ते किमतीत मारले जातात. तेच धान्य पुढे व्यापारी महाग करून समाजाला विकतो. यामुळे शेतकऱ्याला वर्षाच्या उत्तरार्धात जे धान्य खरीदावे लागते ते त्याला पूर्वी मिळालेल्या किमतीपेक्षा अधिक किमतीला खरीदावे लागते. यामुळे शेतकऱ्याची नेहमी पिळणूक होते. हा विषय मागे एकदा आला असून ब्रिटिश अमलाच्या शंभर वर्षांत शेतकरी दोन्ही बाजूंनी किंमतीत कसा मारला जाई व शेती खचण्याचे ते एक महत्त्वाचे कारण कसे होते हे तेथे दाखविले आहे. हल्लीच्या स्वतंत्र भारतातील नियोजनयुक्त विकासाच्या कालखंडातही सरकारला ही शेतकऱ्याची पिळणूक थांबविता आली नसून बाजारभाव भडकविणे, शेतकऱ्याची व जनतेची पिळणूक करणे व विकासाची साय व्यापाऱ्याने सारी स्वतः खाऊन जनतेसाठी विकासाचे ताकपाणीच शिल्लक ठेवणे हे हल्ली कसे चालले आहे हे येथे पाहायचे आहे.

समजा, व्यापाऱ्याला शेतकऱ्याने १० रु. क्विंटल या दराने ज्वारी विकली. लहान शेतकऱ्याजवळची ज्वारी आता संपलीच. ज्वारी विकण्याहून पैसा मिळविण्याचा अन्य मार्ग नसल्याने किंमतीत त्याची पहिली लूट झाली. सरकारचे विकासकार्य नियोजनाने जोरात चालू असल्यामुळे ज्वारीला गिऱ्हाईक चांगले आहे. यामुळे जून-जुलैला व्यापारी त्या ज्वारीला १५ रुपये क्विंटल भाव लावतो, व लहान शेतकऱ्याला त्याची ज्वारी विकून संपली असून बियाला व खाण्याला या वाढलेल्या भावाने ही ज्वारी खरीदावी लागते. येथे लहान शेतकऱ्याची दुसरी लूट होते. मोलमजुरी करून तो पैशाची ही तूट भरून काढतो. पुढे त्याला लागणाऱ्या जीवनावश्य व शेतीला अवश्य असणाऱ्या वस्तू व सेवा कोणत्या किंमतीला मिळतात ? त्याची ज्वारी ज्या सामान्य जनतेला १५ रुपये दराने मिळते तीच जनता या शेतकऱ्याला आपल्या वस्तू व सेवा विकते. अर्थात् शेतकऱ्याला ही खरेदी १५ रुपयांशी समतोल अशा किमतीलाच करावी लागते. येथे शेतकऱ्याला तिसरा फटका बसतो. कारण त्याला त्याच्या मालाला १० रुपयेच मिळालेले असतात.

स्वातंत्र्यपूर्वकालच्या मंदीत हे अंतर एवढे मोठे नसे. पण बाजारात गिऱ्हाईक व रोजगारी दोन्ही कमी असल्याने शेतकऱ्याला किमती कमी कमीच मिळत. यामुळे तो उत्पादन कमी कमी करी, यामुळे शेतकरी स्वतः कर्जबाजारी होऊन अर्थसंघटना त्या काळी खचत गेली. हल्ली विकासाच्या कालखंडात ही लूट चालू राहूनही विकास होत राहतो. कारण विकासकामे वाढतात त्यामुळे रोजगारी वाढून शेतीमालाला गिऱ्हाइक वाढत असते. त्यामुळे पुढील वर्षी शेतकऱ्याकडून अधिक ज्वारी मिळविण्यासाठी त्याला व्यापारी, समजा, क्विंटलमागे १३ रुपये देतो. त्यामुळे शेतकरी हुरळतो, उत्पादनवाढीचा चंग बांधतो. पण नंतर त्या मालाची किंमत व्यापारी गिऱ्हाइकासाठी समजा, २० रुपये करतो. अर्थात पूर्वीसारखीच शेतकऱ्याची लूट चालू राहून बाजारभाव भडकत राहतात, त्याचा अधिकाधिक फटका शेतकऱ्याला बसतो. १९६३-६४ साली महाराष्ट्रात शेतकऱ्याला एका क्विंटल ज्वारीला ३२ रुपये मिळाले. ती ज्वारी व्यापाऱ्याने ८० रुपयांना गिऱ्हाइकाला विकली. यामुळे शेतकऱ्याला खरीदाव्या लागणाऱ्या वस्तू व सेवा ८० रुपये किंमतीच्या समतोलात मिळून लहान शेतकऱ्यात व मध्यमवर्गीत हाहाःकार उडाला. म्हणून महाराष्ट्र सरकारने सहकारी मार्केटिंग सोसायटीमार्फत ४३ ते ४५ रुपये क्विंटल या भावाने ज्वारीखरेदीचा मक्ता घेऊन व त्यावर फक्त कारभारखर्च आकारून ती त्या किंमतीला गिऱ्हाइकाला विकली. साऱ्या भारतात अन्नधान्याबाबत हे धोरण अवलंबिले जाईल तरच शेतकऱ्याची लूट टळेल, बाजारभाव स्थिर होतील व लहान शेतकऱ्याला खरीदाव्या लागणाऱ्या मालांच्या किमती त्याला मिळणाऱ्या किमतींच्या आटोक्यांत येऊन दर एकरी पीक वाढविण्याला लहान शेतकऱ्याला उत्साह येईल.

या विकासाच्या कालखंडात मध्यम व वरिष्ठ शेतकऱ्याची परिस्थिती थोडी सुधारली आहे. कारण लहान शेतकरी सावकाराचा व व्यापाऱ्याचा भिंघा असल्याने

०५५५६५ दि: ...... २०६९ नों: दि: २०१३।७२

दा. क्र. ९५९२

किमतीत मारला जातो. पण मोठा शेतकरी नियंत्रित बाजारात माल नेऊन व्यापाऱ्याला विकतो, तेव्हा त्याला लहान शेतकऱ्यापेक्षा किंमत अधिक मिळते. पुढे व्यापाऱ्याच्या हाती त्या धान्याची किंमत भडकत असल्याने गिऱ्हाइकाला धान्य महागच पडते व मग सर्वच शेतकऱ्यांना खरीदाव्या लागणाऱ्या वस्तूसाठी, स्वतःला मिळणाऱ्या किमतींच्या समतोलाहून अधिक किमती द्याव्या लागतात. पण मध्यम व वरिष्ठ शेतकऱ्याजवळ माल पुष्कळ असल्याने त्याचा भांडवलसंचय होऊ शकतो.

हल्ली हा मध्यम व वरिष्ठ शेतकरी, जवळ थोडीशी पुंजी झाल्यामुळे लहान शेतकऱ्याचे धान्य व्यापाऱ्याप्रमाणे कमी किमतीला खरीदू लागला असून व्यापाऱ्याप्रमाणेच नफा मिळवू लागला आहे. सुवर्णनियंत्रणामुळे सोन्यात गुंतवला न जाणारा पैसा या मोठ्या शेतकऱ्याला या धान्यव्यापारासाठी देऊन व्यापारी वर्ग मोठ्या शेतकऱ्याच्या सहकाराने अधिक धान्य विकत घेऊ लागला आहे. (जेथे सरकारी एकाधिकार खरेदी चालू आहे, तेथे त्या त्या धान्याबाबत खाजगी खरेदीविक्री बंद आहे म्हणून हे विवेचन तेथे लागू नाही. पण एकाधिकार खरेदीविक्री ही फक्त महाराष्ट्रात व तीही तांदूळ, ज्वारी व नागली एवढ्यापुरतीच चालू आहे. सबंध भारताच्या दृष्टीने हे सारे विवेचन खरे आहे.) यात व्यापाऱ्याचा विशेष फायदा होतो. मोठा शेतकरी सहकारी संघटनेचा सभासद असल्याने सहकारी बँकेचे कर्ज मिळवून तो आपले व्यापारी भांडवल वाढवितो. मालाच्या गोदामाचा वापरही शेतकऱ्याला अग्रहक्काने मिळतो. यामुळे व्यापारी व मोठा शेतकरी दोघे मिळून लहान शेतकऱ्याचा माल किमतीत पाडून खरेदी करतात व बाजाराची कोंडी करतात. साऱ्या भारतातील राज्यांनी जमीनमालकीसुधारणेचे कायदे केले आहेत. पण अजून दोनशेपासून हजार एकर जमिनी स्वतःच्या कबजाखाली अनेक लपंडावांनी दाबून ठेवलेल्या शेतकऱ्यांची संख्या फार मोठी आहे. या शेतकऱ्यांना, धान्य पिकविण्याच्या खस्ता सालभर खात बसण्याऐवजी खरेदीविक्री-व्यवहारात अधिक फायदा पडतो असे वाटेल तर, शेतीत भांडवल घालून दर एकरी पीक वाढविण्याऐवजी ते टंचाई निर्मून व्यापारच वाढवितील. आणि मग, दर एकरी पीकवाढ ही जी आजची मुख्य गरज, ती मागे पडून आजचे टंचाईचे राष्ट्रीय संकट आणखी वाढेलच.

या परिस्थितीत संघ सरकारने स्थापन केलेले अन्न महामंडळ अजून तरी कोणत्याही कामी निरुपयोगी ठरले आहे. अमेरिकेतून येणाऱ्या अन्नधान्यसाहाय्याचा साऱ्या सरकारांनी आजवर टंचाई दूर करण्यासाठी उपयोग केला. पण दर एकरी पीकवाढ करण्याचे प्रयत्न काहीही न करता या सरकारांनी व्यापाऱ्याच्या हवाली अन्नधान्याचा खरेदीविक्री-व्यवहार राहू देऊन व्यापाऱ्यांची नफेबाजी चालू ठेविली व वर वर्णिल्याप्रमाणे अन्नधान्यांची टंचाई करून बाजारभाव भडकविले.

भारत सरकार व राज्यसरकारे यांच्यावर यातली मोठ्यात मोठी जबाबदारी आहे गेल्या दोन वर्षांत एकदम भाव भडकण्याला अनेक कारणे झाली आहेत. चीनच्या

आक्रमणानंतर संरक्षणखर्च व परराष्ट्रखात्यावरील खर्चही वाढला. पुढारी व अधिकारी यांचा स्वभाव असा आहे की नव्यानव्या कामाची निमित्ते मिळाली की अधिकारी, कचेऱ्या, बंगले यांचीच वाढ करायची. कामावर असलेल्या लोकांना पुरेशी कामे नाहीत, तरी पण नवीन भरती थांबत नाही. चलनफुगवट करून खोटा पैसा खरा करण्याची जादू अर्थमंत्र्याजवळ आहे. तिचा अविचाराने दुरुपयोग होत आहे. वास्तविक चलनफुगवटीला आर्थिक विकासात महत्त्वाचे स्थान आहे. बाजारभाव स्थिर ठेवण्या-इतके भावनियंत्रण यशस्वी करता आले तर वापरात न आलेली बेकार व सुप्त धनशक्ती व श्रमशक्ती उत्पादनाचे कामी आणण्याचे साधन म्हणून चलनी नोटा अथवा बँकांच्या ठेवी फुगवणे हे परिणामकारक साधन असते. पण या देशातील कोणत्याही सरकारला अजून ग्रामीण भागातील बेकार व सुप्त धनशक्ती व श्रमशक्ती उत्पादनाचे कामी वापरता आलेली नसून नव्या जागा, नवे अधिकारी, नवे बंगले व नव्या कचेऱ्या यांसाठी चलनफुगवट वापरण्यात येत आहे. जमेपेक्षां अधिक खर्च करून म्हणजेच तुटीचा अर्थसंकल्प करून सरकारने चलनफुगवट फार केली. बाजारभाव भडक-याला ही चलनफुगवटही फार मोठ्या प्रमाणात कारण झाली आहे.

पण अखेर बाजारभाव नियंत्रित करण्याचा मार्ग कोणता?

याबाबत योग्य असा उपाय अवलंबण्याचे धाडस फक्त महाराष्ट्र सरकारने दाख-विले असून अन्नटंचाई वाढू लागली म्हणजे महाराष्ट्राच्या मागून इतर सर्व सरकारांना जावे लागेल, अशी आशा दिसू लागली आहे. महाराष्ट्रात ज्वारी, तांदूळ व नागली यांची सरकारमार्फत एकाधिकार खरेदी चालू आहे. 'सरकारमार्फत' याचा अर्थ नोकरशाहीमार्फत असा नव्हे. शेतकऱ्यांची प्रतिनिधी असणाऱ्या सहकारी मार्केटिंग सोसायटीकडे सरकारने ते काम सोपविले असून सरकारचे अधिकारी नियंत्रणासाठी दिले आहेत. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक मालखरेदीसाठी पैशाचा पुरवठा करीत असून लहान शेतकऱ्याला आता किमतीत मार खाऊन माल विकावा लागत नाही. त्याला रास्त किंमत तावडतोब मिळते.

आता लहान शेतकऱ्याचे धान्य मोठ्या शेतकऱ्याला व व्यापाऱ्याला विकत मिळणार नाही, व गिऱ्हाइकांना म्हणजे सामान्य जनतेला रास्त किमतीला धान्य मिळेल. यामुळे सामान्य जनतेकडून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या वस्तू व सेवा रास्त किमतीला शेतकऱ्याला मिळतील व बाजारभाव स्थिर होण्यास मदत होईल. अर्थात बाजार-किंमती या अखिल भारतीय पातळीवर ठरतात यामुळे एकट्या महाराष्ट्राने हे धोरण अवलंबणे हा, समुद्रात पोतेभर साखर टाकून समुद्र गोड करण्यासारखा प्रयत्न ठरेल. अखिल भारतीय पातळीवर अन्नधान्यखरेदीविक्री सहकारी संघटनेमार्फत करणे हे फार दुष्कर आहे. पण अन्नधान्याबाबत व अर्थात इतर सर्व वस्तूंबाबत बाजारभाव स्थिर करण्याचा दुसरा कोणताच मार्ग नाही. त्याचबरोबर आता काही वर्षे तुटीचा अर्थसंकल्प थांबला पाहिजे.

साऱ्या भारताने आता हा मार्ग पत्करला तरी इतक्या उशीरा या उपायाप्रत आपण आलो आहो व परिस्थिती इतकी आटोक्याबाहेर गेली आहे, की हा उपाय अमलात येऊन त्यावर लोकांची श्रद्धा बसावी इतके यश येण्याला शांत वातावरणाचा अवधी मिळणेही कठिण आहे. आणि गेल्या पंधरा वर्षांतला अमेरिकन धान्य-साहाय्याचा अनुभव असा आहे की ते साहाय्य चालू असेपर्यंत या देशात अधिकाऱ्यांची व पुढाऱ्यांची सुस्ती आणि व्यापाऱ्यांची नफेबाजी चालू राहून दरएकरी पीकवाढीचे प्रयत्न होणे अवघड आहे. सरकारी एकाधिकार धान्यखरेदीसारख्या उपायांचे समर्थन करण्यास जपानचे उदाहरण पुरेसे आहे. जपानमध्ये तांदूळ हे मुख्य अन्न असून सरकार मक्तेदारीने सहकारी संघटनेमार्फत धान्यखरेदी करते. जपानातील सारी दहा कोटी लोकसंख्या तांदुळाबाबत रेशनिंगखाली आहे. जपानची दुसरी अनुकरणीय गोष्ट म्हणजे सात एकराहून कोणाही शेतकऱ्याला अधिक जमीन नाही व दर शेतकऱ्याला सरासरी अडीच एकरच जमीन आहे. पण शेतकरी निष्ठेने शेती करून शास्त्रशुद्ध उपायांनी जास्तीत जास्त पीक काढतो. शेतीच्या क्षेत्रात खाजगी सावकारी नाही. सहकारी बँकेचे कर्ज शेतकरी काढतो. सहकारी बँकेत इतक्या ठेवी असतात की उद्योगधंद्यांना त्यांतून कर्ज देण्यात येते.

भारतातील सहकारी चळवळीची परिस्थिती अत्यंत शोचनीय आहे. सहकारी बँकांचे कर्ज लहान शेतकऱ्याला पुरेसे मिळत नाही. मिळते तेही मिळण्याला अत्यंत त्रास पडतो. वशिलेबाजी चालते. मग शेतकरी सावकारांचे तोंडी कर्ज काढतो. ते तो काळजीपूर्वक फेडतो, पण सहकारी सोसायटीचे लेखी कर्ज इमानाने फेडत नाही, आणि सहकारी सोसायटीचे कर्ज सावकाराला तारणासारखे उपयोगी पडते. यामुळे सावकारी पाश शेतकऱ्याच्या मानेभोवती अधिकच आवळला जातो. आता सहकारी मार्केटिंग सोसायटी व सहकारी क्रेडिट सोसायटी यांनी सहकार्य करून शेतकऱ्याचा शोषक जो खाजगी सावकार व खासगी व्यापारी त्याच्यापासून शेतकऱ्याला दूर सारला पाहिजे. शेतकऱ्याला ज्या किमती मिळतात त्या किमतीत त्याचा जीवनखर्च व उत्पादन-खर्च भागेल अशा दराने शेतकऱ्यांच्या गरजांचा माल त्याला मिळाला पाहिजे. त्यासाठी सहकारी गिऱ्हाईकसंघटना सार्वत्रिक झाल्या पाहिजेत, त्यामुळे शेती नफ्यात येईल व दर एकरी पीकवाढ करण्याला शेतकऱ्याला हुरूप येईल.

दर एकरी पीकवाढीच्या कार्यक्रमात गोपुरी संडासाच्या कार्यक्रमाला महत्त्व असून त्यामार्गे भंगीव्यवसाय बंद झाल्यास समाजक्रांतीचे फार मोठे कार्य होईल. गोबर मैला व गॅसप्लँटने खेड्यात प्रकाश व शक्ती मिळेल. हल्ली रासायनिक खतांची गरज लोकांना पटली आहे. पण प्राणिज खतावाचून रासायसिक खताचा वापर केल्यास दोनतीन वर्षांत जमिनीची वाळू होऊन जाते हे ठाऊक असूनही हल्ली कंपोस्ट करण्याचे कोणी मनावर घेत नाही व रासायनिक खतांचा अविचाराने वापर व प्रचार चालू आहे. शेतीविषयी किती शास्त्रशुद्ध विचार करावा लागतो हे येथे कळते.

मागे पुण्यास घोडनदी खोऱ्याचे संशोधन १९५२ च्या दुष्काळ निवारण समितीने केले होते. नव्वद मैल लांबीची नदी, उगमापासून काही भाग जंगली डोंगर, त्याखाली पठार व त्याखाली सपाट प्रदेश, घोडखोऱ्याची रचना अशी आहे. डोंगरावर शंभर इंचांहून अधिक पाऊस पडतो तो पुढे कमी होत होत सपाट प्रदेशावर वीस इंचांइतका खाली येतो. हे सबंध खोरे हे एकच क्षेत्र कल्पून त्याचे नियोजन करावे अशी ही योजना आहे. डोंगरी जंगलात शेती व गुरचरण यांना बंदी करावी, जंगल वाढवावे, त्यांत हिरडा होतो त्यातून रंगाचे कारखाने काढावे, (टॅनिन काढण्याचाही कारखाना चालविता येईल,) इमारती लाकूड, जळण वगैरे खूप उत्पन्न येईल, अशा कल्पना संशोधकांनी त्या पुस्तकात मांडल्या आहेत. डोंगरावरून वाहणारे पावसाचे पाणी डोंगरावरून पठारावर पडल्यास डोंगरावरील दगडगोटे उकरून झाडाची मुळे उपटते व दगडगोट्यांनी खाली पठाराची जमीन खराब होते. हे टाळण्यासाठी डोंगराच्या खालच्या कडेला बांध घालून झाडांच्या मुळ्यात पाणी मुरवावे व बाजूच्या ओहोळांतून जाऊ द्यावे म्हणजे पठारावर पाझरपाण्याचे तलाव होतील व ओहोळातून वाहणारे पाणी नदीला जाऊन खाली सपाट भागात कालवे काढता येतील. यामुळे पठार व सखल प्रदेश यात शेती सुपीक होईल अशी ही योजना आहे. सह्याद्रीच्या माथ्यावर उगम पावून पूर्वेकडे वाहणाऱ्या गिरणा, गोदा, भीमा व कृष्णा या चार नद्यांची खोरी या घोडनदी खोऱ्यासारखी असून या चार खोऱ्यांचा विकास या घोडनदी योजनेसारखा करावा असे संशोधकांनी म्हटले आहे. हल्ली सरकारची या सर्व प्रदेशात काही ना काही कामे चालली आहेत. या चारही खोऱ्यातल्या मावळी लोकांची मुंबईत एक परिषद केव्हा केव्हा भरते व विकासकामांचा विचार होतो. पण घोडनदी योजनेसारख्या सुसंबद्ध योजनेचा विचार करूनच चालू खर्च करावा असे कोणीच मनावर घेत नाही.

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांनी एक नवा मनू निर्माण केला आहे. पण भुईमूग पिकवून त्यांचे तेल काढून त्यांतून साबणासारखे धंदे शेतकऱ्याला सहकाराने करता आल्याशिवाय जिराईत शेतकऱ्याला डोके वर काढता येणार नाही. जेथे थोडेही पाणी असेल तेथे ते शेतीला घेता आल्यास केवढ्याही खर्चाने ते पाणी पुरविण्याची तरतूद करावी, दर पन्नास एकरात एक सरकारी विहीर काढून लहान जिराईत शेतकऱ्यांना सरकारने पाणी विकावे, इत्यादी काही फार चांगल्या योजना महाराष्ट्र सरकारने घेतल्या आहेत. अखेर शेती व शेतकरी यांचा विकास होऊन, त्यांतील भांडवलसंचयाने उद्योगविकास झाला पाहिजे, म्हणून शेतीवर येथे विशेष भर दिला.

भारत-पाक युद्धाने एकदम सर्वजण हबकल्यासारखे झाले. याचे कारण असे की काटकसरीने काळजीपूर्वक योजना आखून विकास करण्याची सवय कधी कोणास लागलीच नाही. वास्तविक युद्धसंकट आले म्हणूनच खर्च फारसा वाढू न देता विकासकामे वाढली पाहिजेत. युद्धाच्या तगाद्याने उत्पादन व उत्पादनशक्ती वाढली

असे घडले पाहिजे. पण हाती घेतलेल्या योजना सोडून देण्यात येत आहेत. खेड्यापाड्यातून दुधासाठी व मांसासाठी गुरे, कोंबड्या वगैरे पाळणे, डोंगरावर जंगल लावणे, कळकासारखी पैसे देणारी पिके काढणे, अशा योजना युद्धासारख्या सबबी बाजूस सारून किंवा खरे म्हणजे युद्धकाळी अर्थसंघटना सुधारण्यासाठीच पुढे रेटल्या पाहिजेत. पण गेल्या पंधरा वर्षांत थोडाफार विकास झाला तरी आता उलट मरगळ आली आहे. नैतिक निष्ठा कमी झाली आहे आणि सुखाजोगी परिस्थिती येण्यापूर्वीच लोक सुखावले अथवा मतिकुंठित झाले की काय अशी शंका येत आहे.

आज विकास एका महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन खुंटला आहे. जास्तीत जास्त जमीन पिकाने व्यापली. नवी जमीन आता शेतीखाली आणायला उरली नाही. आता उत्पन्नवाढ हवी तर दर एकरी पीक वाढविले पाहिजे. ग्रामीण भागात आता खाजगी भांडवलशाहीला वाव न देता सहकारी धंदे उभारून लोकांचे धन वाढविले पाहिजे, अगदी लहान शेतीतून शेतकऱ्यांना काढून त्यांना एकेकट्याला पुष्कळ गुरे पाळण्याचा धंदा द्यावा व अशा गुरांच्या अनेक गोठ्यांना सहकारी संघटनेत आणून मांस, दूध वगैरेची विक्री करावी, गुरांचे अन्न, आरोग्य वगैरेबाबत सहकारी संघटन करावे अशी एक सूचना करण्यात आली आहे. ती फार आकर्षक आहे.

मोठ्या शहरांना ड्रेनेजे काढणे हे आता अशक्य होऊं लागले आहे. त्याऐवजी गोपुरी संडास, शोषखड्डे वगैरे योजना कमी खर्चाच्या व अधिक व्यवहार्य होतात असा अनुभव काही ठिकाणी आला आहे. शेतीच्या विकासालाही त्यांचा उपयोग आहे.

लहानात लहान गाव केवढे असावे याचा विचार झाला पाहिजे. सगळ्या मुलांना शाळेत जाता यावे, अर्ध्या मैल अंतरात शाळा असून, तीन मैलाच्या आत दवाखाना असावा, वाटेत नदीनाला असेल तर त्यावर पूल असावा इत्यादी विचार करून खेड्यांचा आकार ठरवावा व नवी गावे वसवावी. लोकांना जागा व घरबांधणीचे साहित्य देऊन घरे बांधणाऱ्यांच्या टोळ्या बनविल्या तर हे अशक्य नाही.

ॲग्रिकल्चरल इस्टेट्सची एक कल्पना निघाली आहे. तेथे गुरांचे गोठे, सुतार व लोहारकामाचे वर्कशॉप्स चालविता येतील. मुंबईसारख्या ठिकाणी एक टक्काही महाराष्ट्रीय सुतार का नसावा? महाराष्ट्रीयांना सुतारकाम, लहान यंत्रकाम वगैरे शिकवून मुंबईसारख्या शहरात त्याला काम दिले पाहिजे. भारत हा सर्वांना सारखाच खुला असावा हे बोलणे सामान्यतः खरे आहे. पण आसामात इतिहास-कालांत आलेले बंगाली आसामींचा रस्ता बंद करून बसले असे आसामींना वाटते. तेथे स्फोटाचा धोका असल्याचा इशारा एकदा मिळाला. अशी स्फोटाची स्थळे मुद्दाम निर्माण होऊ न देणे चांगले. मला हा मुद्दा अधिक उगाळून प्रांतिक दुरभिमानाला उत्तेजन द्यायचे नाही. पण भारत हे राष्ट्र फार मोठे आहे व त्यात सांस्कृतिक व आर्थिक बाबतीत फार विषमता असलेली उपराष्ट्रे आहेत. यांतील मागसलेल्यांच्या विकासाचा खास प्रयत्न करून प्रांताप्रांतात समता ज्या प्रमाणात निर्माण करता

येईल त्याच प्रमाणात राष्ट्रीय प्रगती होईल ही गोष्ट लक्षात घ्यावी, एवढेच मला सांगायचे आहे.

## लोकशाही समाजवादच का ?

स्वतंत्र भारताच्या आर्थिक विकासाच्या पद्धतीसंबंधाने बराच वाद गेल्या अठरा वर्षांत माजून राहिलेला आहे. भारत हे लोकशाही समाजवादाने चालणारे व नियोजनाने आर्थिक प्रगती करणारे राष्ट्र आहे असे राज्यकर्त्या काँग्रेसपक्षाचे म्हणणे आहे. उलट भारतात समाजवाद राहोच पण प्रौढमताधिकारावर चाललेली लोकशाही स्वीकारण्यात आली हीच चूक झाली असे म्हणणारे काही सुशिक्षित आक्षेपक एका टोकाला असून दुसऱ्या टोकाला समाजवाद व नियोजन हे फक्त शब्द सरकार उच्चारते, कृती सारी भांडवलशाहीचीच आहे अशी टीका होत आहे. अशा टीकांत थोडे फार सत्य असतेही; म्हणून येथे बिनतोड उत्तर देता येत नाही. तेव्हा परिस्थितीकडे पाहावे कसे एवढेच सांगतो.

ज्यांना प्रौढमतावर आधारलेली लोकशाहीच नको आहे ते 'इंग्लंडसारख्या राष्ट्रांचा अथवा जपानचा इतिहास पाहा' म्हणतात. इंग्लंडात भांडवलशाही विकसत असता तेथल्या जनतेची निर्दय पिळणूक झाली. पहिले महायुद्ध होऊन जाईपर्यंत ब्रिटनमध्ये प्रौढ मताधिकार पूर्ण झाला नव्हता. पण भारताला आता जनतेची पिळणूक करून व मताधिकार जनतेला नाकारून इंग्लंडसारखा विकास करता येणार नाही. जगातले तत्त्वज्ञान बदलले आहे. लोकशाही राष्ट्रांत प्रौढमताधिकार हे श्रेष्ठ मूल्य झाले आहे. जर्मनी अथवा जपान येथे आधुनिक काळातही हुकमशाहीने प्रगती झाली. पण त्यांतून दुसरे महायुद्ध निघाले. आता नव्या फॅसिस्ट अथवा कम्युनिस्ट हुकुमशाही सत्ता स्वीकारण्याला भारतातली जागृत जनता तयार होणार नाही. जगातली इतर राष्ट्रे अशी हुकूमशाही भारतात निर्माण होऊ देणार नाहीत, नांदूही देणार नाहीत. शिवाय एकोणिसाव्या शतकात ब्रिटनने जनतेला पिळून म्हणजे कमीत कमी खरेदीशक्ती वाटून, जास्तीत जास्त माल निर्माण केला, तो माल स्वदेशात खपला नाही म्हणून बाहेरचे हक्काचे बाजार मिळविण्यासाठी साम्राज्ये मिळविली, पिळणुकीची नवी क्षेत्रे मिळविली व असा ब्रिटनचा विकास झाला. पण त्यांतूनच आंतरराष्ट्रीय युद्धे आली. आता साम्राज्ये व युद्धे हे खेळ भराताला करायचे असले तरी जग ते करू देणार नाही. म्हणून स्वदेशातल्या जनतेची रोजगारी सरकारी भांडवलगुंतवणुकीने वाढवून व लोकांत अधिकाधिक खरेदीशक्ती वाटूनच अर्थसंघटनेचा विकास या देशांत केला पाहिजे. केन्सने हा उपाय सांगितला व भारताने तो स्वीकारला आहे.

या देशात समाजवाद आहे की नाही? धनोत्पादनसाधनांचे राष्ट्रीयीकरण ही समाजवादाची व्याख्या आता मागे पडली आहे. धनोत्पादनसाधने खाजगी मालकीत असलीच पाहिजेत ही एकोणिसाव्या शतकातली व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांची कल्पनाही मागे

पडली आहे. आणि लोककल्याणासाठी लोकशाही सरकार धनोत्पादनसाधनांच्या मालकीचे, नफ्याचे, मजुरीचे, व्याजाचे, खंडाचे लोककल्याणासाठी नियंत्रण करू शकते हे गेल्या अठरा वर्षांत दिसून आले आहे. तेव्हा आता समाजवाद याहून वेगळा असू शकणार नाही. लोककल्याणासाठी धनोत्पादनसाधनांचे नियंत्रण करण्याचा हक्क सरकारला असला म्हणजे मालकी सरकारची असावी की खाजगी असावी हा व्यवहाराचा प्रश्न ठरतो. केन्सच्या मताचा हा विस्तार असून भारताने ते धोरण स्वीकारले आहे.

पण आजवर या दृष्टिकोनाची बजावणी कार्यक्षमतेने व प्रामाणिकपणे झाली नाही हे खरे आहे. याचे कारण बहुतेक पुढाऱ्यांनी या प्रकारच्या समाजवादाचा म्हणजे केन्सियन दृष्टिकोनाचा अभ्यास अथवा विचार कधी केलेला नाही, त्याबद्दल त्यांना निष्ठा कधी वाटली नाही. यात बदल झाला पाहिजे व व्यापाऱ्याच्या पकडीतून सुटण्यासाठी जनतेने सहकाराचा अवलंब केला पाहिजे.

घाऊक व्यापाऱ्याच्या पकडीतून सुटण्यासाठी शेतकरी व मध्यमवर्ग जीवनावश्य वस्तूंची खरेदीविक्री सहकाराने करीत नाहीत तोवर समाजजीवनावर व्यापारी वर्चस्वच राहणार आणि नियोजन व समाजवाद फार विकसणार नाहीत.

व्या|ख्या|न
ति|स|रे

# संसदीय लोकशाहीचा फेरविचार

भारतातील संसदीय लोकशाहीचा विचार करताना प्राचीन लोकशाहीचा विचार करण्याची जरूरी नाही. आधुनिक काळासंबंधानेच बोलले पाहिजे. प्रौढ मताधिकारावर आधारलेली लोकशाही ही आधुनिकच आहे. जे इंग्लंड या लोकशाहीचे माहेरघर त्या इंग्लंडात अठराव्या शतकाच्या अखेरीस हाउस ऑफ कॉमन्समध्ये निवडून आलेले काही सदस्य असे होते की ते ज्या मतदारसंघातून निवडून आले होते त्या मतदारसंघातील सारी वस्ती कारखानदारीच्या शहरात रोजगारीसाठी उठून गेली होती व एकही मतदार जागेवर नव्हता. १८३२ त प्रथम हाउस ऑफ कॉमन्सचे मतदारसंघ नव्याने नीट पाडले गेले आणि मताधिकार व्यापक व व्यवस्थित करण्यात आला. पण तेव्हा सर्व प्रौढांना मताधिकार नव्हता. विशिष्ट आर्थिक मिळकतीची अट होती. स्त्रियांना मताधिकार नव्हताच. संपूर्ण प्रौढमताधिकार स्त्रीपुरुषांना मिळण्याला इंग्लंडात पुढे जवळजवळ ऐंशी वर्षे लागली. प्रौढमताधिकारासाठी या सर्व काळात प्रखर झगडा चालला होता. एकोणिसाव्या शतकात लिबरल व कॉन्झर्वेटिव्ह हे दोन पक्ष ब्रिटिश पार्लमेंटांत प्रभावी होते. इंग्लंडला दिगंत कीर्ती देणारी द्विपक्षीय लोकशाही १८३२ पासून विशेष झळकली. चालू शतकात पहिल्या महायुद्धानंतर मजूर पक्ष वाढू लागला व लिबरल पक्ष दुबळा होऊ लागला. दुसऱ्या महायुद्धानंतर लिबरल पक्ष पूर्ण दुबळा होऊन आता मजूर व कॉन्झर्वेटिव्ह हे जवळजवळ तुल्यबल पक्ष आहेत. भारतीय लोकशाहीचे स्वरूप व गुणदोष कळून येण्यास मुख्यतः इंग्लंड व

अमेरिका येथील लोकशाही घटनांचा विचार करावा लागतो. कारण त्या दोन राष्ट्रांतील लोकशाहीचा नमुना समोर ठेवून भारतीय लोकशाही घडविण्यात आली आहे.

## भारतीय राज्यघटनेचा पाया

इंग्लंडात हाउस ऑफ लॉर्ड्स व हाउस ऑफ कॉमन्स अशी पार्लमेंटची दोन सभागृहे आहेत. अमेरिकेतील पार्लमेंट म्हणजे काँग्रेस. तेथे सीनेट व हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हज अशी दोन सभागृहे आहेत. इंग्लंडातील वरिष्ठ सभागृह म्हणजे हाउस ऑफ लॉर्ड्स, हे आनुवंशिक सरदारांचे असते. काही नागरिकांना त्यांच्या आयुष्यापुरती सरदारकी राजा देतो व ते या वरिष्ठ सभागृहात बसतात. सरकारच्या वित्तविषयक निर्णयास या सभागृहाच्या मताची जरूरी नसते. वित्तविषयक निर्णय फक्त हाउस ऑफ कॉमन्सच ठरवते. मंत्रिमंडळाला पाठिंबा जो हवा असतो, तो खालच्या सभागृहाचा म्हणजे हाउस ऑफ कॉमन्समधील बहुमताचा असावा लागतो. हाउस ऑफ कॉमन्सची संपूर्ण निवडणूक होते. याचा अर्थ खालचे सभागृह हे इंग्लंडातले खरोखर वरिष्ठ सभागृह असून वरिष्ठ सभागृह हे लोकशाही सभागृहच नव्हे. तरीपण वित्तविषयक विधेयकाखेरीज बाकीची सर्व विधेयके दोन्ही सभागृहांनी मंजूर करावी लागतात. वित्तविषयक विधेयकांना लोकनियुक्त अशा हाउस ऑफ कॉमन्सची मंजुरी लागते हे खरे. पण राजघराणे व राजाचे शेकडो नातलग आणि सरदारवर्ग यांना राज्यकारभारात काही कामे नसता व आर्थिक बाबतीत इंग्लंडची सदा ओढगस्त चाललेली असता शेकडो कोटींचा खर्च राजघराणे, त्यांचे नातलग व सरदारवर्ग यांना पोसण्यासाठी व त्यांच्या बडेजावासाठी शतकानुशतके मतभेदावाचून चालू आहे हे या इंग्लंडच्या लोकशाहीचे लोकविक्षलण वैशिष्ट्य होय.

अमेरिकेतील काँग्रेसचे वरिष्ठ सभागृह सीनेट व कनिष्ठ सभागृह हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हज. ही दोन्ही लोकनियुक्त आहेत. त्यातले हाउस ऑफ रेप्रेझेंटेटिव्हज हे सबंध दोन वर्षांनी निवडले जाते व सीनेटमधील एकतृतीयांश सभासद दर दोन वर्षांनी निवडले जातात. अमेरिकेत राष्ट्रपतीही सर्वसामान्य मतदारांकडूनच निवडला जातो. तो चार वर्षे अधिकारावर असतो. त्याला काँग्रेसमधील बहुमताच्या पाठिंब्याची गरज लागत नाही. दैनंदिन राज्यकारभार त्याला आपल्या अधिकारात करता येतो. पण पैशाचे नवे खर्च करण्याचा व नवे कायदे करण्याचा अधिकार काँग्रेसचा असतो. अमेरिकेत वरिष्ठ सभागृह जे सीनेट त्याला वित्तविषयक धोरण, परराष्ट्रधोरण वगैरे बाबतीत राष्ट्रपतीचे निमंत्रण करण्याचे काही खास अधिकार आहेत. या दृष्टीने पाहता अमेरिकेतील वरिष्ठ सभागृह हे खऱ्या अर्थाने वरिष्ठ सभागृह आहे.

अमेरिकेचा राष्ट्रपती हाच दैनंदिन व्यवहारात सरकार असून अमेरिकन काँग्रेसच्या दोन्ही सभागृहात बहुमत कोणत्याही पक्षाचे असो, चार वर्षेपर्यंत राष्ट्रपती बदलू शकत नाही. म्हणून अमेरिकन राज्यघटनेला 'प्रेसिडेन्शिअल' घटना म्हणतात.

ब्रिटनमध्ये मंत्रिमंडळ हेच दैनंदिन सरकार असते. व ते हाउस ऑफ कॉमन्सला जबाबदार असते. हाउस ऑफ कॉमन्समध्ये बहुमत रोज जरी बदलले तरी रोजच्यारोज मंत्रिमंडळ बदलावे लागेल. म्हणून ब्रिटिश घटनेला पार्लमेंटरी (संसदीय) घटना म्हणतात.

अमेरिकन घटना व ब्रिटिश घटना यांना अनुक्रमे 'रेप्रेझेंटेटिव्ह' आणि 'रिस्पॉन्सिब्रल' म्हणजे 'प्रातिनिधिक' व 'जबाबदार' राज्यघटना असेही म्हणतात. याचा अर्थ अमेरिकेचा राष्ट्रपती हा निवडून आलेला असतो या अर्थाने तो प्रतिनिधिक आहे, पण काँग्रेसमधील बहुमताला जबाबदार नाही. उलट ब्रिटनमध्ये मंत्रिमंडळ हे हाउस ऑफ कॉमन्सच्या बहुमताला जबाबदार असते.

फ्रान्समध्ये सात वर्षांपूर्वीपर्यंत जबाबदार मंत्रिमंडळच होते. पण कित्येक वेळा आठवड्यापंधरवड्यांनी मंत्रिमंडळे बदलली. यामुळे गेल्या पाच वर्षांत फ्रान्समध्ये पार्लमेंटरी घटना जाऊन तेथे अध्यक्षीय घटना आली आहे.

भारतात जबाबदार अथवा संसदीय स्वरूपाची घटना आली याचे कारण ब्रिटनचा व भारताचा संबंध हे होय. पण भारतीय घटनेत अमेरिकेचेही अनुकरण आहे. भारतीय राष्ट्रीय सभेच्या म्हणजे काँग्रेसच्या स्थापनेच्या वेळी अमेरिकन पद्धतीच्या घटनेचा आदर्श भारतापुढे असावा असे मानण्यास जागा आहे. कारण अमेरिका हे फार मोठे राष्ट्र असून त्यात जशी अनेक घटक राज्ये आहेत त्याप्रमाणे भारत हेही फार मोठे राष्ट्र असून त्यातही अनेक घटक राज्ये करावी लागतील अशी कल्पना काँग्रेसच्या पुढाऱ्यांची असावी. म्हणून आपल्या राष्ट्रीय संघटनेला त्यांनी अमेरिकन काँग्रेसचे 'काँग्रेस' हेच नाव दिले. १९१६ साली लखनौ करार होऊन जी स्वायत्ततेची मागणी काँग्रेसने केली तीत 'प्रातिनिधिक' सरकार मागण्यात आले होते. पुढे १९१७ च्या ऑगस्टमध्ये त्यावेळचे भारतमंत्री मॉंटेग्यू यांनी घटनात्मक सुधारणेचा जो जाहीरनामा काढला त्यात त्यांनी आपण भारताला 'जबाबदार सरकार' देणार आहो असे आश्वासन दिले व मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा ज्या आल्या त्यात जबाबदार राज्यपद्धतीचा ओनामा करण्यात आला. त्यानंतरच्या काळात संसदीय म्हणजे जबाबदार राज्यघटनेची लोकशाही भारतात नांदायची असे सर्व पुढारी धरून चालले असून स्वतंत्र भारतासाठी घटना-समितीने चर्चेला घेतलेला घटनेचा मसुदा जबाबदार राज्यपद्धतीचाच होता व तशीच घटना मंजूर होऊन गेली पंधरा वर्षे अमलात आहे. भारतात पाच वर्षे आपल्या पदावर कायम राहणारा राष्ट्रपती आहे यात थोडेसे अमेरिकेचेही अनुकरण आहे.

जबाबदार राज्यघटना स्थिर राहात नाही असे पाहून पाकिस्तानने अध्यक्षीय घटना स्थापन केली. इतकेच नव्हे, तर प्रौढ मतदारातर्फे प्रांतिक असेंब्ली, राष्ट्रीय असेंब्ली व राष्ट्रपती यांच्या निवडणुका न करता प्रौढ मतदारांतर्फे ग्रामपंचायती निवडून एकूण देशातल्या ग्रामपंचायतींच्या चौऱ्यांशी हजार सभासदांना राष्ट्रीय असेंब्ली आणि प्रांतिक असेंब्ली निवडण्याचा व राष्ट्रपती निवडण्याचा अधिकार पाकिस्तानात देण्यात आला आहे. पण भारतात गेल्या पंधरा वर्षांत प्रौढ मताधिकारावर आधारलेल्या

संसदीय लोकशाहीचा प्रयोग यशस्वीपणे चालू आहे असे सारे जग म्हणत असून त्यात बदल करण्याची अथवा तिचा फेरविचार करण्याची कल्पनाही कोणास शिवलेली नाही. पण भारतातील संसदीय लोकशाहीचा अनुभव आता तपासणे जरूर झाले आहे.

## चालू अनुभवाचे स्वरुप

स्वतंत्र भारताने घटना समिती केली ती सर्वपक्षीय केली व घटना समितीलाच हंगामी संसदेचा दर्जा देऊन स्वतंत्र भारताचे पहिले मंत्रिमडळ हे अपक्षीय बनविले. त्यावेळी कॉंग्रेस सोशॅलिस्टांनी व कम्युनिस्टांनी त्या घटनासमितीत जाण्याचे नाकारले. १९४८ साली कॉंग्रेस सोशालिस्ट पक्ष हा कॉंग्रेसच्या बाहेर पडला. १९५० साली नव्या घटनेअन्वये लोकसत्ताक राज्य स्थापन झाले व १९५२ मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. १९४८ मध्ये कॉंग्रेसमधून जो कॉंग्रेस सोशालिस्ट पक्ष बाहेर पडला त्याने सोशॅलिस्ट पक्ष स्थापन केला. त्या वेळी या सोशॅलिस्टांना व कम्युनिस्टांना शहरी कामगारांचा, सुशिक्षित मध्यम वर्गाचा व मुख्यतः वृत्तपत्रांचा एवढा प्रचंड पाठिंबा मिळाला होता की १९५२ च्या निवडणुकीत कॉंग्रेसला संघसरकारात व काही राज्यात बहुमत मिळेलच असे जरी दिसत होते तरी सोशॅलिस्टांचा पक्ष बलवान विरोधी पक्ष होईल व काही राज्यात त्यांच्या हाती सत्ताही जाईल असे वांटले होते. १९४५ साली ब्रिटनमध्ये महायुद्धातील लोकप्रिय पुढारी चर्चिल यांच्या कॉंझर्वेटिव्ह पक्षास तेथील मतदारांनी अल्पमतात खेचून मजूरपक्षास बहुमत दिले व ब्रिटनच्या इतिहासात पहिल्याने खास सोशॅलिस्ट सरकार स्थापन झाले. या घटनेमुळे भारतातील सोशॅलिस्टांना फार हुरूप आला होता. वृत्तपत्रे, शहरी कामगार व सुशिक्षित मध्यम वर्ग यांचा सोशालिस्टांना पाठिंबा असण्याचा एवढा गवगवा झाला होता की १९५२ च्या निवडणुकीबद्दल स्वतः कॉंग्रेसलाही अविश्वास वाटत होता. आणि प्रत्यक्ष निवडणुकीत, कॉंग्रेसला एकूण मतदानाच्या पन्नास टक्क्यांहून थोडी कमीच मते मिळाली. तरी पण कॉंग्रेस सर्वत्र प्रचंड मताधिक्याने निवडून आली. आणि विरोधी पक्ष सर्वत्र फार मोठ्या प्रमाणात पाडाव पावले.

त्यानंतरच्या दोन निवडणुकींत असेच घडले आहे. केरळात कॉंग्रेसला बहुमत मिळत नाही, ओरिसात कॉंग्रेसचा एकदा पाडाव झाला आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी पश्चिम महाराष्ट्रात कॉंग्रेसचा खूप मोठा पाडाव झाला, असे काही अपवाद वगळल्यास कॉंग्रेसला सर्वत्र प्रचंड बहुमत मिळत गेले आहे, इतकेच नव्हे तर, पुढल्या एकदोन निवडणुकींतही विरोधी पक्षांना सत्ता अथवा विरोधी पक्ष या नात्याने तरी फार मोटा पाठिंबा मिळेलसे वाटत नाही.

वास्तविक कॉंग्रेसला जेमतेम ५० टक्यांहून अधिक मते मिळतच नाहीत. तेव्हा विरोधी पक्षांनी एकजूट केली तर सर्व राज्यात व संसदेतही बलवान विरोधी पक्ष निर्माण होतील व काही ठिकाणी विरोधी पक्षांना बहुमतही मिळेल. पण गेल्या पंधरा वर्षांत

विरोधी पक्ष काँग्रेसचा पाडाव करण्याच्या मुद्द्यावरही एकजूट झाले नाहीत व काँग्रेसच्या हाती निरंकुश सत्ता राहिली असून नजिकच्या काळात आपण एकजूट झालो नाही तर काँग्रेसची ही सत्ता हलणार नाही हे विरोधी पक्षांना कळले आहे. पण तरीही ते एकजूट होत नाहीत. निरनिराळ्या विरोधी पक्षांत एकजूट होत नाही, याला कारण तात्त्विक मतभेद होत, असे त्या त्या पक्षाचे पुढारी सांगतात. पण ते खरे वाटत नाही. विरोधी पक्षात जबाबदारीची जाणीव कमी आहे व पुढारीपणाची हाव असणाऱ्यांची संख्या प्रत्येक विरोधी पक्षात पक्षसदस्यांच्या संख्येच्या मानाने जास्त आहे, हे एकजूट न होण्याचे कारण असावेसे वाटते. गेल्या पंधरा वर्षांत विरोधी पक्षीय पुढाऱ्यांनी जनतेच्या गाऱ्हाण्यांना तोंड पाडण्याचे काम थोडेफार केले. पण त्यांनी जे विविध लढे केले त्यात काँग्रेसची निवळ अडवणूक करणे हा हेतु निम्म्याहून अधिक लढ्यात होता. लढ्याच्या इरेस पडून कामगारांचे, शेतकऱ्यांचे व मध्यमवर्गाचे नुकसान करण्यासही विरोधी पक्षपुढाऱ्यांनी कमी केले नाही. एखाद्या पक्षाने एखादा लढा सुरू करून काँग्रेसला अडचणीत आणले तर दुसरे सारे विरोधी पक्ष लढ्यातील न्यायअन्याय न पाहता अथवा कामगारांचे, शेतकऱ्यांचे अथवा मध्यमवर्गाचे नुकसान होईल की काय याचा विचारही न करता लढ्याला बिनदिक्कत पाठिंबा देत, यांतच त्यांची बेफिकीर वृत्ती दिसून येई. गेल्या व्याख्यानात राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीची माहिती दिली आहे पण विरोधी पक्षांनी या प्रगतीची दखल कधीच घेतली नाही. उलट काँग्रेसचे पुढारीही वर्गीय स्वार्थासाठी लोकहिताचा अत्यंत क्रूरपणे बळी देतात अशी उदाहरणे शेकडो घडली आहेत. गेल्या अकरा वर्षांत भारतात अमेरिकेने अन्नधान्य येत असता शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबवून, शेतीमालाचे व शेतकऱ्यांच्या गरजांचे भाव नियंत्रित करून शेती व शेतकरी यांचा उत्कर्ष करण्याचे केवढे तरी काम काँग्रेसला करता आले असते. पण ज्यांच्या हाती अन्न-धोरण व शेतीधोरण होते त्यांनी व्यापाऱ्याची अन्नधान्याच्या बाजारातली सत्ता आपण कमी करणार नाही असे स्पष्ट सांगितले आणि शेतीच्या उत्कर्षासाठी काहीही मूलग्राही प्रयत्न केला नाही. नेहरूंच्या व नंतरच्या मंत्रिमंडळातही ही माणसे प्रतिष्ठेने मिरवीत आहेत. संशयास्पद चारित्र्याची कितीतरी माणसे सर्व राज्यात वरिष्ठपदावर आहेत, सत्ताबाजीच्या स्पर्धा लोकमताची काहीही मुर्वत न करता चाललेल्या आहेत आणि लोकशाहीच्या यशासाठी जी थोडीफार नैतिक मूल्यनिष्ठा पुढाऱ्यात असली पाहिजे ती असणारे पुढारी फारच थोडे असून सत्तालोभ व धनलोभ यांचाच सर्वत्र हैदोस चाललेला जनतेला दिसत असल्याने जनतेतलीही नैतिक मूल्ये पुसट झाली आहेत.

तरी पण संसदीय लोकशाही भारतात यशस्वी झाली की नाही एवढाच प्रश्न विचारात घ्यायचा तर ती यशस्वी झाली असे म्हणता येते. आणि यात बरीचशी अपूर्वताही आहे. जवळजवळ सोळा ते अठरा कोटी मतदारांनी—यातील प्रचंड बहुसंख्य मतदार पाच लक्ष खेड्यात आहेत—एका विस्तीर्ण व मागसलेल्या देशात

तीन सार्वत्रिक निवडणुका शांतपणे पार पाडल्या, संघटनास्वातंत्र्य फार मोठ्या प्रमाणात कायम ठेवले, जमीनमालक, सावकार, व्यापारी, कारखानदार यांच्यावर नियंत्रण घालण्याचे कायदे करून त्यांची बजावणी काही प्रमाणात तरी केली आणि संप व दंगली मधूनमधून चालू राहिल्या तरी सामान्यतः नागरिकस्वातंत्र्याचा फारसा संकोच होऊ दिला नाही. तसेच या सर्व काळात लोकशाही डळमळावी अशी इच्छा कधी विरोधी पक्षांनीही केली नाही व सैन्यसत्ता येण्याचा संभव कधी दुरूनही दिसला नाही. यावरून जगातील सर्वांत मोठी व अवघी पंधरा वर्षांपूर्वी जन्मास आलेली लोकशाही समर्थपणे नांदली आहे व कोणत्याही हुकुमशाहीचे अथवा कठोर शिस्तीचे बंधन नसता, भाषिक व प्रादेशिक दंगलींनी केव्हा केव्हा अनर्थ घडविला असता, देशाची एकता बिघडली नाही ही गोष्ट नमूद करण्याजोगी आहे. भारत-पाकिस्तान युद्धात मुसलमानांनी बरीच भारतनिष्ठा दाखविली आणि दक्षिण भारतातील द्रवीड पक्षाने भारतातून फुटून जाण्याचा हट्ट तूर्त तरी सोडून दिला आहे या गोष्टी भारताची एकता व येथली लोकशाही यांना दृढता प्राप्त झाल्याच्याच द्योतक आहेत. पंधरा वर्षांत विरोधी पक्ष बलवान झाला नाही, तरीपण राज्यकर्त्यांनी, लोकशाही संघटनेची तत्त्वे सामान्यतः प्रामाणिकपणे पाळली व देशाची आर्थिक प्रगतीही केली एवढे खास म्हणता येते.

पण या लोकशाहीची कार्यक्षमता अधिक वाढली पाहिजे. जाणीवयुक्त लोकमताचा अधिक दाब सरकारवर पडला पाहिजे. सरकारवर होणारी टीका अधिक जबाबदारीने झाली पाहिजे आणि लोकांना विश्वासात घेऊन अधिक सुबुद्धपणाने सरकार वागते हे सिद्ध झाले पाहिजे. याबाबत भावी काळाची काळजी वाटते. दोन कारणांमुळे या दिशेने प्रगती होण्याचा संभव घटत चालला आहे. गेल्या तीन सार्वत्रिक निवडणुकीत सरकारविरोधी पक्षांना फारच थोड्या जागा मिळाल्या असून त्यांना अधिक जागा मिळणे दिवसानुदिवस अधिकाधिक अशक्य दिसते हे एक कारण आणि त्यामुळे काँग्रेसमध्ये बेजबाबदारी वाढत आहे हे दुसरे कारण होय. नेहरूंच्यामागून विरोधी पक्षांना निवडून येण्याला अधिकाधिक संधी मिळेल असे पुष्कळांना वाटत होते. पण परिणाम उलटा झाला आहे. नेहरू हे काही महत्त्वाच्या बाबी सोडल्यास अप्रियता पत्करण्याला भीत नसत. अगदी महत्त्वाच्या बाबी सोडल्यास, प्रत्येक पाऊल मुत्सद्याने जपून टाकावे हा दंडक ते पाळत नसत. अनेक किरकोळ बाबीतीत अल्पविचाराने, अविचाराने वागत. यामुळे त्यांच्यावर प्रखर टीका होऊन नेहरू अप्रिय होत. त्यांची ही अप्रियता काँग्रेसपक्षाला सोसावी लागे व विरोधी पक्षांना निवडून येण्याची तेवढी तरी संधी मिळे.

पण आताचे पंतप्रधान लोकप्रियतेला जास्त जपतात. लोकमतावर पाळत ठेवून लोकांना आवडेल, शहाणपणाचे दिसेल असेच वागतात. यामुळे नेहरूंच्या वेळी नेहरूंच्या विरुद्ध जेवढी प्रखर टीका होत असे तेवढी आताच्या पंतप्रधानावर होत

नाही. हल्लीच्या अन्नपरिस्थितीला खरोखर मुख्यतः काँग्रेस जबाबदार आहे. हल्लीचे मंत्रिमंडळ हे यातून सुटू शकत नाहीत. पण शहरातून काँग्रेसला विरोध असला तरी ग्रामीण भागात काँग्रेसला पाठिंबा कमी झालेला नाही. जवळ जवळ सर्व राज्यात आता पंचायत संघटना स्थापन झाल्या असून त्यांना राज्यकारभारात अंमलबजावणीचा अधिकार असल्याने लोकांच्या दैनंदिन जीवनाशी त्यांचा संबंध येतो. यामुळे ग्रामीण भागात काँग्रेसचे पूर्वीपासून असलेले वजन व वर्चस्व वाढतच आहे. आणि ग्रामीण भागात विरोधी पक्षांना काही थोडा थारा असलाच तर तो आणखी कमी होत आहे. त्यामुळेच काँग्रेस पक्षात बेफिकीरी वाढत असून त्यामुळे लोकशाही कारभार अधिकाधिक बेदरकारीने होईल असा संभव दिसत आहे. खरोखर द्विपक्षीय लोकशाहीचा कालखंड संपला तर नसेल ना अशी शंका माझ्या मनात हल्ली नेहमी येते, ती मी येथे थोड्या तपशीलाने मांडू इच्छितो.

## ही द्विपक्षीय लोकशाही !

द्विपक्षीय लोकशाहीवर भारताची श्रद्धा आहे ती बरीचशी गतानुगतिकतेची अंधश्रद्धा आहे. इंग्लंडात द्विपक्षीय लोकशाही चालली तशीच ती येथे चालेल असे आम्ही धरून चालतो आहो. पण इंग्लंडात द्विपक्षीय लोकशाही, लोकशाहीचे संकेत पाळून, मुख्यतः गेल्या शंभर सवाशे वर्षातच चालली आहे. तो कालखंड इंग्लंडातही आजच्याहून तत्त्वतः वेगळा होता. एकंदर लोकव्यवहारापैकी न्याय, पोलीस, म्युनिसिपल व्यवस्था व राष्ट्रीय संरक्षण या बाबी सरकारकडे असत. पण एकंदर लोकव्यवहारापैकी फक्त पाच दहा टक्के व्यवहार यात मोडत असून बाकी व्यापार, वाहतूक, धनोत्पादन, शिक्षण, आरोग्य, लोकजागृती हे सर्व बहुतेक नव्वद ते पंचाण्णव टक्के लोकव्यवहारकार्य खाजगी व्यक्तींच्या अथवा संघटनांच्या हाती असून त्यात सरकारला कोणी हस्तक्षेप करू देत नसे. यामुळे सरकारला कोणाचेही व्यक्तिशः अथवा संघशः भलेबुरे करण्याची सत्ता फार थोडी होती. इंग्लंडात त्या काळी सरंजामी समाजघटना व भांडवलदारी समाजघटना यांच्या दरम्यान जुन्यानव्या सवयींचा व श्रद्धांचा झगडा चालू होता. दोन्ही विचारांचे लोकमत प्रबळ होते व वैचारिक आंदोलन मोठे चाले. त्यात अमुक एका बाजूस सरकारची प्रचंड शक्ती मिळत नसल्याने दोन समान पक्षांत द्वंद्व चाले आणि ज्यांना बहुमत मिळत नसे त्यांनाही सरकारवर दबाव आणून आपली धोरणे सरकारवर लादता येत. भारतात व आता ब्रिटनमध्येही गेल्या शतकातली ही परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे.

भारतात हल्लीही द्विपक्षीय लोकशाही कोणत्या परिस्थितीत चालत आहे याचा विचार येथे करू. येथे द्विपक्षीय लोकशाही खऱ्या अर्थाने नाहीच. द्विपक्षीय लोकशाहीत दोन पक्ष मोठे असले पाहिजेत. बाकीचे पक्ष नगण्य इतके लहान असले पाहिजेत. ब्रिटनमध्ये गेल्या शतकात असे घडलेच. भारतात विरोधी पक्ष अनेक

आहेत. ते एकजूट होतील व जबाबदारीने सरकार बनवतील ही आशा खुंटली आहे. केरळातील कम्युनिस्ट सोडले तर एकाही राज्यात एकाही विरोधी पक्षाला बहुमत मिळण्याचा अथवा बलवान विरोधी पक्ष बनता येण्याचा संभव नाही. आणि कम्युनिस्टांची निष्ठा या देशाला वाहिलेली नसून परदेशात गुंतली आहे अशी जोवर लोकांची ठाम समजूत आहे तोवर कम्युनिस्टांना बहुमत मिळाले तरी या देशात त्यांना कोणी सत्तापदावर राहू देणार नाही.

विरोधी पक्षांना बहुमत का मिळत नाही असा प्रश्न येथे उरतो. ब्रिटनमध्ये ज्या परिस्थितीत द्विपक्षीय लोकशाही टिकली ती परिस्थिती आता येथे नाही हे त्याचे उत्तर आहे. म्हणजे बदल कोणता झाला आहे? पोलीस, न्याय, म्युनिसिपल व्यवस्था व संरक्षण एवढ्या क्षेत्रावर म्हणजे लोकव्यवहारातील पाच ते दहा टक्के भागावर ताबा चालविणारी राज्यसंस्था, एकंदर लोकजीवनाबद्दल बेफिकीर असणारी राज्यसंस्था आता लोककल्याणकारी झाल्यामुळे नागरिक जीवनाच्या जवळजवळ सर्व क्षेत्रांवर राज्य संस्थेचे नियंत्रण आले आहे. याचा परिणाम असा झाला आहे की खाजगी मालकी व भांडवलशाही यांचे वर्चस्व अजून येथे भरपूर असले तरी राजसत्तेची इच्छा होईल त्या वेळी व इच्छेला येईल तेथे राज्यसंस्थेचा नियंत्रक हात घुसू शकतो. आणि राज्यसंस्था ही त्या त्या वेळी पक्षसत्ताक असल्याने पक्षहितासाठी तिचा वापर होणे हे अपरिहार्य होते. पक्षहितासाठी राज्यसंस्थेचा वापर झाल्यास पक्षीय स्वार्थाबद्दल सत्ताधारी पक्षावर टीका करून त्याला अप्रिय करणे विरोधीपक्षास शक्य होईल. पण पक्षपुढारी शहाणे व धूर्त असल्यास, पक्षहित व लोकहित दोन्ही एकरूप होतील अशा प्रकारे, पक्षहिताची व लोकहिताचीही आखणी करू शकतात.

मागासलेल्या देशात विकासकार्याची पुष्कळशी कामे सरकारने केली पाहिजेत, सार्वजनिक जीवनसाधने सरकारने शक्य तो स्वताच चालविली पाहिजेत असे तत्त्वज्ञानच आता स्वीकारण्यात आले आहे. यामुळे राज्यकर्त्या पक्षाचे हातून शेकडो कोटी रुपये लोकहितार्थ खर्च झालेले लोकांना दिसतात. साहजिकच लोकप्रियतेचा मक्ताच सरकारी पक्षाला मिळतो व विरोधी पक्षांना लोकहित करण्याच्या संधीपासून दूरदूर लोटले जाते. राज्यकर्त्या पक्षाचा आधार लोकशाही हाच असतो हे खरे. पण एकदा एका पक्षाला बहुमत मिळून तो सत्ताधीश झाला म्हणजे मुख्यमंत्र्याच्या हाती एकेका राज्यात शंभर बड्या जागा तरी अशा असू शकतात की ज्या तो त्याच्या पसंतीच्या माणसास "देऊ" शकतो, त्यांचा पगार कोणालाही आकर्षक वाटतो व अशी लोभावलेली हुशार माणसे राज्यकर्त्या पक्षाच्या मंडपात अथवा अंगणात थांबून पुढाऱ्याच्या नजरेच्या 'क्यू'मध्ये राहतात. केवळ सत्तालोलुप व धनलोलुप माणसांनाच हे आकर्षण असते असे नव्हे. ज्यांचा स्वभाव लढाऊ, महत्त्वाकांक्षी अथवा सत्ताकांक्षी असा नसतो व ज्यांना फक्त समाजसेवा खऱ्या कळकळीने करायची असते, अशांनाही समाजसेवेची संधी व साधने पुरवणे हे लोककल्याण-राज्याच्या सरकारच्याच

कक्षेत असते. म्हणून खरीखुरी समाजसेवा करू इच्छिणारे कर्तबगार लोकही सरकारच्या आश्रयानेच राहू चाहतात. आणि विरोधी पक्षांना चांगली माणसेही मिळू शकत नाहीत. सारांश लाचखाऊ, खाबू, उन्मत्त पण चतुर व कर्तबगार अशी माणसे राज्यकर्त्या पक्षात असतातच. पण नीतिमान, आर्जवी, चतुर, कामसू व अनुभवी माणसेही राज्यकर्त्या पक्षातच असल्यामुळे वाईट माणसांनी सरकारपक्षाची लोकप्रियता फारशी घटत नाही. उलट विरोधी पक्षात सज्जन व निःस्वार्थी माणसे असली तरी लोकसेवेची संधी व अनुभव त्यांना मिळत नसून खरेखुरे लोकसेवेचे (अथवा कसलेच) उपयुक्त काम वेळ जायलाही त्यांना मिळत नसल्याने नुसत्या चकाट्या पिटून अथवा असंतुष्टपणे मनगटे चावून त्याना त्यांच्या बुद्धीची व भावनेची नासाडी करावी लागते.

मागासलेल्या देशात सरकारपासून फार अलगपणे मोठे धंदे करता येत नाहीत. म्हणून इभ्रतदार, ऐपतदार व धंद्यातली कर्तबगार माणसे राजकारणापासून अलिप्त राहिली तरी सरकारविरोधी पक्षास आश्रय देण्याला राजी राहात नाहीत. यामुळे विरोधी पक्षात निःस्वार्थी पण चिडलेले, असंतुष्ट, आकसबाज, शिवराळ, घमेंडखोर, अननुभवी, अर्थव्यवहारशून्य, अदूरदृष्टीचे, दरिद्री अशांचाच भरणा असतो. सारांश सारे विरोधी पक्ष लोककल्याणक्षेत्रात प्रवेश नसणारे व लोककल्याण क्षेत्राच्या बाहेर अस्पृश्याप्रमाणे वावरणारे असतात. कोणत्याही कारणाने लोक जेव्हा चिडलेले असतात तेव्हाच ते अशा पक्षांना आश्रय देतात, त्यांची वाहवा करतात; पण असंतोषाचे कारण संपले की केळ्याची साल अथवा चोखलेल्या उसाच्या चोयट्या जशा फेकून द्याव्या त्याप्रमाणे या विरोधी पक्षांना लोक फेकून देतात. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत हा अनुभव इतक्या खरमरीतपणे आला की त्याचा विसर पडू नये. विरोधी पक्षात कोणत्या प्रकारची माणसे येतात हे वर सांगितले आहे. शिवाय विरोधी पक्षांतले सगळेच लोक असे नसले तरी विरोधी पक्षांचे नेतृत्व अथवा प्रभुत्व या असंतुष्ट अदूरदृष्टीच्या शिवराळ घमेंडखोर माणसांकडेच जाते. वेगवेगळ्या विरोधी पक्षांत एकजूट न होण्याचे हे एक फार प्रबळ कारण असते.

वरील विवेचन भारतातील गेल्या पंधरा वर्षांतल्या अनुभवावर आधारले आहे गेल्या पंधरा वर्षांत संप, दंगली वगैरे करताना लोकांनी विरोधी पक्षांना नेतृत्व दिले. पण स्वयंपाकाचे अथवा घरबांधणीचे अथवा मारेकरीपणाचे कंत्राट द्यावे तसे लोकांनी या पुढाऱ्यांना संपांचे व दंगलीचे 'कंत्राट' दिले. संप संपला की कंत्राट संपले. विरोधी पक्षांनी हे आता ओळखले आहे. संपासारख्या 'तेजी'च्या प्रसंगी निधी व वर्गण्या भरपूर जमवून हे पुढारी आपली 'मंदी'च्या काळातली बेगमी करून ठेवतात. सरकारात शिरणे हे जसे हल्ली स्वार्थत्यागाचे कार्य राहिले नाही, त्याप्रमाणे कामगार-पुढारीपण हेही आता स्वार्थत्यागाचे कार्यक्षेत्र राहिलेले नाही. माझे हे लिहिणे काहीसे कठोर आहे; ते असत्य आहे असेही वाचकांना वाटेल. पण खास राजकीय महत्त्वाकांक्षेच्या कक्षेत येणाऱ्या दोन्ही बाजूंच्या पुढाऱ्यापुरतेच हे मर्यादित आहे. केवळ

समाजसेवा करू इच्छिणारी माणसे दोन्ही पक्षांत असतात. (तीही विरोधी पक्षात कमीच असतात.) पण त्यांचा मते मिळविण्याला उपयोग नसतो. राजकीय सत्ता मिळवू पाहणारी माणसे दोन्ही बाजूत कोणत्या प्रकारची असतात हे दाखविण्यापुरतेच हे चित्रण केले आहे व तेवढ्यापुरते ते बरोबर आहे. ऐतिहासिक कारणांनी एखाद्या पक्षाला एकदा सत्ता मिळाली की गुळाभोवती मुंगळे जमतात त्याप्रमाणे सत्ताधारी पक्षाभोवती सत्ताबाज, सेवाप्रेमी, सज्जन, सरळ, चतुर, लबाड, दूरदृष्टीचे, धनी, धनेच्छू असे सर्व लोक जमतात. त्यांचा उपयोग करून राज्यकर्ते लोकसेवेची सर्व क्षेत्रे व्यापून टाकतात व अत्यंत तरबेजपणे निवडणुका जिंकून सत्तेच्या व फायद्याच्या साऱ्या जागा, एखाद्या श्रीमंताने हातापायांच्या बोटात हिऱ्यामोत्यांच्या अंगठ्या, मनगटांत सलकड्या, पायात साखळ्या घालाव्या त्याप्रमाणे आपल्या अंगाशी लटकवून ठेवतात. या परिस्थितीत एकदा सत्ता मिळालेल्या पक्षाची सत्ता हिरावली जाणे अशक्य होय अशी जाणीव विरोधी पक्षांना होणे हे अपरिहार्यच आहे आणि अशी विरोधी पक्षांची झालेली भावना हेच भारतातली लोकशाही फसत चालल्याचे लक्षण होय हे विचारवंतांना मान्य होईल.

बरे, राज्यकर्त्या पक्षात अंतर्गत लोकशाही तरी कितीशी असते? पार्लमेंटचे व्यासपीठ हे मतपरिवर्तनप्रयत्नाचे व्यासपीठ होय अशी पार्लमेंटची व्याख्या एडमंड बर्कपासून अनेकांनी केली आहे. लोकशाहीप्रधान पक्षाचे सर्व निर्णय पक्षातील लोकशाहीने होतात असे मानले जाते. पण प्रत्यक्ष अनुभव असा आहे की पक्षाचा पुढारी व त्याच्या आवडीतले चार दोन लोक हेच पक्षाचा कारभार कुलमुखत्यारीने चालवितात. पुढारी हा मुख्यमंत्री होतो व आपले सहकारी मंत्री नेमतो. यामुळे या पुढाऱ्याच्या हाती एकदम इतकी पुष्कळ सत्ता येते की तो अरेराव बनत जाणे हे अपरिहार्य होते. पण त्याच्या अंगावर एवढी पुष्कळ जबाबदारी एकदम येते की त्याला ती पार पाडणे उरकत नाही व सत्ता टिकविण्याच्या घालमेली करताना राज्यकारभाराकडे अभ्यासपूर्वक लक्ष देण्याला त्याला वेळच राहात नाही. मुख्यमंत्र्यानेच वाचले पाहिजेत असे कागदपत्रही तो वाचू शकतच नाही व दुसरा कोणीतरी त्याच्यासाठी विचार करून त्याबाबत निर्णय ठरवितो ते या मुख्य मंत्र्याला 'मंजूर' म्हणावे लागतात. हल्ली कायद्यांची संख्या व त्यांचा किचकटपणा यांच्यात वाढ अफाट झाली आहे. पक्षांच्या बैठकीत कोणत्याही कायद्याची व योजनेची तपशीलवार छाननी होतच नाही. पण तेथे बहुमताचा जो निर्णय ठरतो तो मात्र तेथल्या अल्पमतावर बंधनकारक ठरतो.

यात लोकशाहीची विटंबना कशी होते हे बारकाईने पाहण्यासारखे आहे. समजा, एका विधानसभेत शंभर सभासद असून त्यातील साठ संख्येचा पक्ष सत्ताधारी आहे. या साठांच्या मतांचे जे निर्णय असतात ते अमलात येतात. विधानसभेत येणारे दोन्ही बाजूंचे सभासद विधानसभेत येताना तेथे चर्चेस येणाऱ्या विषयांवर मत काय द्यायचे हे आपापल्या पक्षाच्या सभेत पक्के ठरवूनच आलेले असतात. कारण

त्या त्या पक्षाच्या सभांत मतदानासंबंधाने ठाम आदेश पक्षसदस्यांना देण्यात येतात. यामुळे विधानसभेत कोणी कितीही विद्वत्तापूर्ण व वक्तृत्वपूर्ण भाषण केले तरी त्यामुळे मतपरिवर्तन होण्याचा प्रश्नच नसतो. एडमंड बर्कची पार्लमेंटची व्याख्या येथे मृत्यूच पावते. बरे, पक्षांच्या सभेत तरी कसे निर्णय ठरतात? तेथे कोणत्याही बिलाची सांगोपांग चर्चा होत नाही हे वर म्हटलेच आहे. अशा स्थितीत साठ सदस्यांच्या राज्यकर्त्या पक्षापैकी एकतीस सदस्यांनी ठरविलेल्या निर्णयास एकतिसांचा विरोध असला तरी तो निर्णय साऱ्या साठांवर सारखाच बंधनकारक असतो व अखेरीस विधानसभेत तोच निर्णय कायम ठरतो. याचा अर्थ, एकतिसांच्या निर्णयावर शंभरांचा शिक्का बसतो. एकतिसांतही ज्यांनी त्या विषयाचा विचार केलेला असतो, अशांची संख्या थोडीच असल्याने एकतिसांतहि बहुसंख्य होयबाच असतात.

विधानसभासदस्याकडून कोणत्याही विषयाचा अभ्यास किती होतो? हुकुमेहुकुम मतदान करायचे, हुकुमेहुकुम भाषणे करायची, यामुळे अभ्यास निरुपयोगीच ठरतो व सदस्यत्व टिकविण्याशी अभ्यासाचा काहीही संबंध नसून, भाषणे करण्याची संधी दहा टक्के लोकांनाही मिळत नसल्याने अभ्यासाची गरज कोणास वाटतच नाही. विधानसभांच्या कामकाजाची पद्धती अशी असते, की नव्वद टक्के सभासद राजधानीपासूनच्या दूर अंतरावरील गावातले आपापले धंदे सोडून शहरात आलेले असतात. तेथे त्यांना काहीही काम नसते. विधानसभेच्या बैठका चालू असता सभागृहाच्या बाहेर व आत चकाट्या पिटण्यात त्यांचे महिनेच्या महिने जातात व पूर्वी त्या त्या सदस्याने मिळविली असेल ती विद्याही विस्कटून जाते. ज्यांची विचारशक्ती व निर्णयशक्ती हे लोकशाहीचे बळ, त्यांच्या डोक्यात विचारशून्यता पसरणे हा विधानसभेच्या आजच्या कार्यपद्धतीचा अपरिहार्य परिणाम आहे. भारतासारख्या मागसलेल्या राष्ट्रात हा प्रकार फारच होतो.

ब्रिटन, अमेरिका वगैरे देशांत परिस्थिती येथल्यापेक्षा चांगली असते. ब्रिटनचा प्रदेश आटोपशीर असल्याने आपापल्या राहत्या ठिकाणाशी सभासद मोटार, टेलिफोन इत्यादी साधनांनी संबंध ठेवतो. लंडनमध्ये व वॉशिंग्टनमध्ये अनेक लोकप्रतिनिधींचे धंद्यांचे संबध असून कायदेमंडळास झुकांडी देऊनही ते आपली कामे करतात. त्यामुळे व्यवसायाची सवय राहते. कायदेमंडळातील कामकाजावर आपापल्या मतदारसंघात लोकप्रतिनिधींना तिकडे व्याख्याने द्यावी लागतात, लोकांच्या तक्रारींचा अभ्यास करावा लागतो. पुढारलेल्या उत्पादनपद्धतीमुळे लोकमत जागृत व संघटित असते. प्रत्येक मतदारसंघात त्या त्या पक्षाचे, अभ्यास केलेले कार्यकर्ते अभ्यासमंडळे, व्याख्याने, पुस्तके, पत्रके यांनी लोकशिक्षण करीत असतात व लोकांच्या तक्रारींची दाद घेतात. आपल्याकडे जमीनविषयक कायदे, बाजारकिमती, पंचवार्षिक योजना इत्यादि विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्यान देणारा मंत्री अथवा लोकप्रतिनिधी विरळाच असतो. लोकशाहीचे हे सारे विडंबन असून वस्तुस्थितीचे निर्लेप मनाने ज्यांनी अवलोकन केले असेल त्यांना वरील वर्णनात थोडीही अतिशयोक्ती नाही हे कबूल करावे लागेल.

लोकशाहीचा हा विपर्यास कोणी जाणूनबुजून केला असे असे नव्हे. मतदान व मतप्रदर्शन या बाबत पक्षशिस्तीच्या कल्पना फार कडक झाल्या व त्यांतून हा विपर्यास जन्मास आला. इंग्लंड अथवा अमेरिका या पुढारलेल्या लोकशाही देशात पक्षशिस्तीच्या कल्पना भारतातल्याइतक्या कडक नाहीत. अमेरिकेत एकेका पक्षातील निवडणुकी व मतभेद याविषयीची वाग्युद्धे जाहीर व्यासपीठावर व वृत्तपत्रात होत असून खुद्द अमेरिकन काँग्रेसमध्ये स्वतःच्या पक्षाविरुद्ध भूमिका त्या त्या पक्षातले सदस्य घेतात. यामुळे लोकांना प्रत्येक पक्षातील अंतर्गत मतभेदाची परिस्थिती माहीत होते. त्यामुळे प्रत्येक सभासदास स्वतंत्र विचार व अभ्यास करून स्वतःला प्रतिष्ठा मिळविण्याची संधी असते. इंग्लंडात अमेरिकेतल्यापेक्षा पक्षशिस्त अधिक कडक आहे. पण पक्षसदस्यांना पार्लमेंटाबाहेर स्वतःच्या धंद्यांचे व सार्वजनिक संघटनांचे कार्य इतके पुष्कळ असते की त्यांची स्वतंत्र विचारशक्ती व कर्तृत्वशक्ती वाढत राहते, वापरली जाते व पार्लमेंटात आपल्या पक्षाच्या भूमिकेविरुद्धही सदस्य भाषणे करतात; यामुळे पक्षपुढाऱ्यांना आपल्या पक्षातील जास्तीत जास्त लोकांना विचारात घेतल्यावाचून निर्णय ठरविता येत नाहीत.

भारतात पक्षशिस्तीचे राजकारण गांधींच्या नेतृत्वापासून सुरू झाले. संघटित व शिस्तबद्ध पक्ष असल्यावाचून ब्रिटिशांशी लढता येणार नाही म्हणून गांधींनी काँग्रेसपक्षात कठोर शिस्त आणली व त्यानेच स्वातंत्र्यलढा यशस्वी झाला. गेल्या अठरा वर्षांत काँग्रेसच्या या पक्षशिस्तीनेच अराजक टाळले आहे. कारण विरोधी पक्ष असंघटित व बेजबाबदार असता काँग्रेस जर अंतर्गत बेशिस्तीने मोडली असती तर या देशात अराजक माजलेच असते. पण आता ही पक्षशिस्त लोकशाहीचा विपर्यास करण्याला कारण होत आहे. काँग्रेसला विरोधीपक्षाची धास्ती नाही. यामुळे विशेष कठोर पक्षशिस्तीची गरजही कमी कमी होत आहे. इतर पक्षातल्या शिस्तीपेक्षा काँग्रेस पक्षातली शिस्त काहीशी सौम्य असून काँग्रेसमध्ये इतर पक्षातल्यापेक्षा अंतर्गत मतप्रदर्शनस्वातंत्र्य अधिकच आहे. पण कायदेमंडळात मतदानाचे स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय लोकशाहीचा हल्ली होत असलेला विपर्यास थांबणार नाही.

पुष्कळ घटनाशास्त्रज्ञांनी या पक्षशिस्तीच्या मुद्द्यावर काही मननीय विचार मांडले आहेत. काहींच्या मते अमेरिकेत पक्षसदस्यांना जरी पुष्कळसे स्वातंत्र्य असले तरी राष्ट्रपती सलग चार वर्षे पक्षाच्या पाठिंब्याशिवायही अधिकारावर राहू शकतो. यामुळे पक्षशिस्त ढिली असली तरी सरकार डळमळीत राहात नाही व अराजकाचा धोका उत्पन्न होत नाही. उलट ब्रिटनमध्ये अथवा भारतात पार्लमेंटातील बहुमताचा पाठिंबा रोजच्या कारभारास राज्यकर्त्यांना हवा असल्याने पक्षशिस्त कठोर नसल्यास रोजच्या रोज मंत्रिमंडळे कोसळतील. ब्रिटनमध्ये अशी ती कोसळत नाहीत याचे कारण ब्रिटिशांना लोकशाही संस्कृतीचे वळण लागले आहे.

काही घटनापंडित असेही म्हणतात की अमेरिकेत पक्षशिस्त ढिली असल्याने राष्ट्रपती चार वर्षेपर्यंत सर्व प्रकारच्या मतापासून व धाकापासून अलिप्तपणे व म्हणून

खंबीरपणे वागत असतो. उलट ब्रिटन अथवा भारत यासारख्या पार्लमेंटरी सत्तेच्या देशांत पंतप्रधान नेहमी पक्षशिस्तीच्या कैचीत आपल्या आसनावर बसलेला राहतो व त्याला भक्कम भूमिका घेऊन कोणतेच काम पक्षाच्या पाठिंब्याशिवाय करता येत नाही.

पण प्रत्यक्ष व्यवहार वरील दोनही मताहून फार वेगळ्या प्रकारे चालतो. अमेरिकन राष्ट्रपतीला पक्षशिस्तीची कैची नसते, कारण अमेरिकेत पक्षशिस्त ढिली असून असून राष्ट्रपती झालेला पुढारी चार वर्षेपर्यंत, काँग्रेसमध्ये पाठिंबा असो नसो, आपल्या पदावर राहू शकतो व दैनंदिन कारभारात तो मुखत्यार असतो. पण अनेक अदृश्य बंधनांनी तो बांधलेला असतो. अमेरिकन कायदेमंडळाची खरी शक्ती काँग्रेसच्या दोन्ही सभांच्या खुल्या अधिवेशनात नसते. तर दोन्ही सभागृहांच्या कमिट्यांत असते. या कमिट्या सर्व पक्षांच्या असतात आणि राज्यकारभारातील चालू प्रश्न, कायदेमंडळापुढे येणारी विधेयके, पैशांच्या मागण्या व खर्च, परराष्ट्रसंबंधातले प्रश्न, या प्रश्नांचा सामुदायिक अभ्यास करून त्यांची कसून तपासणी करतात. आणि अमेरिकेचा राज्यकारभार एवढ्या अवाढव्य प्रमाणावर चालतो की राष्ट्रपती व त्याचे सल्लागार यांना काँग्रेसच्या कमिट्यांनी विचारपूर्वक ठरविलेल्या निर्णयाना डावलून वागण्यात कधीच सुरक्षितता वाटत नाही. राष्ट्रपती त्यांना डावलून वागतो असा संशय आला तरी वृत्तपत्रात व काँग्रेसमध्ये फार मोठ्या प्रमाणावर ओरड होते. राष्ट्रपती महत्त्वाकांक्षी असल्यास अप्रियता पत्करण्यास सहजच नाराज असतो. याचा अर्थ, अमेरिकन राष्ट्रपती पक्षशिस्तीने बांधलेला नसला व चार वर्षेपर्यंत त्याच्या स्थानाला धोका नसला तरी तो कायदेमंडळांच्या कमिट्यांच्या संशोधनपूर्वक केलेल्या निर्णयाने बांधला जातो. असा आहे. म्हणून अमेरिकेत खरीखुरी सुबुद्ध लोकशाही आहे असे म्हणावे लागते.

ब्रिटनमध्ये याउलट परिस्थिती आहे. ब्रिटिश पार्लमेंटाच्या कमिट्यांना अमेरिकन काँग्रेसच्या कमिट्यांइतके महत्त्व नाही. सर्व प्रश्नांचा अभ्यास त्या कमिट्या करीतही नाहीत. हाउस ऑफ कॉमन्सच्या सहाशेहून अधिक सभासदांपैकी जवळजवळ साठ ते सत्तर सदस्य जे मंत्रिमंडळांत अथवा मंत्रिमंडळाशी संबद्ध असतात त्यांची निवड मुख्य प्रधान करीत असल्याने सर्व सभासद त्याच्याशी आर्जवाने वागतात. यामुळे निःस्पृह माणूस मुख्य मंत्र्याच्या वाऱ्यालाही राहू शकत नाही. खातेवाटणी व खातेबदल हीही मुख्यप्रधानाच्या इच्छेची बाब असते. स्वपक्षाचे बहुमत आपल्या पाठीशी ठेवण्याची काळजी त्याला नेहमी वाहावी लागते हे खरे. पण स्वपक्षाला व विरोधकांनाही तो धाकात ठेवू शकतो. पार्लमेंट बरखास्त करून नव्या निवडणुकी करणे हे मुख्यप्रधानाच्या हाती असते. आणि कोणत्याही पक्षाच्या, एकदा खूप कष्टाने व खर्चाने निवडून आलेल्या सदस्याला पुनः निवडणूक म्हटली की अंगावर काटा उभा राहतो. म्हणून अमेरिकेचा राष्ट्रपती हा अमेरिकन घटनेतला खराखुरा पंतप्रधान असतो, तर ब्रिटिश पंतप्रधान हा पार्लमेंटालाही धाब्यावर बसवू शकणारा राष्ट्रपती असतो अशी मते अनेक घटनापंडितांनी व्यक्त केली आहेत. याद‍ृष्टीने पाहता भारतातल्या तेरा घटकराज्यातले मुख्यमंत्री व

संघसरकारांतील पंतप्रधान हे ब्रिटिश पंतप्रधानाप्रमाणे अमर्याद अधिकारात नांदणारे सत्ताधीश आहेत असे मानावे लागते.

माझ्या मते हा सारा प्रकार खरोखर लोकशाहीचा विपर्यास असून, आजवरच्या रूढ कल्पनांप्रमाणे काँग्रेस पक्ष प्रामाणिकपणे वागत आला असल्याने त्या पक्षाचा यात जरी दोष नसला, तरी या परंपरागत लोकशाहीचा आता तत्त्वतःच फेरविचार झाला पाहिजे असे मला वाटते. नुसती टीका करून अथवा फेरविचार करा असे सांगून मी थांबत नाही; तर पार्लमेंटरी लोकशाहीची नवी रचना कशी असावी या संबंधाने माझ्या काही कल्पना सांगतो.

## नवी रचना कशी असावी

बहुमतवाल्या पक्षाचा पुढारी निवडला की तो पक्षपुढारी आपले सारे कार्यकारी मंडळ नेमतो आणि तोच पंतप्रधान होऊन सहकारी मंत्रीही नेमतो. ही पद्धती हा जुन्या राजशाहीचा अवशेष आहे. जुन्या काळचा राजा आपले मंत्री नेमत असे तसे हे घडत आहे. पण ज्या कारणाने मुख्य मंत्री निवडायचा त्याच कारणाने इतर मंत्रीही निवडायला नकोत काय? म्हणून आजच्या लोकशाहीत सुधारणा करताना पक्षाच्या कार्यकारी मंडळाचा प्रत्येक सदस्य व मुख्य मंत्र्याचा प्रत्येक सहकारी मंत्री पक्षाच्या बैठकीत बहुमताने निवडावा अशी माझी मुख्य सूचना आहे. पक्ष हा एका विचारसरणीने बांधलेला असतो. पण त्यात वैचारिक भिन्नतेचे गट असतात. एकाच पुढाऱ्याने सर्व सहकारी निवडले की भिन्न व स्वतंत्र विचाराची प्रवृत्ती नष्ट होते. काही लोक जीहुकुमवाले होतात तर उलट काही समंजसपणा सोडून हटवादी होतात. पक्षात विचारविनिमय होत नाही. मुख्यमंत्र्याचे ठिकाणी असहिष्णुता वाढते. लोकशाहीला हे सर्व मारक आहे. पण सर्व मंत्री व मुख्य मंत्री सबंध पक्षाने निवडायचे, ही एक सुधारणा झाली की एकटा कोणीही अरेराव न होता पक्षातील प्रादेशिक व वैचारिक गटांना आपोआप महत्त्व येईल.

याने गटबाजी वाढेल ही शंका खोटी आहे. एकजण अरेराव झाला की त्याच्याविरुद्ध गटबाजी वाढते. पण अनेक लहान लहान गटांना आपला पुढारी मंत्रिपदावर चढविता येतो असे वाटले तर स्पर्धेपेक्षा परस्पर सहकार्याची वृत्ती बळावेल. 'मला हवे ते सहकारी मी घेऊ शकणार असेन तरच मी मुख्यमंत्री होईन' म्हणणाऱ्याला पक्षपुढारी निवडूच नये अथवा 'मुख्यमंत्री होऊ नको' म्हणून सांगावे. पक्ष हा विशिष्ट तत्त्वांनी बांधलेला असतो. म्हणून पक्षातील कोणत्याही सदस्याशी मंत्रिमंडळात सहकार्य करीन असे पक्षपुढाऱ्याने म्हटले पाहिजे व तसे वागले पाहिजे. पक्षाला इष्ट वाटलेल्या सर्वांवर परस्परसहकार्याने वागण्याची सक्ती करून मंत्रिमंडळ बनविण्याचा अधिकार बहुमतवाल्या पक्षाला असला पाहिजे. पक्षीय लोकशाहीला हे अवश्य आहे. पूर्वी इंग्लंडच्या राजाचा पंतप्रधान निवडण्याचा अधिकार जसा काढून घेण्यात आला त्याप्रमाणे

पंतप्रधानाचा सहकारी मंत्री नेमण्याचा अधिकार काढून घेतला गेला पाहिजे. बहुमतवाल्या पक्षातली हुकुमशाही नाहीशी करून तेथे लोकशाही कशी स्थापावयाची याची योजना वर सांगितली. सरकारविरोधी पक्षांना आज लोककल्याणाची संधी व अनुभव मिळत नाही व लोकप्रिय होण्याची संधी मिळत नाही यामुळे ते हताश व बेफाम होत आहेत हा येथल्या लोकशाहीस मुख्य धोका असून तो दूर करण्याचा उपाय सांगण्यासाठी मी हा घटनात्मक बदल सुचवीत आहे. सत्ताधारी पक्षातच लोकशाही स्थापन होणे ही या कार्याची पहिली गरज आहे. आता राज्यकारभारात विरोधी पक्षांना गोवायचे कसे याचा मार्ग सुचवितो.

भारताच्या सर्व राज्यांत व संघसरकारात प्रत्येक मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली त्या त्या खात्याच्या कमिट्या असाव्या आणि त्या त्या कायदेमंडळातले सर्व सभासद त्या सर्व कमिट्यांत मिळून वाटावे. या कमिट्यांतील सदस्य पूर्णवेळ कामाचे अधिकारी मानले जावे व राज्यकारभारावर देखरेख करणें, त्याचा अभ्यास करणे, अमलबजावणीत भाग घेणे हे काम या कमिटीसदस्यांचे असावे. या कमिटीसदस्यांना पूर्णवेळ काम द्यायचे तर त्यांचे पगार वाढवावे लागतील. पण आजच्या कायदेमंडळांचे संपूर्ण रूप मला बदलावेसे वाटते. संघसरकारातील राज्यसभा व काही राज्यांतील विधानपरिषदा या निव्वळ अडगळी आहेत; त्या रद्दच कराव्या. त्यात जे काही नेमलेले सभासद असतात ते हवेच असल्यास लोकसभांत व विधानसभांत घेता येतील. विधानसभांच्या जागा कमी कराव्या. महाराष्ट्राएवढ्या राज्यास विधानसभेत शंभर सदस्य, व लोकसभेत महाराष्ट्राचे पंचवीस सदस्य असले म्हणजे पुरेत. मतदारसंघ यामुळे मोठे होतील व निवडणुका लढविणे अवघड होईल हे खरे. पण निवडणुका पक्षांनी लढवायच्या आहेत; व्यक्तीने नव्हे. आणि आजच्या लोकसभा-उमेदवाराची मदार निवडणुकीबाबत त्याच्या पक्षाच्या त्याच्या क्षेत्रातील विधानसभा-उमेदवारावर असते त्याप्रमाणे विधानसभा व लोकसभा यांचे मतदारसंघ आणखी मोठे झाल्यावर त्या दोघांचीही निवडणूक-जोखीम जिल्हापरिषदांच्या त्या त्या पक्षातील उमेदवारावर पडेल. विधानसभा व लोकसभा यांतील निम्मे समासद दर पाच वर्षांनी निवडावे व निवडून आलेला प्रत्येक सभासद दहा वर्षे आपल्या जागी राहावा, ही या बाबतची माझी शेवटची सूचना आहे.

या सर्व सूचनांचा संकलित परिणाम काय होईल ते थोड्या विचारान्ती सहज समजते. खुद्द सत्ताधारी पक्षात आज लोकशाही नाही. मंत्री होऊ इच्छिणाऱ्याने व मंत्री झालेल्याने इतर पक्षसदस्यांची फिकीर न करता मुख्यमंत्र्याची मर्जी संभाळून राहणे अवश्य असते. पण प्रत्येक मंत्री सबंध पक्षाने निवडायचा म्हटले म्हणजे मंत्री होऊ इच्छिणारा प्रत्येक जण सर्वच सभासदांशी आर्जवाने वागेल, दर प्रादेशिक गटाला आपसात एकजूट ठेवून इतरांशी स्नेहसंवर्धन करावे लागेल, आपापल्या विचाराचा प्रभाव पडावा यासाठी पक्षात वैचारिक आंदोलन होईल व एका प्रभावी व्यक्तीच्या

वर्चस्वापेक्षा विचारप्रभावाचे वर्चस्व वाढेल. सत्ताधारी पक्षात यामुळे प्रत्येक सदस्याला आणि विशिष्ट तत्त्वांना महत्त्व येऊन, प्रचंड बहुमत व त्याची सत्ता एका नेत्याच्या हाती; असल्यामुळे हल्ली बहुमतवाला पक्ष बेफिकीर, ढिसूळ, तत्त्वनिष्ठा व पक्षनिष्ठा पुसट होऊ लागलेला असा जो झाला आहे त्याचा संपूर्ण कायाकल्प होईल. विधानसभा व लोकसभा यांतील सदस्यसंख्या कमी होईल, त्यावेळी बहुमतवाला पक्षही आटोपशीर होईल, व त्यात अंतर्गत जिव्हाळा निर्माण होईल. कमिट्यांचा उपयोग फार महत्त्वाचा आहे. आज जवळजवळ नऊ-दशांश सदस्यांना माशा मारीत व असलेल्या बुद्धीचा कोळसा करीत दिवस कंठावे लागतात. कमिट्यांमध्ये सदस्य काम करू लागले की त्यांचा अभ्यास वाढेल व राज्यकारभाराचा अनुभव त्यांना मिळून, आज त्यांची पात्रता घटत आहे ती उद्या वाढत जाईल. विरोधी पक्षीय सदस्यांनाही कमिट्यांवर काम करावे लागणार असल्याने त्यांनाही राज्यकारभाराचा अनुभव मिळेल, लोकसेवेची संधी त्यांना मिळून त्यांना लोकसंपर्क वाढविता येईल व आजचा भकास असंतोष व हताशा यांपासून हे पक्ष मुक्त होतील.

या सर्वांचा परिणाम पक्षसंघटना ढिलावत जाण्यात होणार हे खरे आहे. पण आज सर्वच पक्ष आंतून किडत जाऊन अधःपाताकडे चालले आहेत, अशी ती परिस्थिती असणार नाही. प्रत्यक्ष व्यवहारातले आर्थिक व सामाजिक प्रश्न हाताळताना समाजवाद की भांडवलशाही या तात्त्विक मुद्यांचा काथ्याकूट करण्यापेक्षा व्यावहारिक दृष्टीनेच प्रश्न सोडविले जातील; पक्षापक्षांच्या सीमारेषा पुसल्या जातील.

अशावेळी पक्षीय राजकारणाचे काय होईल हे मला माहीत नाही. लोकशाहीची जाणीव व व्यवहार वाढत राहून आर्थिक सामाजिक विकास होत असता लोकशाहीच्या पक्षीय स्वरूपात जो फरक व्हायचा असेल तो होईल. त्याचे भाकित आज करण्याची जरुरी नाही. आजची भग्नाशा, निष्क्रियता, कुंठितता, चीड नाहीशी होऊन सामुदायिक निर्माणकर्तृत्वाचा आनंद सर्वांना मिळेल हा वरील सर्व सूचनांचा संकलित परिणाम जो मला संभाव्य दिसतो, तो मला फार लाभदायक वाटतो. लोकशाही हा राज्यप्रकार पुढारलेल्या देशातही फार जुना नाही. भारतासारख्या मागसलेल्या देशात त्याचा प्रयोग होत आहे तो अभूतपूर्व आहे. त्याची प्रगती होत असता त्याचे रूप बदलले तर तोही एक नवा प्रकार काय होतो ते कळून येईल.

मला हल्ली बहुपक्षीय राजकारण कालविसंगत वाटू लागले आहे. अमुक एक धंदा खाजगी मालकीत असावा की राष्ट्रीय मालकीत असावा हा प्रश्न आता तात्त्विक नसून व्यावहारिक झाला आहे. धंदा खाजगी ठेवला तरी त्यावर नियंत्रण येईलच. कापडधंदा खाजगी असला तरी कामगारांचे पगार व बोनस, कापडाची किंमत वगैरे ठरविण्याच्या निमित्ताने कापडगिरणीत सरकारचा हस्तक्षेप होईलच. उलट गिरणीमालकास यंत्रसामुग्री, कच्चामाल, भांडवलीकर्ज वगैरे गोष्टी सरकार नियंत्रित दराने देईल. खाजगी धंद्यांना अप्रतिबंध स्पर्धेपासून सोसावे लागणारे धोके कमी करणे व

उत्पादक कामगार व जनता यांच्या हिताच्या दृष्टीने मजुरीचे दर, मालाच्या किंमती नियंत्रित करणे हे आज लोककल्याण राज्यांचे कर्तव्य झाले आहे. आज संपूर्ण अनियंत्रित खाजगी मालकी व संपूर्ण अप्रतिबंध स्पर्धा लोकशाही राज्यात अस्तित्वातच नाही. शिवाय जे धंदे लोकहितासाठी सरकारने घेणे हे इष्ट व व्यवहार्य आहे ते सरकारने घ्यावे, ही भूमिकाही सर्वमान्य झाली आहे. जे लोकशाही समाजवाद मानतात त्यांना वरील दोन्ही प्रकार स्वीकार्य वाटतात. काँग्रेसने ही भूमिका पत्करली असून भारतात काँग्रेसपक्ष विरुद्ध इतर लोकशाही पक्ष हा विरोध कालांतराने वितळेलच. जातिनिष्ठ व कम्युनिस्ट हे पक्ष राहतीलच. पण लोकशाही समाजवादाच्या अंमलबजावणीने परिस्थिती सुधारत गेली व समता निर्माण होऊन बेकारी व आर्थिक असुरक्षितता यांचे उच्चाटन झाले म्हणजे जातिवादी व कम्युनिस्ट यांनाही लोकशाही समाजवाद आवडू लागेल असे मला वाटते. आपण एक गोष्ट विसरतो की दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या दीडशे वर्षांत पश्चिमी जगामध्ये धनोत्पादनसाधनावरील खाजगी मालकी ही धर्मतत्त्वासारखी पवित्र मानली जात असे. त्याविरुद्ध कम्युनिस्टांनी कम्युनिझम हे नवे धर्मतत्व उभे केले. त्यासाठी कम्युनिस्टांनी वर्गकलह व रक्तपात प्रतिपादिला आणि रशियातील कम्युनिस्ट क्रांतीनंतर पश्चिमी भांडवलदारांनी रशियन क्रांती शस्त्राघातानें चिरडण्याचा प्रयत्न केला. पण दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिमी राष्ट्रात पहिल्या व्याख्यानात म्हटल्याप्रमाणे केन्सिअन विचारसरणी प्रभावी झाली, भिन्नभिन्न परिस्थिती-प्रमाणे या विचारसरणीचे परिणाम निरनिराळे होऊ लागले. लोककल्याणासाठी सरकार खाजगी मालकीचे नियंत्रण करू शकेल हे तत्त्व पश्चिमी लोकशाही राष्ट्रांनी मान्य केले. आता सोशॅलिस्ट व ॲन्टिसोशॅलिस्ट ही पक्षनावे कालविसंगत वाटतात. याचा अर्थ आजच पक्ष मोडावेत असा नव्हे. पण उद्या ते राहिलेच पाहिजेत, हा आग्रहही नसावा.

## आदर्श पंचायती राज्य

भारतातील संसदीय लोकशाहीचा पाया पंचायतराज्य हा असला पाहिजे हे तत्त्व आता सर्वमान्य झाले आहे व ते तत्त्व योग्यही आहे. पण या पंचायतराज्याची घटना कशी असावी हा मुद्दा फार महत्त्वाचा असूनही त्या मुद्द्याकडे विद्वानांचे मुळीच लक्ष नाही हे आश्चर्य आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा प्रत्यक्ष निवडणुकीने निवडल्या जातात. त्या जिल्हा परिषदांत विधानसभा व लोकसभा यांतील सदस्यांना मुळीच स्थान नसून म्युनिसिपल शहरे जिल्हापरिषदेतून वगळली आहेत. यामुळे या जिल्हा परिषदा खास ग्रामीण झाल्या आहेत. भारतातील इतर सर्व राज्यांतल्या पंचायत राज्यांहून महाराष्ट्रातील पंचायतराज्याची ही घटना वेगळी आहे. महाराष्ट्राची ही घटना लोकशाहीच्या दृष्टीने श्रेष्ठ व अनुकरणीय असून इतर राज्यांनी महाराष्ट्राचा कित्ता गिरवावा असे माझे मत असल्याने या मुद्द्याचे थोडेसे स्पष्टीकरण करतो.

सहा वर्षांपूर्वी पंचायत राज्यासंबंधाने बळवंतराय मेहता समितीच्या शिफारशी प्रसिद्ध झाल्या. त्यात जिल्हा परिषदा निर्माण करून खेड्यापासून जिल्हापातळीपर्यंतचा कारभार जिल्हापरिषदांच्या हाती द्यावा अशी सूचना करण्यात आली होती. निरनिराळ्या राज्यांत जिल्हा लोकल बोर्डासारख्या काहीतरी प्रातिनिधिक संस्था असत व त्यांच्याकडे काही राज्यकारभार व विकासकामे सोपविली जात. पण राज्यसरकारचा हस्तक्षेप व समांतर नोकरशाही वरपासून खालपर्यंत चालत असल्याने जिल्हा लोकलबोर्डातल्या सभासदांना कधीही स्वायत्तता अथवा जबाबदारीची जाणीव वाटली नाही. १९५२ सालापासून जागोजाग सरकारी पैशाने सुरू केलेल्या समाजविकास प्रकल्पासंबंधाने जनतेला आपुलकी अथवा उत्साह कधीच वाटेना. ही परिस्थिती बदलण्याची उपाययोजना सुचविणे हे बळवंतराय मेहता समितीचे काम होते. त्या समितीने ग्रामापासून जिल्ह्यापर्यंतचा, पोलीस व इतर काही महत्त्वाच्या बाबी वगळून बाकीचा, कारभार जिल्हापरिषदेवर सोपवावा अशी शिफारस केली. पण जिल्हा-परिषदेची घटना मेहता समितीने खूप घोटाळ्याची सुचविली. त्या त्या जिल्ह्यांतील व तालुक्यातील विधानसभासदस्य व लोकसभासदस्य यांना त्या त्या तालुकापंचायत समितीवर व जिल्हा परिषदेवर आपोआप सभासदत्व मिळावे व बाकीचे जिल्हापरिषदेचे व पंचायत समित्यांचे सभासद ग्रामपंचायत प्रतिनिधींनी निवडावे अशा आशयाची ही शिफारस होती. यात लोकसभा व विधानसभा यांतील सभासदांना आपल्या मतदार-संघातील ग्रामीण जीवनाशी संपर्क साधता येण्याची तरतूद होती. वरवर पाहता ही योजना लोकशाही दृढमूल करण्यास उपयोगी पडेल असे दिसते. पण भारतात जिवंत लोकशाही निर्माण होण्याची तरतूद यात नाही. राज्य व राष्ट्रपातळीवर निवडून येणाऱ्या सभासदांचा ग्रामीण जीवनाशी संबंध सुटून ते अधांतरी होतात, तेव्हा त्यांच्या पायाखाली टेकू देणे हा यात हेतू आहे. अप्रत्यक्ष निवडणुकीने निवडून येणारी माणसे राज्यपातळीवरील पुढाऱ्यांच्या वशिल्याची निवडून आणता येतात असा अनुभव आहे. यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्या या विधानसभेतील पुढाऱ्यांना ग्रामीण भागात आधार देणाऱ्या खांबासारख्या उपयोगी पडाव्या असा मेहता समितीच्या शिफारशींचा हेतू दिसतो. महाराष्ट्रखेरीज इतर सर्व राज्यांत जवळजवळ याच शिफारशी कमीअधिक फरकाने स्वीकारल्या असून पुष्कळ ठिकाणी जिल्हापरिषदांना फक्त शिफारशीचे अधिकार आहेत. तालुका पंचायतींना थोडेसे बजावणीचे अधिकार तोडून दिलेले आहेत.

स्वतंत्र भारतात नवे नेतृत्व निर्माण होण्याच्या दृष्टीने ही योजना पुरेशी नाही. भारत हा ग्रामप्रधान व प्रचंड बहुसंख्य लहान शेतकऱ्यांचा देश आहे. पण बिधानसभा व लोकसभा यांचे मतदार संघ एवढे मोठे असतात की त्यात निवडून येणारे लोक सधन व्यापारी किंवा सधन शेतकरी असावे लागतात. अर्थात गरीब व लहान शेतकऱ्यांच्या प्रश्नापर्यंत ते लोक खाली उतरत नाहीत. हे लोक विधानसभा व लोकसभा

यात गेले की त्यांचा संबंध जनतेशी आणखी कमी होतो. ही उणीव या लोकांना जिल्हा परिषदांत जागा दिल्याने अथवा त्यांच्या पसंतीची माणसे अप्रत्यक्ष निवडणुकीने निवडून आणल्याने दूर होत नाही. उलट विधानसभा व लोकसभा यांतील बड्या सदस्यांचे नेतृत्व ग्रामीण भागातल्या सामान्य जनतेच्या डोक्यावर जात्याच्या तळीप्रमाणे लादले जाणे एवढाच याचा परिणाम होईल. आज भारताला गरज आहे ती ग्रामीण भागातील नेतृत्व त्या भूमीतून उगवून वर येण्याची आहे. या दृष्टीने महाराष्ट्राची घटना मला आदर्श वाटते.

महाराष्ट्रात जिल्हा परिषदेचे सदस्य प्रौढ स्त्रीपुरुष नागरिकांनी प्रत्यक्ष व गुप्त मतदानाने निवडायचे आहेत. एकेक मतदारसंघ एवढा आटोपशीर आहे की एक उमेदवार चारपाच मित्रांच्या सहकार्याने सायकलीवरून अथवा एस. टी. ने प्रवास करून मतदारांना भेटू शकतो, त्यांचे प्रश्न समजून घेऊन त्यांची सेवा करू शकतो, वरच्या वशिल्याची त्याची त्याला गरज राहात नाही, निव्वळ वशिल्याच्या माणसाला तो पराभूत करू शकतो. तो जिल्हापरिषदेत निवडून आला की आपल्या तालुक्याच्या पंचायतसमितीत तो आपोआप सदस्य होतो. पंचायत समितींत ग्रामपंचायत-सदस्यांनी निवडलेले सरपंच असतात. या पंचायत समितीस तिच्या कक्षेतील अमलबजावणीची कामे दिली जातात. जिल्ह्यातील पंचायत समित्यांचे अध्यक्ष व जिल्हापरिषदेत निवडून आलेले सभासद यांची जिल्हापरिषद बनते. तिचा अध्यक्ष तिनेच निवडलेला असतो. कलेक्टर, अथवा विधानसभासदस्य अथवा लोकसभासदस्य यांना या जिल्हा परिषदेत स्थान नसून पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांचेकडून त्यांच्या त्यांच्या कक्षेतील बजावणीची कामे करून घेणे व स्वताच्या कक्षेतील कामे करणे हे अधिकार जिल्हापरिषदांना आहेत. जिल्हापरिषदेत स्थायी समिती, अर्थसमिती, शेतीसमिती, सिंचन समिती, शिक्षण समिती, सहकार समिती, वर्क्स समिती अशा सात समित्या असून या समित्यांच्या सदस्यांना बजावणीची कामे पार पाडण्याचा अधिकार देण्यात आला आहे. विधानसभा व लोकसभा यांतील सदस्यांच्यापेक्षा यांची परिस्थिती फार अधिक चांगली झाली आहे. मतदारसंघ आटोपशीर; आपला रोजगारधंदा संभाळून जिल्ह्यातल्या जिल्ह्यात संचार करणे व लोकसेवा करणे यांना शक्य होते. यामुळे जिल्ह्यात यांचे नेतृत्व इतके दृढमूल होते की विधानसभा व लोकसभा यांतील सदस्यांचा वशिला यांना लागत नसून उलट विधानसभा व लोकसभा यांच्या उमेदवारांना आता जिल्हा परिषदेतील आपापल्या पक्षांच्या सदस्यांचा पाठिंबा स्वताच्या निवडणुकासाठी मिळवावा लागेल. जिल्हापरिषदांच्या कमिट्यांत कामाचा जो प्रत्यक्ष अनुभव या सदस्यांना येईल त्यामुळे विधानसभा व लोकसभा यांतील सदस्यांच्यापेक्षा जिल्ह्यापरिषदांतील सदस्यांची योग्यता खात्रीने अधिक मोठी ठरेल. जिल्हापरिषदांचे हे सदस्य जेव्हा पुढील काळात विधानसभांत व लोकसभेत जातील तेव्हा त्यांना कमिटी-कामाची सवय झालेली असल्याने ते विधानसभा व लोकसभा यात कमिट्या हव्या ही

मी वर केलेली सूचना आग्रहाने मांडतील. जिल्हापरिषदांतील कामांचे स्वरूपच असे आहे की त्यांतून पक्षतेढी मावळतीलच. पण लोकशाही न मावळता अधिक जिवंत होईल.

यातून जिवंत व कार्यक्षम नेतृत्व तयार होऊन वरवर कसे चढेल हे सांगतो. समजा, पंचवीसाव्या वर्षी जिल्हापरिषदेत निवडून आलेले सदस्य तेथे दोन वेळा निवडून येऊन व कामाचा अनुभव घेऊन पसतीसावे वर्षी विधानसभेत व पंचेचाळीसावे वर्षी लोकसभेत जातील. सर्वच असे वर जाणार नाहीत हे उघड आहे. पण राज्यकारभाराचा प्रत्यक्ष अनुभव मिळालेली ही माणसे आज सरकारी उत्पादनक्षेत्रात अनुभवी कारभारज्ञ म्हणून उपयोगी पडतील. राज्यघटनेच्या सर्व अंगांची तपशीलवार चर्चा करण्याचे मला येथे कारण नाही. या ग्रामप्रधान देशात गरीबांतून नेतृत्व उगवावे, नेत्यांना कामाचा व लोकसेवेचा अनुभव मिळावा व कोणालाही लोकसेवेच्या व लोकप्रियता मिळविण्याच्या संधीपासून दूर फेकले जात आहो असे न वाटता सर्वांना परस्पर सहकार्य व एकोपा साधण्याची संधी व सक्ती लाभावी अशा हेतूने वरपासून खालपर्यंत कशी रचना केली पाहिजे, या विषयीच्या सूचना मी वर संक्षेपाने दिग्दर्शनवजा केल्या आहेत. भारतातील संसदीय लोकशाहीचा फेरविचार या दिशेने त्वरित व्हावा असे मला वाटते.

कठोर पक्षनिष्ठा ही आजच्या लोकशाहीच्या ऱ्हासाचे कारण कसे आहे हे मी वर दाखविले आहे. ही कठोर पक्षनिष्ठा आजच एकाच पक्षाने ढिली करण्यात मात्र खास धोका आहे. आणि आज तरी इतर कोणत्याही पक्षापेक्षा काँग्रेसपक्षात शिस्त अधिक ढिली असून मतप्रदर्शनस्वातंत्र्य अगदी मोकाट आहे. म्हणून आजच काँग्रेसने आजची पक्षशिस्त आणखी ढिली करून टाकावी असे मी सुचवीत नाही. पण वर सांगितलेले त्यातले काही बदल हे काँग्रेसला आपल्यापुरतेही करता येतील. त्याने पक्षशिस्तीचे दुष्परिणाम कमी होऊन शिस्तीत ऐच्छिकता व डोळसपणा येईल.

## . २ .

संसदीय लोकशाहीच्या फेरविचाराविषयी दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा मला येथे मांडायचा आहे. या बाबतचा मूळ प्रश्न राजेंद्रबाबूंनी उपस्थित केला. तोपर्यंत कुणाच्याच लक्षात हा मुद्दा आला नव्हता. पण राजेंद्रबाबूंनी प्रश्न उत्पन्न केल्यानंतर मी त्याचा विचार करू लागलो. त्या संदर्भात भारतीय घटना पुन्हा वाचून पाहिली असता राजेंद्रबाबूंच्या प्रश्नाचा संपूर्ण उलगडा राज्यघटनेतच सापडतो असे मला आढळून आले. तो विषय येथे मी संक्षेपाने मांडणार आहे.

### भारतीय घटनेतला राष्ट्रपती

राष्ट्रपतिपदावरून निवृत्त होण्यापूर्वी राजेंद्रबाबूंनी कायदेपंडितांपुढे एक भाषण केले. भारतीय घटनेत ‘राष्ट्रपति श्रेष्ठ की पंतप्रधान श्रेष्ठ, या प्रश्नाचे तुम्ही

संशोधनपूर्वक उत्तर द्या' अशी विनंती राजेंद्रबाबूंनी त्या भाषणात कायदेपंडितांना केली. राजेंद्रबाबूंनी व्यक्त केलेल्या या शंकेने त्यावेळी देशातील सर्व पुढाऱ्यांना व घटनातज्ज्ञांना थोडासा धक्काच बसला. कारण राजेंद्रबाबू दहा वर्षे राष्ट्रपतिपदावर राहिले. त्यापूर्वी घटनासमितीचे ते अध्यक्ष होते. घटनेची सर्व चर्चा व निर्णय यात त्यांचा मोठा भाग होता. आंबेडकर, नेहरू, स्वतः राजेंद्रबाबू यांनी घटना परिषदेत केलेल्या भाषणात राष्ट्रपती हा ब्रिटिश राजासारखा नामधारीच राहून मंत्रिमंडळ हेच वास्तवतः राज्यकर्ते असेल अशी मते मांडली होती. मग राजेंद्रबाबूंनीच ही शंका व्यक्त करावी कशी ? जर पंतप्रधान श्रेष्ठ ही भूमिका राजेंद्रबाबूंना आता पसंत नसेल तर हे त्यांचे बदललेले मत आहे काय ? त्यासाठी कदाचित घटना बदलावीही लागेल काय ? इत्यादी प्रश्न राजेंद्रबाबूंच्या या शंकेतून निर्माण होत होते.

राजेंद्रबाबूंच्या मनात थोडी खळबळ माजली आहे ही गोष्ट काही लोकांना आधीपासून माहीत होती. हिंदुकोडबिल, तिबेट, बेरुबारी, महाराष्ट्र वगैरे सर्व विषयांवर नेहरू व राजेंद्रप्रसाद यांचेमध्ये मतभेद असून परराष्ट्रधोरणातील सर्व गोष्टींबाबत नेहरू सहकाऱ्यांशी व राष्ट्रपतींशीही मोकळेपणे बोलत नाहीत असे ऐकू येई. यामुळे राजेंद्रबाबूंनी शंका काढली त्याचे मला आश्चर्य वाटले नाही. पण सहकाऱ्यांपुढे हा विषय न मांडता राजेंद्रबाबूंनी एकदम कायदेपंडितांना हा प्रश्न विचारला त्याचे मला आश्चर्य वाटले. राजेंद्रबाबूंनीच जी घटना घडविली व तिचा अर्थ सांगितला, त्या घटनेचा आता वेगळा अर्थ कायदेपंडित तरी कसा सांगणार ? त्यापेक्षा घटनेत बदल हवा असेच राजेंद्रबाबू का बोलले नाहीत, अशी शंका मला आली.

पुढे एकदोन दिवस गेल्यानंतर नेहरूंनी राजेंद्रबाबूंची शंकाच चूक आहे व भारतीय घटनेत पंतप्रधान श्रेष्ठ आहे ही ब्रिटनची भूमिका स्वीकारून तसा प्रघात आम्ही पाडला आहेत असे मत मांडले. हे मत वस्तुस्थितीवरून बिनतोड दिसत होते. पूर्वी आंबेडकर व राजेंद्रबाबू यांनी व इतर अनेकांनी हीच भूमिका मांडली असल्याने राजेंद्रबाबूंची शंका फक्त त्रस्त मनातून उद्भवली आहे, तिला एरवी आधार नाही, असे वाटून तो प्रश्न मिटला असे मी धरून चाललो. पण पुढे मुंबई हायकोर्टाच्या शताब्दिसमारंभात त्यावेळचे सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधीश श्री. सिन्हा यांनी एक महत्त्वाचे भाषण करून या प्रश्नाला पुन्हा नवी वाचा फोडली. न्यायमूर्ती सिन्हांनी नेहरू, राजेंद्रप्रसाद अथवा त्यांनी उपस्थित केलेला वाद याचा स्पष्ट उल्लेख केला नाही. पण त्यांनी नेहरूंच्या वर उल्लेखिलेल्या निवेदनावर आक्षेप घेतला असल्याचे घटनाशास्त्राच्या अभ्यासकांच्या लक्षात आल्यावाचून राहिले नाही. न्यायमूर्ती सिन्हा म्हणाले. "भारतीय घटना व ब्रिटिश घटना यांत महत्त्वाचा फरक आहे. इंग्लंडची घटना ही लिहून काढून मंजूर केलेली नाही. तेथे प्रघात हीच राज्यघटना होय असे म्हणता येते. पण भारतीय घटना ही लिहून काढून घटनासमितीने मंजूर केली व संसदेने संमत केली आहे. तिचा अर्थ करण्याचा अधिकार सुप्रीम कोर्टाला

आहे. अर्थात् लिहिलेल्या घटनेला मंजूर नसणारा कोणताही प्रघात कायदेशीर मानला जाणार नाही." (सारांश).

न्यायमूर्ती सिन्हांचे हे भाषण नेहरूंच्या निवेदनावर आघात आहे हे उघड होते. तेव्हा मी राज्यघटना पुन्हा वाचायला घेतली. वृत्तपत्रव्यवसायाच्या गरजेप्रमाणे मधून मधून मी घटना वाचीत असे. पण आता या नव्या शंकेने वाचण्यात नावीन्य होते. राष्ट्रपतीच्या अधिकाराचे जे ५३ (१) पोटकलम आहे त्यांतच जस्टिस सिन्हा नेमके काय सुचवीत आहेत हे समजून आले.

"भारतीय संघराज्याची कार्यकारी सत्ता ही राष्ट्रपतीच्या हाती असून ती तो, या घटनेअनुसार, स्वतः प्रत्यक्षपणे अथवा आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांमार्फत अमलात आणील." असे शब्द त्या पोटकलमात आहेत. अर्थात् पंतप्रधानाच्या हाती सत्ता सोपवून आपण फक्त नामधारी राहायचे की स्वतः सत्ता धारण करून पंतप्रधानाच्या हातून ती स्वतःच्या धोरणाप्रमाणे चालवायची हे ठरविण्याचा अधिकार राष्ट्रपतीचा असून एखाद्या राष्ट्रपतीने असा अधिकार गाजविण्याचे ठरविल्यास "आम्ही त्याविरुद्ध प्रघात पाडला आहे" असे पंतप्रधान म्हणू शकणार नाही हे ५३ (१) पोटकलमावरून स्पष्ट होते.

भारतीय राज्यघटनेवर श्री. बसू यांचा जो प्रख्यात ग्रंथ आहे त्यात राष्ट्रपतीच्या कोणत्याही अधिकारास पंतप्रधान हरकत घेऊ शकत नाही, राष्ट्रपतीचे अधिकार अमर्याद आहेत, असे म्हटले असून घटनेचे नियम पोटनियम करण्याचा अधिकारहि राष्ट्रपतीचाच आहे असे बसू यांनी म्हटले आहे. बसूंनी इतर कलमांची चर्चा करताना हा मुद्दा छाननी करण्यासाठी घेतला नाही. पण अशी छाननी केल्यास राज्यघटनेत हेतुपूर्वक राष्ट्रपतीला वैकल्पिक अधिकार दिला आहे, विशिष्ट परिस्थितीत त्याला तो पाळता यावा व त्याचा काही उपयोग व्हावा इत्यादी हे सर्व अभिप्रेत असले पाहिजे असे मला वाटते. राज्यघटनेची कलमे ७४ व ७५ यात मंत्रिमंडळाची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला दिलेला आहे. पंतप्रधान राष्ट्रपतीने नेमायचा, त्याच्या सल्ल्याने इतर मंत्री नेमायचे आणि मंत्रिमंडळ संयुक्तपणे लोकसभेला जबाबदार असले पाहिजे अशी तेथे तरतूद आहे. पण कोणाही मंत्र्याला आपल्या खुषीखातर राष्ट्रपती काढून टाकू शकतो अशीही तरतूद तेथे आहे.

कलम १११ प्रमाणे वित्तविषयक विधेयक संसदेने मान्य केले तरी राष्ट्रपतीला जर ते पसंत नसेल तर संसदेकडे परत न पाठविता राष्ट्रपती ते नाकारू शकतो असा १११ कलमाचा अर्थ मी तरी केला आहे. वित्तविषयक विधेयक राष्ट्रपतीच्या संमतीनेच संसदेपुढे येते, मग नंतर पुन्हा त्याच्या संमतीचा प्रश्न येतोच कुठे अशी शंका येथे येते. पण वित्तविषयक विधेयक राष्ट्रपतीच्या संमतीने संसदेपुढे मांडल्यानंतर परिस्थिती जर बदलली व राष्ट्रपतीला विधेयकात आता बदल हवा असे वाटूनही जर मंत्रिमंडळाने राष्ट्रपतीचे ऐकले नाही, तर राष्ट्रपती त्या विधेयकास संमती नाकारू शकतो असा मी

१११ कलमाचा अर्थ लावला आहे.

या सर्व चर्चेत कलम ६१ हे निर्णायक आहे. एखाद्या राष्ट्रपतीचे धोरण मंत्रिमंडळाला पसंत पडले नाही तर संसदेच्या प्रत्येक सभागृहातील, एकूण सदस्यांच्या दोन तृतीयांशाहून कमी नाही इतक्या मतांनी राष्ट्रपतीस पदच्युत करता येते. म्हणजे, समजा, मंत्रिमंडळास साठ टक्के सभासदांचा पाठिंबा असला, व अशा स्थितीत राष्ट्रपतीने स्वतःच्या अधिकारात राज्य चालवायचे ठरविले, तर मंत्रिमंडळाला, आज फ्रान्समध्ये राष्ट्रपतीच्या आदेशाप्रमाणे मंत्र्यांना राज्यकारभार चालवावा लागतो तसा, भारतातही चालवावा लागेल. उलट मंत्रिमंडळाला राष्ट्रपतीला नामधारी ठरवून राज्यकारभार करायचा असेल तर त्याला दोनतृतीयांश बहुमताचा पाठिंबा प्रत्येक सभागृहात आपल्या पाठीशी ठेवावा लागेल.

माझ्या मते राज्यघटनेत जाणूनबुजून ही तरतूद केलेली असावी. बहुमतवाल्यापक्षाचे मंत्रिमंडळ होईल हे ठीक आहे. पण अगदी एकावन्न टक्के बहुमत असलेल्या पक्षाने काही महत्त्वाच्या मुद्द्यावर अल्पसंख्यावर अरेरावी करायचे ठरविले तर ते अल्पसंख्य विरोधी पक्ष राष्ट्रपतीकडे दाद मागू शकतील व राष्ट्रपती आपली हुकुमत गाजवू शकेल या हेतूने ही तरतूद केली असावी.

राज्यघटनेत राष्ट्रपती नाममात्रच कल्पिला नसावा असे राज्यघटनेतील इतर तरतुदींवरूनही वाटते. पंतप्रधान हा कोण असतो? लोकसभेच्या पाचशे मतदार संघातील एकाचा तो प्रतिनिधी असतो. पक्षातील लटपटी-खटपटींनी तो पंतप्रधानपद पटकावू शकेल. तो काही साऱ्या राष्ट्राला संमत अथवा माहीत तरी असेलच असे नाही. पण राष्ट्रपती हा चौदा राज्यांतील विधानसभा, लोकसभा व राज्यसभा यांतील सुमारे चार हजार सदस्यांनी, म्हणजे साऱ्या भारतातील जनतेच्या प्रतिनिधींनी, निवडलेला असतो. तो साऱ्या राष्ट्राला माहीत असणारा राष्ट्रपुरुष असावा लागेल. घटनेने अशा प्रकारे अखिल राष्ट्रीय पातळीवर निवडायचा म्हणून योजलेला राष्ट्रपती हा फक्त लोकसभेतील बहुमताच्या हातचे बाहुले बनला पाहिजे, लोकसभेच्या एका मतदारसंघातून निवडून आलेल्या पंतप्रधानाच्या हातचे खेळणे झाला पाहिजे अशी राज्यघटनेची अपेक्षा असणारच नाही. इंग्लंडचा आनुवंशिक राजा नामधारी व्हावा हे ठीक आहे. पण सार्वराष्ट्रीय पातळीवर चार हजार लोकप्रतिनिधींनी निवडला गेलेला महापुरुष हा नामधारीच असला पाहिजे असे घटनाकारांनी अपेक्षिले नसावे.

ही योजना मी समजतो अशी असेल तर माझ्या मते फार उपयुक्त आहे. एकच पक्ष प्रचंड बहुसंख्य व बाकीचे अगदी लहान लहान ही आजची परिस्थिती फार दीर्घकाल टिकणारी नाही. अनेक लहान लहान पक्षांची संसद बनेल. निरनिराळ्या राज्यात निरनिराळे पक्ष अधिकारावर राहतील. अशा परिस्थितीत हुकुमशाही व अराजक नको असेल तर बहुसंख्य लोकांना वाटेल तर सर्व देशभर लोकप्रिय असलेला एखादा महापुरुष राष्ट्रपतिपदावर येईल व अनेक पक्षांच्या मंत्रिमंडळास हाताशी धरून

राज्य करू शकेल अशी तरतूद आजच्या घटनेतच आहे असे मला वाटते.

फ्रान्समध्ये बजबजपुरी माजण्याचा धोका उद्भवल्यावर चार्ल्स द गॉल यांनी घटना बदलून जी तरतूद केली ती भारतीय घटनेत आरंभासून अधिक चांगल्या प्रकारे तयार करून ठेवली आहे असे मला वाटते.

.३.

राज्यघटनेसंबंधाने एक शेवटचा मुद्दा संक्षेपाने सांगून आवरते घेतो. कायदेमंडळाने अमुक एका कायद्याचा भंग केला आहे असा आरोप करून कायदेमंडळावर कोणी खटला केल्यास तो खटला दाखल करून घेऊन चालविण्याचा अथवा कायदेमंडळाने नागरिक हक्काचा भंग केला आहे की नाही याविषयी पुरावा मागून चौकशी करण्याचा अधिकार न्यायासनाला नाही असे जे मत भारतातील अनेक कायदेमंडळांनी अलीकडे व्यक्त केले आहे ते लोकशाहीला घातक आहे. यामुळे अनेक कायदेमंडळांमध्ये यादवीही माजेल व एखाद्या राज्यांत जुलमी मताचा पक्ष अधिकारावर आल्यास तो लोकांचा छळही करील. तेव्हा नागरिकांना नागरिक हक्काबाबत न्यायकोर्टांचे संरक्षण मिळणे हा जो लोकशाहीच्या पहिल्या क्रमाचा हक्क तो निर्विवाद करण्यासाठी, घटना कायद्यात दुरुस्ती होणे जरूर आहे. भारतीय राज्यघटनेसंबंधाने अगदी नवीन असा हा मुद्दा अलीकडेच उपस्थित झाला असल्याने त्याची पार्श्वभूमी येथे संक्षेपाने मांडतो.

## कायदेमंडळ न्यायासन

भारतातील संसदीय लोकशाहीच्या दृष्टीने हा मुद्दा मूलग्राही आहे. भारतातील राज्यघटना लिहून काढलेल्या स्वरूपात मंजूर केली आहे व तिच्या अर्थासंबंधाने वाद उपस्थित झाल्यास सुप्रीम कोर्टाचा निर्णय मान्य करावा असे त्या घटनेतच म्हटले आहे. याला एकच अपवाद आहे. संसद व विधानमंडळे यांच्या अधिकारातल्या व्यवहाराला सुप्रीम कोर्टाचा निर्णय बंधनकारक नाही असे राज्यघटनेत म्हटले आहे (कलम २१२). पण संसदेने अथवा विधानमंडळाने आपल्या अधिकारात वागताना जर एकाद्याच्या नागरिक हक्कावर आक्रमण केले, म्हणजेच आपल्या अधिकाराचे अतिक्रमण केले असे एखाद्या नागरिकास वाटले तर सुप्रीम कोर्टाकडे अथवा इतर कोर्टाकडे त्याविरुद्ध दावा करून कायदेमंडळाने अधिकारातिक्रम केला आहे की काय याविषयी निर्णय मिळवता येतो की नाही, असा वाद अलीकडे उत्पन्न झाला असून संसदेतील व इतर अनेक विधानमंडळातील बऱ्याच सभासदांना, संसदेविरुद्ध अथवा विधानमंडळाविरुद्ध दावा दाखल करून घेण्याचाही अधिकार सुप्रीम कोर्टाला नाही असे वाटते. या वादासंबंधाने राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी राज्यघटनेच्या १४३ (१) कलमाखाली सुप्रीम कोर्टाचे मत विचारले व सुप्रीम कोर्टाने सहा विरुद्ध एक एवढ्या बहुमताने हायकोर्ट व सुप्रीमकोर्ट यांना असा दावा दाखल करून घेता येतो व निर्णयही

देता येतो असे मत दिले आहे. पण १४३ (१) अन्वये दिलेला सुप्रीम कोर्टाचा हा निर्णय संसदेतल्या व भारतातील बहुतेक विधानमंडळातल्या बहुसंख्य सभासदांना मान्य नाही. यामुळे नागरिक स्वातंत्र्यावर कोणीही केलेले आक्रमण न्यायासनामार्फत दूर करून घेता येते हा जो लोकशाहीचा मूलभूत हक्क भारतीय राज्यघटनेने दिला आहे तो खंडित झाला की काय अशी शंका आली आहे. हा वाद ज्या घटनेतून निर्माण झाली ती घटना अशी :

केशवसिंग नावाच्या एका नागरिकाने एक पत्रक प्रसिद्ध करून उत्तरप्रदेश विधानसभेच्या एका सभासदाची बदनामी केली, असे उत्तरप्रदेश विधानसभेला वाटले व त्यासाठी केशवसिंगाला ताकीद द्यावी असा ठराव उत्तर प्रदेश विधानसभेने मंजूर केला. ही ताकीद स्वीकारण्यासाठी केशवसिंगाने उत्तरप्रदेश विधानसभेपुढे येण्याचे नाकारले. तेव्हा उत्तरप्रदेश विधानसभेच्या मार्शलमार्फत केशवसिंगाला पकडून १४ मार्च १९६४ रोजी उत्तरप्रदेश विधानसभेपुढे उभे करण्यात आले. केशवसिंगाने उत्तर देण्याचे नाकारले आणि विधानसभेकडे व सभापतीकडे पाठ करून तो उभा राहिला. विधानसभेने त्याला ताकीद देऊन सोडले. त्यावर ही ताकीद आपण मानणार नाही असे केशवसिंगाने विधानसभापतीस पत्र लिहून कळविले. तेव्हा या पत्राने विधानसभेचा अपमान झाला आहे, म्हणून हे पत्र पाठविल्याच्या गुन्ह्यादाखल केशवसिंगाला सात दिवसांची शिक्षा द्यावी असे विधानसभेने एका ठरावाने जाहीर केले. त्यावरून केशवसिंगास अटक झाली. १९ मार्च रोजी केशवसिंगातर्फे सॉलोमन नामक वकिलांनी लखनौ बेंच हायकोर्टाकडे अर्ज केला. केशवसिंगाला बेकायदा अटक झाली असून त्याच्या नागरिकस्वातंत्र्यावर घाला पडला आहे, त्याची सुटका व्हावी, त्याच्या नागरिक स्वातंत्र्याचे रक्षण व्हावे असे त्या अर्जात म्हटले होते. सदर लखनौ बेंचाच्या जजांनीं अर्ज दाखल करून घेऊन केशवसिंगास जामिनावर सोडावे व विधानसभेने कोर्टापुढे येऊन आपल्या वर्तनाचा जाब द्यावा असा हुकूम काढला. तेव्हा सदर जज्ज व सॉलोमन यांनी विधानसभेचा अपमान केला म्हणून त्यांना अटक करून विधानसभेपुढे आणावे असा ठराव उत्तरप्रदेश विधानसभेने केला.त्यावर सदर जजांनी अलाहाबाद हायकोर्टाकडे अपील केले. अलाहाबाद हायकोर्टाने हे पकडवॉरंट तहकूब केले. तेव्हा राष्ट्रपतीने या वादाबद्दल २६ मार्च रोजी सुप्रीम कोर्टाकडे वर म्हटल्याप्रमाणे १४३ (१) कलमाखाली मतप्रदर्शनाची मागणी केली. सुप्रीम कोर्टापुढे हा दावा काही दिवस चालून सुप्रीम कोर्टाने दोन्ही बाजू ऐकल्या. उत्तर प्रदेश विधानसभेप्रमाणे इतरही काही विधानमंडळांनी आपापल्या कैफीयती सुप्रीम कोर्टास सादर केल्या. या सर्वांनी आपली बाजू घटनेच्या १९४ (३) वर आधारली. १९४ (३)मध्ये अशी तरतूद आहे की "विधानमंडळाच्या प्रत्येक सभेने आपापले अधिकार व हक्क आपण ठरवावे व तसे ते ठरविले जाईपर्यंत ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्सचे, भारतीय राज्यघटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली त्या वेळेपर्यंतचे हक्क व अधिकार विधानमंडळांच्या त्या त्या सभागृहाने वापरावे."

याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्सविरुद्ध ब्रिटनमधील न्यायालयाचा अधिकार काहीही चालत नाही. पण सुप्रीम कोर्टाने असे मत दिले की ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्सचे अधिकार तेथे राजा व पार्लमेंट यांच्या कलहातून निर्माण झाले आहेत. तो कलहाचा इतिहास या देशात घडलेला नसून येथील कायदेमंडळांना न्यायासनाच्या अधिकारापासून मुक्त असा अधिकार देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. भारताची राज्यघटना लिहून काढून मंजूर केलेली आहे, तीत नागरिक हक्क आखून दिलेले आहेत व ह्या नागरिकहक्कावर कोणीही आक्रमण केले आहे की काय हे ठरविणे आणि आक्रमण झाले असल्यास त्याचे निराकरण करणे हा अधिकार सुप्रीम कोर्टाला राज्यघटनेने दिला आहे. अर्थात कायदेमंडळाने एखाद्याच्या नागरिक हक्कावर आक्रमण केले आहे ते दूर व्हावे अशी फिर्याद कोणी केल्यास ती स्वीकारून त्याबाबतचा पुरावा बोलावणे, तो तपासणे व त्यासंबंधीचा निर्णय देणे हा अधिकार न्यायासनाला आहे. म्हणून ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्सचे हक्क व अधिकार यांचा वापर करताना कायदेमंडळाने, भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत' (सब्जेक्ट टु दि प्रोव्हिजन्स ऑफ दिस कॉन्स्टिट्यूशन) तो वापर करावा असा राज्यघटनेच्या १९४ (३) या कलमाचा अर्थ करावा असे मत सुप्रीम कोर्टाने (सहा जज्ज विरुद्ध एक जज्ज) राष्ट्रपतींना कळविले. मुख्य न्यायाधीश गजेंद्रगडकर हे बहुमतात असून श्री. सरकार यानी विरुद्ध मत दिले. "कायदेमंडळांनी आपले हक्क व अधिकार स्वतः ठरवीपर्यंत हाउस ऑफ कॉमन्सचे २६ जानेवारी १९५० पर्यंतचे हक्क व अधिकार वापरावे व अर्थात कायदेमंडळाविरुद्धचा दावा न्यायकोर्टांना स्वीकारता येणार नाही" असे मत न्या. सरकार यांनी दिले आहे. राज्यघटना कलम १४३ (१) खाली सुप्रीम कोर्टाने केलेले मतप्रदर्शन सरकारवर व जनतेवर बंधनकारक नाही. यामुळे या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा परिणाम तूर्त तरी काहीही नाही. सामान्यतः सत्ताधारी कॉंग्रेस पक्ष न्या. सरकार यांच्या मताचा असून बहुतेक विरोधी पक्ष व छगलांसारखे कायदेपंडित गजेंद्रगडकरांच्या मताचे आहेत. संसदेमार्फत अथवा सरकारमार्फत निर्णायक पाऊल टाकायचे नाही असे तूर्त सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाने ठरविलेले दिसते. पण लखनौ हायकोर्टाने केशवसिंगांचा दावा पुन्हा दाखल करून घेतला व केशवसिंगाबाबत उत्तरप्रदेश विधानसभेने आपल्या अधिकारात वर्तन केले असल्याने हायकोर्टाने त्यात हात घालण्याची जरुरी नाही असा निर्णय देऊन केशवसिंगाचा दावा काढून टाकला. येथेच हे प्रकरण तूर्त मिटले आहे.

पण या प्रकरणी गजेंद्रगडकर यांनी मांडलेली भूमिकाच समर्थनीय आहे असे मला वाटते. राज्यघटना कलम १९४ (३) चा अर्थ करतांना 'भारतीय राज्यघटनेतील तरतुदींच्या चौकटीत' (सबजेक्ट टु दि प्रोव्हिजन्स ऑफ इंडिअन कॉन्स्टिटयूशन) हे शब्द अध्याहृत समजावे हे न्या. गजेंद्रगडकरांचे मत रास्त आहे. पण आता घटनादुरुस्ती करून हे शब्द १९४ (३) कलमात घालणे हे अधिक चांगले. गजेंद्र-

गडकरांचे मत खरे मानण्याची कारणे पुढीलप्रमाणे : (१) भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच्या ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्सचे अधिकार व हक्क स्वतंत्र भारताच्या कायदेमंडळांनी स्वतःवर बंधनकारक मानावे ही गोष्ट स्वातंत्र्यालाच विसंगत आहे. पण भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत बसतील असे ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्सचे हक्क व अधिकार भारतीय कायदेमंडळांनी वापरण्यात मात्र स्वातंत्र्याशी विसंगत असे काहीही नाही. (२) भारतीय कायदेमंडळांनी आपले हक्क व अधिकार ठरवीपर्यंतच ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्सचे हक्क व अधिकार वापरावे असे घटना क. १९४(३) मध्ये म्हटले आहे. असे हक्क व अधिकार लवकर ठरविले जातील अशी घटनेची अपेक्षा आहे व ते ठरविताना 'भारतीय घटनेतील तरतुदीच्या चौकटीतच' ते हक्क व अधिकार ठरवावे लागतील हे उघड आहे. (३) भारतात संघसरकारची संसद ही या देशाचे मुख्य कायदेमंडळ व राज्यांतील कायदेमंडळे ही संसदेच्या अंकित आहेत. या सर्व कायदेमंडळांना नागरिक स्वातंत्र्यावर आघात करण्याचा सारखाच अधिकार असून हायकोर्ट व सुप्रीम कोर्ट यांना त्याची दखल घेता येणार नाही असा राज्यघटनेचा अर्थ होणे, हे त्या घटनेशी विसंगत होय. (४) देशातील एक विधान सभागृह दुसऱ्या एखाद्या विधानसभागृहाने आपला अपमान केला असे मानून त्यावर पकडवॉरंट काढील व त्या दुसऱ्या सभागृहास न्यायकोर्टात दाद मागता न आली तर देशात यादवीही माजेल. असा पोकळपणा राज्यघटनेत ठेवलेला आहे असे मानता येणार नाही. (५) समजा, एखाद्या कायदेमंडळाचे कामकाज चालू असता सत्ताधारी पक्षाच्या प्रेरणेने विरोधी पक्षातील एखाद्या सदस्याचा खून झाला तर कायदेमंडळाच्या कामकाजातली व तिच्या अधिकारातली ही बाब असून न्यायासनाच्या दखलक्षेतली नाही असे मानता येईल काय ? (६) इंग्लंडची राज्यघटना अजून अलिखित आहे व प्रघाताने ठरते. इतर सर्व लोकशाही राष्ट्रांच्या घटना लिहून मंजूर झालेल्या आहेत. त्या सर्वांत नागरिक हक्क ठरवून दिलेले असून कायदेमंडळांनी त्यावर आक्रमण केल्याची तक्रार कोणी केल्यास न्यायासनाला त्याची दखल घेता येण्याची तरतूद त्या त्या घटनेत आहे. (७) शेवटी; ऑस्ट्रेलियाची घटना भारतासारखी फेडरल असून त्या देशातील कायदेमंडळांना ब्रिटिश हाउस ऑफ कॉमन्सचे हक्क व अधिकार वापरता येतील, असे ऑस्ट्रेलियन घटनेत म्हटले आहे. पण ऑस्ट्रेलिया हे राज्यघटनेच्या दृष्टीने स्वतंत्र राष्ट्र नसून ब्रिटनचे अंकित आहे. तेथील कायदेमंडळावर ब्रिटनच्या हाउस ऑफ कॉमन्सचे हक्क व अधिकार बंधनकारक असणे हे त्या परिस्थितीला धरूनच आहे. पण स्वतंत्र भारताला ते योग्य नाही.

ही व्याख्यानमाला येथे संपली. पहिल्या दोन व्याख्यानात आर्थिक विकासाचे विवेचन आहे. तिसऱ्या व्याख्यानात सुचविलेल्या फेरफारांमुळें या देशात लोकशाही मार्गाने आर्थिक विकास सुकर होईल. या दृष्टीने तिसरे व्याख्यान दोहोंना पूरक ठरेल.

REFBK-0015120
REFBK-0015120